




# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ अमरावती, ■ सोमवार १७ ऑगस्ट २०२६ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठे १०







# भ्रष्टाचाराचे आरोप असलेल्या तहसीलदार लोखंडे यांना वरदहस्त कोणाचा?

## अकोल्यात एसीबीची कारवाई - तुरुंगवारी, अमरावतीत निलंबन आणि २४ तासांत 'स्टे'चा चमत्कार

## आता २०० कोटींच्या नव्या भूखंड घोटाळ्यात 'तो मी नव्हेच'चा आव!

**ॲड. समीर ठाकूर**

**अमरावती/ अकोला** : शासकीय खुर्चीचा वापर लोकसेवेसाठी की स्वतःच्या तिजोऱ्या भरण्यासाठी? असा संतप्त सवाल आता अकोला आणि अमरावतीच्या जनतेतून विचारला जात आहे. ज्या अधिकाऱ्यावर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने थेट गुन्हे दाखल केले, ज्याला तुरुंगाची हवा खावी लागली, तोच अधिकारी पुन्हा मोक्याच्या जागेवर येतो आणि पुन्हा एकदा त्याचे नावाची चर्चा करोडोंच्या बेकायदेशीर घोटाळ्यात येते, हे महाराष्ट्राच्या प्रशासकीय व्यवस्थेला लागलेले सर्वात मोठे ग्रहण आहे. तत्कालीन तहसीलदार विजय लोखंडे यांच्या कारनाम्यांची






मालिका पाहिली, तर एक गोष्ट स्पष्ट होते 'कायदे गरिबांसाठी आणि पळवाटा भ्रष्टाचाऱ्यांसाठी!' पण प्रश्न असा आहे की, संपूर्ण यंत्रणेला खिशात ठेवून फिरणाऱ्या या लोखंडे यांच्या पाठीशी उभी असलेली ती अदृश्य 'प्रशासकीय' आणि 'राजकीय' शक्ती नेमकी आहे तरी कोण? हीच बाब आता संशोधनाची बनली आहे.

**मंत्रालयातील कोणत्या महाभागाने फिरविली जादूची कांडी?**

### नाकाखाली घडला २०० कोटींचा भूखंड घोटाळा आणि 'तो मी नव्हेच'चा आव!

अमरावती येथील एक नवीन खळबळजनक २०० कोटी रुपयांचा भूखंडाचा महसूली घोटाळा नुकताच 'जनमाध्यम'ने विशेष वृत्तशृंखलेतून उघडकीस आणला आहे. या महाघोटाळ्यात तहसीलदार लोखंडे यांच्याच अधीनस्थ असलेल्या कनिष्ठ नायब तहसीलदार टीना चव्हाण यांच्यावर शासनाने तात्काळ निलंबनाची धडक कारवाई केली आहे. मात्र, याही प्रकरणात मुख्य सूत्रधाराचा शोध घेण्याऐवजी तहसीलदार लोखंडे यांनी अत्यंत शिताफीने हात झटकले आहेत. आपला या प्रकरणाशी काडीचाही संबंध नसल्याचा आव आणत, वृत्त प्रकाशित होताच त्यांनी चक्क 'आश्चर्य' व्यक्त केले असून 'तो मी नव्हेच'ची भूमिका घेतली आहे.

तहसीलदार लोखंडे यांच्यावर अकोल्यात एसीबीच्या कारवाई नंतर त्यांना अमरावती येथे मिळालेली 'क्रीम' पोस्टिंग, मग अमरावती येथे नियमभंग करून लेआऊट ला परवानगी दिल्याप्रकरणी थेट मंत्रालयातून निलंबनाच्या कारवाईचे पत्र निघणे आणि त्यावर लागलीच २४ तासात स्थगिती मिळणे; या सर्व अती सुपरफास्ट घडलेल्या घडामोडी बघता विजय लोखंडे यांच्या सेवेसाठी मंत्रालयातील कोणत्या महाभागाने जादूची कांडी फिरविली आहे, याचा शोध घेणे आता महत्वाचे आहे. सामान्य नागरिकाची फाईल मंत्रालयात महिन्यान्-महिने धूळ खात पडून राहते, मग एका दागी अधिकाऱ्यासाठी मंत्रालयाचे दरवाजे रात्रीतून कसे उघडतात? हा 'गॉडफादर' नेमका कोण, याचे उत्तर महसूल विभागाला द्यावेच लागेल!

### ३ दिवसांत चक्र फिरले; तहसीलदार अनभिज्ञ असणे अशक्य!

विशेष म्हणजे, २०२४ च्या अखेरपासून पूर्णपणे थंडबस्त्यात पडलेल्या या प्रकरणात अचानक अत्यंत 'सुपरफास्ट' वेगाने चक्र फिरले. ३० मार्च २०२६ रोजी मोठ्या शिताफीने आदेश काढण्यात येतो, त्याच्या दुसऱ्याच दिवशी (३१ मार्च) तातडीने प्रती दिल्या जातात, आणि लागलीच २ एप्रिल २०२६ रोजी जागेची थेट विक्री होते! एवढेच नव्हे तर, त्या जागेच्या खरेदी-विक्रीच्या नोंदणीसाठी दुय्यम निबंधकांना लेखी पत्र देखील पाठवले जाते. अवघ्या ३ ते ४ दिवसांत एवढ्या मोठ्या घडामोडी घडल्या असताना, संपूर्ण तालुक्याचा महसूल प्रमुख असलेल्या तहसीलदार लोखंडे यांना याची साधी भणकही नसावी, ही बाब कोणाच्याही पचनी पडणारी नाही. कारण तहसीलदार लोखंडे यांचा पूर्वेतिहास पाहता, या संपूर्ण व्यवहारात आणि प्रशासकीय त्रुटींमध्ये त्यांचा थेट हस्तक्षेप असण्याची शक्यता नाकारता येत नसल्याची उघड चर्चा आता सामान्य नागरिकांमध्ये सुरू झाली आहे.

### अकोल्यातील लाच प्रकरण आणि अमरावतीत २४ तासांतील 'तो' चमत्कार!

तहसीलदार विजय लोखंडे यांच्या भ्रष्टाचाराचा पॅटर्न अकोल्यात उघडा पडला होता. कोविडच्या भीषण संकटात गोरगरीब जनतेला धान्य वाटप करणाऱ्या एका प्रामाणिक स्वस्त धान्य दुकानदारचे हक्काचे धनादेश रोखून धरण्यात आले होते. तहसील कार्यालयातील पुरवठा निरीक्षकाद्वारे लाचेचा बाजार मांडला गेला. एसीबीने सापळा रचला आणि तपासाचे धागेदोरे थेट तहसीलदार विजय लोखंडे यांच्या दालनापर्यंत पोहोचले. एसीबीने लोखंडे यांना थेट सह-आरोपी करत बेड्या ठोकल्या आणि त्यांना अनेक दिवस तुरुंगात घालवावे लागले होते.लाचखोरीच्या गुन्ह्यात अडकलेला अधिकारी सहसा अकार्यकारी पदावर फेकला जातो. मात्र, लोखंडे यांच्या बाबतीत नियमांना केराची टोपली दाखवण्यात आली. त्यांची बदली थेट अमरावतीच्या तहसीलदार पदावर करण्यात आली. त्यानंतर मे २०२४ मध्ये मौजे वडद (गोपालनगर) येथील रद्द केलेल्या २७ एकर जमिनीवरील लेआउटला राष्ट्रीय महामार्गाचे नियम धाब्यावर बसवून अवघ्या ४ दिवसांत मंजुरी देण्यात आली. तक्रारदार संजय गव्हाळे यांच्या पाठपुराव्यानंतर मंत्रालयातून निलंबनाचा आदेश निघतो. मात्र, अचानक प्रशासकीय इतिहासातील सर्वात मोठा चमत्कार घडतो आणि निलंबनाच्या आदेशाला अवघ्या २४ तासांत मंत्रालयातून 'स्थगिती' मिळते! अल्पावधीतच मिळालेल्या स्थगितीने लोखंडेंचे हात किती लांब आहेत, याबाबत त्यावेळी खुद्द महसुलच्या अधिकारी - कर्मचारी वर्गात नानाविध चर्चा रंगल्या होत्या.

---

## वंदे मातरमच्या मुद्द्यावरून लातूरमध्ये भाजप-काँग्रेस आमनेसामने!

**लातूर/ वृत्तसंस्था-** : राहुल गांधी यांच्या वंदे मातरमविषयीच्या भूमिकेवरून सुरू झालेला राजकीय वाद आता लातूरपर्यंत पोहोचला आहे. राहुल गांधी यांच्या भूमिकेचा निषेध करण्यासाठी भाजप कार्यकर्त्यांनी लातूर शहरातील काँग्रेस भवनसमोर रविवारी सायंकाळी आंदोलन करण्याचा निर्धार केला. मात्र पोलिसांनी त्यांना गांधी चौकानजीक अडवले भाजपच्या आंदोलनाला विरोध करण्यासाठी काँग्रेसचे कार्यकर्तेही मोठ्या संख्येने काँग्रेस भवनसमोर एकत्र



आले. दोन्ही गटांकडून जोरदार घोषणाबाजी झाल्याने काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले.

भारतीय जनता युवा मोर्चाच्या वतीने जिल्हाध्यक्ष ऋषिकेश रमेशआप्पा कराड यांच्या नेतृत्वात आंदोलनासाठी काँग्रेस भवनकडे जाणाऱ्या कार्यकर्त्यांना पोलिसांनी रोखून धरल्याने गांधी चौकातच त्यांना आंदोलन करावे लागले. यावेळी त्यांनी भारत माता की जय, वंदे ☞(पान २ वर)

## एटापल्ली तालुक्यात वाघाच्या हल्ल्यात शेतकरी ठार!

### १८ ऑगस्टला चक्काजाम आंदोलनाचा इशारा

**गडचिरोली/ वृत्तसंस्था-** : एटापल्ली तालुक्यातील जारावंडीपासून अवघ्या पाच किलोमीटर अंतरावरील दोलंदा येथील शेतकऱ्याचा वाघाच्या हल्ल्यात मृत्यू झाला.



हरी बोहरन वड्डे(५७) असे मृत शेतकऱ्याचे नाव आहे. ही घटना आज सकाळी घडली.

हरी वड्डे हे सकाळी गावाबाहेरील जंगलात शौचास गेले होते. परंतु बराच वेळ होऊनही ते घरी न परतल्याने कुटुंबीय आणि गावकऱ्यांनी त्यांचा शोध घेतला असता गावापासून अर्धा किलोमीटर अंतरावर त्यांचा☞(पान २ वर)

## कल्याणमध्ये उच्च न्यायालयाच्या लिपीक पदाच्या परीक्षा केंद्रावर गोंधळ!

**कल्याण /वृत्तसंस्था-** : - नीट आणि टीएटी परिक्षा पेपर फुटीचे प्रकरण ताजे असताना उच्च न्यायालयाच्या लिपीक पदासाठी रविवारी घेण्यात आलेल्या कल्याणमधील परीक्षा केंद्रावर सर्व्हर डाऊन झाल्याने परिक्षार्थींनी मनस्ताप सहन करावा लागला. मात्र राज्यभरातील सगळ्याच परिक्षा केंद्रावर ही परिस्थिती उद्धवली असल्याने परिक्षार्थींनी परिक्षा आयोजना विषयी तीव्र संताप व्यक्त केला. अखेरीस कल्याणच्या परिक्षा केंद्रावर पोलिसांना पाचारण करावे

### घटनास्थळी पोलिसांची धाव, सर्व्हर डाऊन झाल्याने परिक्षार्थींनी मनस्ताप



लागले. त्याठिकाणी कल्याण न्यायालयाच्या न्यायाधीशांनाही पाचारण करण्यात आले.

उच्च न्यायालयातील ८०० लिपीक पदासाठी आज परिक्षा आजोजित करण्यात आली होती. राज्यभरात विविध ठिकाणी परीक्षा केंद्रे देण्यात आली होती. जवळपास ७ हजार उमेदवारांनी लिपिक पदासाठी अर्ज केले होते. त्यापैकी ५०० उमेदवारांची परिक्षा कल्याणच्या कृषी उत्पन्न बाजार समितीमधील परिक्षा केंद्रात होती. परिक्षा केंद्रावर विद्यार्थी पोहचले.

५०० परिक्षार्थींची परीक्षा तीन ब'चमध्ये घेतली जाणार होती. परीक्षा दिल्यावर लगेच त्याचा निकाल येणार होता. मात्र परीक्षा केंद्रात सर्व्हरच डाऊन होते. काही परीक्षा रुममध्ये अंधार होता. काहींच्या संगणकाचा किबोर्ड नीट काम करीत नव्हता. त्यामुळे परीक्षा दिल्यावर निकालाची प्रिंट येत नव्हती. या विविध ☞(पान २ वर)

## 'तुमचे हे पाप देशातील जनता कधीच माफ करणार नाही'

### वंदे मातरम् मुद्यावरून अमित शाह यांची सोनिया गांधींवर टीका

**नवी दिल्ली/ वृत्तसंस्था-** केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी म्हटले की, मतपेढीच्या राजकारणाच्या लालसेपोटी काँग्रेसने 'वंदे मातरम्'ला विसरले होते. त्यांनी सांगितले की, लाल किल्ल्याच्या तटबंदीवरून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'वंदे मातरम्'ला पुन्हा एक नवे आयुष्य देण्याचे काम केले आहे.

राजस्थानमधील चित्तौडगड येथे अमित शाह यांनी दावा केला की, काँग्रेसच्या मुख्यालयात 'वंदे मातरम्' गायले जात होते. गान सुरू असताना सोनिया गांधी यांनी काँग्रेस अध्यक्षांना ते गाणे थांबवण्यास सांगितले. सोनिया गांधी यांचे हे पाप देशातील जनता कधीही माफ करणार नाही, असे शाह म्हणाले.अमित शाह म्हणाले की, '८० वर्षांनंतर बंकिम बाबूंच्या या अमर गीताला पुन्हा सन्मान मिळत आहे, हेही सोनिया गांधींना सहन होत नाही.' ते पुढे म्हणाले, 'सोनिया जी, १४० कोटी जनता तुम्हाला पाहत आहे. तुम्ही केलेले हे पाप देशातील जनता कधीही माफ करणार नाही.'केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी म्हटले की, 'वंदे मातरम्' हे गीत अर्धवट सोडले जावे, असा विचार कोणी



स्वप्नातही कसा करू शकतो? काँग्रेसवाल्यांना लाज वाटली पाहिजे. अजून थोडीही लाज शिल्लक असेल, तर दोन्ही हात जोडून बंकिम बाबूंच्या अमर आत्म्याची आणि देशातील जनतेची माफी मागावी.

दरम्यान, रविवारी अमित शाह यांनी राजस्थानचे मुख्यमंत्री भजनलाल शर्मा यांच्यासोबत माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या पुतळ्याचे अनावरण केले.एका जाहीर सभेला संबोधित करताना राजस्थानचे मुख्यमंत्री भजनलाल शर्मा म्हणाले की, अटल बिहारी वाजपेयी हे तीन वेळा देशाचे पंतप्रधान होते. त्यांच्या कुशल नेतृत्वाखाली १९९९ मध्ये पोखरण येथे अणुचाचणी झाली आणि त्याच वर्षी भारताने कारगिलचे युद्ध जिंकले. हेच काम पुढे नेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'ऑपरेशन सिंदूर' आणि सर्जिकल स्ट्राइकच्या माध्यमातून भारताला एक शक्तिशाली राष्ट्र म्हणून जागतिक पटलावर प्रस्थापित केले. दरम्यान, कर्नाटकातील मंगळुरूमध्ये भाजप नेते विकास पुत्तूर यांनी काँग्रेस नेत्या सोनिया गांधी यांच्याविरोधात उर्वा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.

सोनिया गांधी यांनी 'वंदे मातरम्'चे गायन मध्येच थांबवण्यास सांगितल्याचा आरोप त्यांनी केला आहे. भाजप कार्यकर्त्यांसह पोलीस ठाण्यात पोहोचलेल्या पुत्तूर यांनी तत्काळ एफआयआर दाखल करून कायदेशीर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

## भुसावळ मालधक्यावर बंद खोलीत सडलेल्या अवस्थेत मृतदेह

### 'हद्द कोणाची?' यावरून पोलिसांचा वाद!

**जळगाव /वृत्तसंस्था-** पूर्वी नेहमी गजबजलेल्या रेल्वेच्या जुन्या भुसावळ मधील मालधक्क्यातील एका बंद खोलीत अज्ञात इसमाचा अत्यंत कुजलेल्या अवस्थेत मृतदेह आढळून आल्याने शहरात तीव्र खळबळ उडाली आहे. धक्कादायक बाब म्हणजे या मृतदेहाचे शिर लटकलेल्या अवस्थेत होते, तर कुजलेले धड खाली जमिनीवर पडले होते. अंदाजे महिनाभरापूर्वी ही घटना घडली असावी असा प्राथमिक अंदाज आहे. मात्र, घटनेचे गांभीर्य ओळखून तपास सुरू करण्याऐवजी 'हद्द कोणाची?' यावर रेल्वे आणि राज्य पोलिसांमध्ये बराचवेळ चर्चा सुरू होती.



**चेहरा अन् शरीर पूर्णपणे कुजले; हत्येचा संशय-** भुसावळ रेल्वेच्या जुन्या गुड्स यार्डमधील एका खोलीतून दुर्गंधी ☞(पान २ वर)


## ठाणे जिल्ह्याच्या विकासाला मिळणार नवी गती- उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

**ठाणे : वृत्तसेवा-** ८० व्या स्वातंत्र्यदिनानिमित्त ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते राष्ट्रध्वज फडकवण्यात आला. यावेळी स्वातंत्र्यसैनिक, शहीद जवानांचे कुटुंबीय, लोकप्रतिनिधी, अधिकारी आणि नागरिकांच्या उपस्थितीत त्यांनी विकसित भारत २०४७, महाराष्ट्राचा सर्वांगीण विकास, शेतकरी कल्याण, गृहनिर्माण, पायाभूत सुविधा आणि ठाणे जिल्ह्याच्या परिवर्तनाचा व्यापक आढावा मांडला.

यावेळी बोलताना, ड्रोन,



क्षेपणास्त्रांचे, सुपरसॉनिक क्रूझ मिसाइल, आधुनिक युद्धनौका आणि इलेक्ट्रॉनिक संरक्षण प्रणालींमुळे भारताची संरक्षण क्षमता मोठ्या प्रमाणावर वाढली आहे. 'मेक इन इंडिया' आणि 'आत्मनिर्भर भारत' या उपक्रमांमुळे देश आता संरक्षण उत्पादनातही जगासमोर सक्षम राष्ट्र म्हणून उभा राहत असल्याचे त्यांनी सांगितले. देशातील नक्षलवाद ☞(पान २ वर)

# UGC-NET च्या ३ विषयांची परीक्षा रद्द!
## -फेरपरीक्षा होणार; NTA कडून नवं वेळापत्रक जाहीर

**मुंबई :** UGC-NET च्या परीक्षेची तयारी करणाऱ्या हजारो विद्यार्थ्यांसाठी एक मोठी बातमी समोर आली आहे. नॅशनल टेस्टिंग एजन्सीने एक मोठा निर्णय घेतला आहे. यूजीसी नेटच्या तीन विषयांची परीक्षा रद्द करण्यात आली आहे. इंग्रजी, वाणिज्य आणि समाजशास्त्र या तीन प्रमुख विषयांची परीक्षा रद्द करण्यात आली असून आता या तीन विषयांची फेरपरीक्षा घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

या तीन विषयांच्या प्रश्नपत्रिकांमध्ये गंभीर त्रुटी किंवा अनेक चुका आढळून आल्या होत्या. त्या पार्श्वभूमीवर एका तज्ज्ञ समितीने केलेल्या शिफारशीनंतर अखेर नॅशनल टेस्टिंग एजन्सीने इंग्रजी, वाणिज्य आणि समाजशास्त्र या विषयांची फेरपरीक्षा घेण्याचा निर्णय घेतला आहे. नॅशनल टेस्टिंग एजन्सीने एक्सवर (ट्विटर) एक निवेदन प्रसिद्ध करत या संदर्भातील माहिती दिली आहे.

यूजीसी नेटच्या विद्यार्थ्यांना आता या तीन विषयांची परीक्षा पुन्हा द्यावी लागणार आहे. मात्र, या तीन विषयांच्या होणाऱ्या फेरपरीक्षेसाठी कोणतंही अतिरिक्त शुल्क विद्यार्थ्यांना द्यावं लागणार नाही. तसेच इंग्रजी, वाणिज्य आणि समाजशास्त्र विषयांच्या परीक्षा ९ आणि १० सप्टेंबर रोजी होतील, अशी माहिती नॅशनल टेस्टिंग एजन्सीने दिली आहे.




नॅशनल टेस्टिंग एजन्सीने २२ जून ते ३० जून २०२६ या कालावधीत देशभरात एकूण ८७ विषयांसाठी परीक्षा घेतल्या होत्या. परीक्षा संपल्यानंतर लगेच, इंग्रजी, वाणिज्य आणि समाजशास्त्र या विषयांच्या प्रश्नपत्रिकांच्या संदर्भात विद्यार्थ्यांनी अनेक तक्रारी केल्या होत्या.

त्यानंतर याबाबत सखोल चौकशी करण्यासाठी एका समितीची स्थापना करण्यात आली होती, त्यानंतर समितीने तपासणी केल्यानंतर या विषयांच्या प्रश्नपत्रिकांमध्ये गंभीर चुका आढळून आल्या होत्या.

प्रश्नपत्रिकांमध्ये तथ्यात्मक चुका, भाषांतरातील चुका आणि व्याकरणाच्या गंभीर चुका होत्या. शिवाय काही विचारवंत आणि अभ्यासकांची नावंही चुकीच्या पद्धतीने छापली गेली होती.

अनेक जुने प्रश्न जसेच्या तसे पुन्हा विचारले गेले होते. याबाबत चौकशी समितीने आपल्या अहवालात स्पष्ट केलं की, फेरपरीक्षा घेणं हाच एकमेव योग्य पर्याय आहे. त्यानंतर परिणामी एनटीएने या तीन विषयांसाठी फेर परीक्षा घेण्याचा निर्णय जाहीर केला आहे.

NTA कडून नवं वेळापत्रक जाहीर-

इंग्रजी : ९ सप्टेंबर २०२६ (सकाळी ९ ते दुपारी १२ पहिले सत्र)

वाणिज्य : ९ सप्टेंबर २०२६ (दुपारी ३ ते सायंकाळी ६ दुसरे सत्र)

समाजशास्त्र : १० सप्टेंबर २०२६ (सकाळी ९ ते दुपारी १२ पहिले सत्र)

तसेच परीक्षा केंद्र आणि प्रवेशपत्राबाबतची सर्व सविस्तर माहिती लवकरच संस्थेच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येणार असल्याची माहिती नॅशनल टेस्टिंग एजन्सीने दिली आहे.

# अमरावतीत राष्ट्रीय वस्त्र विद्यापीठ स्थापन करा
## -डॉ.अनिल बोंडे यांची केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्र्यांकडे मागणी

**अमरावती/प्रतिनिधीः-** विदर्भ हा देशातील प्रमुख कापूस उत्पादक भाग असूनही येथे वस्त्रोद्योग शिक्षण, तंत्रज्ञान आणि संशोधनाचा अपेक्षित विकास झालेला नाही. ही मोठी उणीव भरून काढण्यासाठी अमरावती येथे राष्ट्रीय स्तरावरील वस्त्र विद्यापीठ स्थापन करण्यात यावे, अशी मागणी महाराष्ट्राचे माजी कृषिमंत्री तथा राज्यसभा खासदार डॉ. अनिल बोंडे यांनी केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्री गिरीराज सिंह यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे.

खा. डॉ. बोंडे यांनी पत्रात नमूद केले की, विदर्भात कापसाचे विपुल उत्पादन होऊनही प्रक्रिया उद्योग आणि उच्च शिक्षण संस्थांच्या अभावामुळे मूल्यवर्धन मर्यादित राहते. यामुळे स्थानिक तरुणांना रोजगारासाठी इतर राज्यांत स्थलांतर करावे लागते. अमरावतीत राष्ट्रीय वस्त्र विद्यापीठ स्थापित झाल्यास टेक्स्टाईल तंत्रज्ञान, फॅशन तंत्रज्ञान आणि



वस्त्र क्षेत्रातील संशोधनाला मोठा वेग मिळेल. शिक्षण, संशोधन आणि उद्योग यांच्यात मजबूत ताळमेळ बसवून विदर्भातील 'कॉटन टू क्लॉथ' (कपास ते कापड) या संकल्पनेला अधिक सशक्त करता येईल, असा विश्वास खासदार डॉ. अनिल बोंडे यांनी केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्री गिरीराज सिंह यांच्यासोबत झालेल्या चर्चेदरम्यान व्यक्त केला.

याशिवाय अमरावतीत वस्त्र विद्यापीठासोबतच अचलपूर येथील बंद पडलेली ऐतिहासिक एनटीसी (NTC) फिनले मिल पुनरुज्जीवित करून तिचे आधुनिकीकरण करण्याची मागणी खा. डॉ. अनिल बोंडे यांनी केली आहे. ही मिल विदर्भाच्या औद्योगिक वारशाचा महत्त्वाचा भाग असून, ती पुन्हा सुरू झाल्यास स्थानिक कामगार, विणकर आणि कापूस उत्पादक शेतकऱ्यांना थेट रोजगाराचा व आर्थिक लाभाचा मार्ग उपलब्ध होईल, असे त्यांनी पत्रात नमूद केले.

तसेच खासदार डॉ. अनिल बोंडे यांनी केंद्रीय मंत्र्यांना दिलेल्या पत्रात अमरावती येथील मंजूर 'पीएम मित्रा' टेक्सटाईल पार्कच्या कामाला गती देण्याची मागणी केली आहे. जमिनीचे वाटप, पायाभूत सुविधांचा विकास आणि पर्यावरणविषयक मंजुऱ्यांची प्रक्रिया वेगाने पूर्ण करून या प्रकल्पाचे काम वेळेत सुरू करावे, जेणेकरून मोठ्या प्रमाणावर खाजगी गुंतवणूक आकर्षित होऊन स्थानिक तरुण व महिलांना रोजगाराच्या संधी मिळतील, असे खा. बोंडे यांनी स्पष्ट केले.

# शासकीय विभागीय ग्रंथालयात 'ग्रंथपाल दिन' साजरा

**अमरावती :** भारतातील ग्रंथालय शास्त्राचे जनक डॉ. एस.आर.रंगनाथन यांच्या जयंती निमित्त शासकीय विभागीय ग्रंथालयात आज 'ग्रंथपाल दिन' साजरा करण्यात आला.

ग्रंथपाल दिनाच्या औचित्याने विभागीय ग्रंथालयात ग्रंथालय शास्त्राशी संबंधित विविध पुस्तक व ग्रंथांचे प्रदर्शन भरविण्यात आले. प्रदर्शनाचे उद्घाटन जिल्हा माहिती कार्यालयाचे माहिती अधिकारी रितेश भुयार यांच्या हस्ते करण्यात आले. शासकीय विभागीय ग्रंथालयाचे सहाय्यक ग्रंथालय संचालक डॉ.राजेश पाटील यांच्यासह अधिकारी-कर्मचारी व ग्रंथालयाच्या अभ्यासिकेतील विद्यार्थी यावेळी उपस्थित होते. डॉ. एस.आर. रंगनाथन यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन कार्यक्रमाची सुरुवात झाली. ग्रंथापाल दिनाच्या औचित्याने ग्रंथालय शास्त्राची पाच सुत्रे आणि ग्रंथ व ग्रंथालयाच्या



मानवी जीवनातील महत्वावर यावेळी प्रातिनिधीकपणे विद्यार्थीनीने मनोगत व्यक्त केले व भुयार आणि डॉ. पाटील यांनीही विचार मांडले. ग्रंथालयातील समृद्ध ज्ञान भंडाराचा उपयोग करून स्वत:ला समृध्द करून एक चांगला विद्यार्थी बनण्याचा उपस्थितांनी यावेळी संकल्प घेतला.

# जि. प. प्राथमिक शाळा सावंगा विठोबा येथे स्वातंत्र्य दिन साजरा
## नेमाडे गुरुजींकडून गुणवंत विद्यार्थ्यांना बक्षीस वितरण

**चांदूर रेल्वे/प्रतिनिधीः-** तालुक्यातील सावंगा विठोबा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत ८०वा स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीत, भाषणे व विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून उपस्थितांची मने जिंकली.



स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून इयत्ता १ ली ते १२ वी पर्यंतच्या परीक्षेत सर्वाधिक गुण मिळविणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा श्री विठोबा संस्थान, सावंगा विठोबाचे अध्यक्ष पुंजाराम वै. नेमाडे (गुरुजी) यांच्या वतीने बक्षीस देऊन गौरव करण्यात आला. विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाची गोडी निर्माण व्हावी, अभ्यासाकडे त्यांचे अधिक लक्ष लागावे तसेच परीक्षेत चांगले गुण मिळविण्यासाठी त्यांना प्रोत्साहन मिळावे, या उद्देशाने नेमाडे यांच्या वतीने गुणवंत विद्यार्थ्यांना बक्षिसे देण्यात आली. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, इतर विद्यार्थ्यांनाही शैक्षणिक प्रगतीसाठी प्रेरणा मिळाली. यावेळी प्रशासक सरपंच बंडू भोजने, संजय मेंढे गावातील इतर पदाधिकारी, जिल्हा परिषद शाळेतील शिक्षकवृंद, विद्यार्थी, पालक तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शाळेतील शिक्षकवृंदाने परिश्रम घेतले.

# रोहणखेडा येथे शेतकऱ्यांसाठी कृषी चर्चा सत्राचे आयोजन

**अमरावती/प्रतिनिधीः-** पी. आर. पोटे पाटील कृषी महाविद्यालय, अमरावतीच्या वतीने ग्रामीण कृषी कार्यानुभव कार्यक्रमांतर्गत रोहणखेडा येथे शेतकऱ्यांसाठी कृषी चर्चा सत्राचे आयोजन करण्यात आले. यावेळी आधुनिक कृषी तंत्रज्ञान तसेच सेंद्रिय शेतीविषयी शेतकऱ्यांना सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.



कार्यक्रमाच्या प्रमुख वक्त्या डॉ. अर्चना त्रिपाठी मॅडम यांनी ड्रोन फवारणी तंत्रज्ञान या विषयावर मार्गदर्शन केले. त्यांनी ड्रोनद्वारे पिकांवर कीडनाशके, बुरशीनाशके व इतर कृषी निविष्ठांची अचूक आणि समान फवारणी करता येते, याबाबत माहिती दिली. पारंपरिक फवारणीच्या तुलनेत ड्रोनमुळे वेळ, मजुरी व पाण्याची बचत, कमी वेळेत मोठ्या क्षेत्रावर फवारणी तसेच पिकांमध्ये प्रवेश न करता फवारणी करण्याची सुविधा मिळते, असे त्यांनी सांगितले. फवारणी करताना योग्य औषधाची मात्रा, पाण्याचे प्रमाण, वाऱ्याचा वेग आणि पिकाची अवस्था यांचा विचार करणे आवश्यक असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. प्रा.श्वेता देशमुख मॅडम व प्रा. हेमंतकुमार पवार सर यांनी सेंद्रिय शेती या विषयावर मार्गदर्शन केले. सेंद्रिय शेतीमध्ये रासायनिक निविष्ठांचा संतुलित वापर कमी करून शेणखत, गांडूळखत, कंपोस्ट, जीवामृत, जैविक खते व जैविक कीड व्यवस्थापन यांसारख्या पद्धतींचा वापर करण्याचे महत्त्व त्यांनी सांगितले. सेंद्रिय निविष्ठांमुळे जमिनीतील सेंद्रिय कर्ब, सूक्ष्मजीवांची संख्या व जमिनीची सुपीकता सुधारण्यास मदत होते. तसेच माती परीक्षणाच्या आधारे पिकांच्या गरजेनुसार निविष्ठांचा वापर करण्याचा सल्ला शेतकऱ्यांना देण्यात आला.

यावेळी रावे कार्यक्रम अधिकारी डॉ. अदिती रजाने मॅडम, जिल्हा परिषद शाळेतील शिक्षक, सरपंच, शेतकरी, ग्रामस्थ व युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. शेतकऱ्यांनी तज्ज्ञांचे मार्गदर्शन उत्स्फूर्तपणे ऐकून विविध प्रश्न विचारून चर्चेत सहभाग घेतला.

कार्यक्रमाचे संपूर्ण नियोजन व आयोजन रावेच्या विद्यार्थ्यांनी केले. विद्यार्थ्यांच्या नियोजनबद्ध प्रयत्नांमुळे कृषी चर्चा सत्र यशस्वीरीत्या पार पडले.

# तीन मैत्रिणींचा प्रवास ठरला अखेरचा
## श्वानामुळे दुचाकी अनियंत्रित; ट्रॅव्हल्सच्या चाकाखाली तिघींचा करुण अंत

**हिंगणघाट :** स्वातंत्र्यदिनाचा उत्साह अवघ्या शहरात शिगेला पोहोचला असतानाच हिंगणघाट शहरात काळजाचा थरकाप उडविणारी दुर्घटना घडली. दुचाकीसमोर अचानक श्वान आडवा आल्याने दुचाकीवरील तिन्ही विद्यार्थिनी रस्त्यावर कोसळल्या. त्याचवेळी मागून आलेल्या ट्रॅव्हल्सच्या चाकाखाली त्या आल्याने तिन्ही कोवळ्या जीवांचा घटनास्थळीच दुर्दैवी मृत्यू झाला. शनिवारी सकाळी साडेनऊच्या सुमारास बसस्थानक ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर शाळा मार्गावरील साखरकर कॉम्प्लेक्सजवळ हा भीषण अपघात झाला. या घटनेने हिंगणघाट शहरावर शोककळा पसरली.

मिसबा जावेद शेख (१७), टाका मज्जीद संत चोखोबा वार्ड, आरोही अनुप चौरे (१६), रा. स्वीपर कॉलनी आणि समृद्धी रूपक धामसे (१६) संत गोमाजी वार्ड, अशी मृत विद्यार्थिनींची नावे आहेत.

मिसबा, आरोही आणि समृद्धी या तिन्ही मैत्रिणी एमएच-३२ ए.डब्ल्यू. ५७७९ क्रमांकाच्या बाईकने डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा चौकाकडून डॉ. बाबासाहेब आंबेडकर शाळेकडे जात होत्या. साखरकर कॉम्प्लेक्सजवळ त्यांची दुचाकी आली असता अचानक श्वान आडवा आला. त्यामुळे दुचाकीवरील नियंत्रण सुटले आणि तिघीही रस्त्यावर कोसळल्या.

दरम्यान, त्याच मार्गाने एमएच-४९ ए.टी. ३४३८ क्रमांकाची ट्रॅव्हल्स जात होती. दुचाकीवरून रस्त्यावर कोसळलेल्या तिघीही ट्रॅव्हल्सच्या चाकाखाली आल्या. काही क्षणांतच झालेल्या या भीषण अपघातात मिसबा, आरोही आणि समृद्धी यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. अपघाताचे दृश्य पाहून उपस्थितांच्या अंगावर अक्षरशः शहारे आले.

घटनेची माहिती मिळताच हिंगणघाट पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली.

पोलिसांनी पंचनामा करून तिन्ही मृतदेह उत्तरिय तपासणीसाठी उपजिल्हा रुग्णालयात पाठविले. अपघातग्रस्त दुचाकी आणि ट्रॅव्हल्स पोलिसांनी ताब्यात घेतली असून या प्रकरणाची नोंद हिंगणघाट पोलिसांनी केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

# १ व १० वरील उर्वरित

### ५९ ग्रॅम एमडीसह १०.२८ लाखांचा

आला. फॉरेन्सिक पथकाच्या प्राथमिक तपासणीत जप्त पदार्थ एमडी असल्याचे प्रथमदर्शनी स्पष्ट झाले. याप्रकरणी पोलिस उपनिरीक्षक दादू दहिकर यांच्या तक्रारीवरून दोघांविरुद्ध एनडीपीएस कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्राथमिक तपासात आमिर शेख हा मुंबईतील अंधेरी परिसरातून एमडी घेऊन अमरावतीत विक्रीसाठी आल्याची माहिती समोर आली आहे. अमली पदार्थाचा मूळ पुरवठादार आणि या साखळीत आणखी कोणाचा सहभाग आहे, याचा तपास पोलिस करीत आहेत.

कारवाई पोलिस आयुक्त राकेश ओला, उपायुक्त यशवंत सोळंके आणि सहायक आयुक्त निलेश ब्राम्हणे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

### दुचाकीला गायीची धडक;

उपचार सुरू असतानाच १५ ऑगस्ट रोजी पहाटे त्यांची प्राणज्योत मालवली. घटनेची माहिती पती श्रीकृष्ण वऱ्हाडे यांनी खोलापुरी गेट पोलिसांना दिली. पत्नीच्या मृत्यूबाबत कोणताही संशय नसल्याचे त्यांनी पोलिसांना सांगितले. या प्रकरणी पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद करून पुढील कार्यवाही सुरू केली आहे.

### शुक्रवार बाजारातील देवानंद ठाकरे

कैलास साहेबराव राऊत (रा. रामनगर, शिरा खदान, जसवाडी रोड, खंडवा, मध्य प्रदेश; सध्या अमरावती) आणि मनीष बिरजू लांजेवार (रा. रुख्मिणीनगर, बौद्ध विहाराजवळ, अमरावती) यांनी त्याच्या पोटावर व पाठीवर लाथाबुक्क्यांनी मारहाण केल्याचेही तपासात समोर आले आहे. देवानंदची हालचाल थांबेपर्यंत मारहाण झाल्याचे पोलिसांच्या तपासातून निष्पन्न झाले आहे.

घटनेनंतर सकाळी हा प्रकार उघडकीस आल्याने परिसरात गोंधळ होऊ नये, यासाठी कैलास राऊत आणि विठ्ठल उर्फ नरेश धुर्वे यांनी देवानंदच्या घरी जाऊन त्याच्या पत्नीला देवानंदचा मृत्यू झाल्याची माहिती दिल्याचेही तपासात समोर आले आहे. या प्रकरणात कैलास राऊत आणि विठ्ठल उर्फ नरेश धुर्वे यांच्याकडून घटनाक्रमाबाबत महत्त्वाची माहिती प्राप्त झाली आहे. मात्र, त्यांच्या कथनाची घटनास्थळ, साक्षीदारांचे जबाब, वैद्यकीय व शवविच्छेदन अहवाल तसेच उपलब्ध भौतिक पुराव्यांच्या आधारे स्वतंत्रपणे पडताळणी केली जात आहे. उपलब्ध पुराव्यांच्या आधारे संबंधितांविरुद्ध पुढील कायदेशीर कारवाई करण्यात येत आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली फ्रेजरपुरा पोलिसांनी तातडीने तपासाची चक्रे फिरवून हत्येचा घटनाक्रम उघडकीस आणला. प्रकरणातील सर्व बाबींची कायदेशीर पद्धतीने पडताळणी करून पुढील तपास सुरू आहे.

ही कामगिरी पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपायुक्त यशवंत सोळंके (परिमंडळ-१) आणि सहायक पोलीस आयुक्त नयन अलुरकर (फ्रेजरपुरा विभाग) यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक रविंद्र राजुलवार, दुय्यम पोलीस निरीक्षक समाधान वाठोरे, डी.बी. प्रमुख पोलीस उपनिरीक्षक राहुल महाजन, पोलीस उपनिरीक्षक खुशाल तायवाडे व विश्वजीत सरनाईक यांच्यासह फ्रेजरपुरा पोलीस ठाण्याच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी केली.

### राज्यात १९ हजारांवर

लाखांचे तडजोड शुल्क आकारण्यात आले आहे.

वितरण व वाणिज्यिक हानी कमी करण्यासाठी वीजचोरीविरुद्ध एप्रिलपासून मोहीम सुरु करण्यात आली आहे. एप्रिल ते जूनपर्यंत ८ हजार ५६७ वीजचोऱ्या उघड झाल्या होत्या. दि. १ जुलैपासून आणखी तीव्र झालेल्या या धडक मोहिमेत ११ हजार ३२ ठिकाणी थेट तारेच्या हूकद्वारे किंवा मीटरमध्ये फेरफार करणाऱ्या चोरांना महावितरणने दणका दिला आहे. यातील ८४६२ ठिकाणी विजेच्या चोरीचे मूल्यांकन झाले असून संबंधितांना १५ कोटी ११ लाख रुपयांचे वीजबिल देण्यात आले आहे. त्यापैकी ३०३६ प्रकरणांत ६ कोटी २२ लाख रुपयांचा वीजबिल भरणा झाला आहे. तर उर्वरित प्रकरणांत चोरीद्वारे वापरलेल्या युनिटनुसार वीजबिल व दंडात्मक तडजोड शुल्क आकारण्याचे (मूल्यांकनाचे) काम सुरु आहे.

गेल्या जुलै महिन्यात छत्रपती संभाजीनगर- २३६५, कोकण- ४०८४, नागपूर- २३२४ आणि पुणे प्रादेशिक विभागात २२५९ अशा एकूण ११ हजार ३२ वीजचोऱ्या उघडकीस आल्या आहेत. त्यातील ८४६२ वीजचोऱ्यांच्या मूल्यांकनातून १५ कोटी ११ लाख रुपयांची वीजचोरी झाल्याचे स्पष्ट झाले व संबंधितांना त्याचे वीजबिल देण्यात आले आहे. आतापर्यंत ३०३६ प्रकरणांत ६ कोटी २२ लाख रुपयांचे तडजोड शुल्क देखील आकारण्यात आले आहे.

वीजचोरीच्या संपूर्ण रकमेचा दंडासह मुदतीत भरणा केला नाही तर संबंधित वीजचोरांविरुद्ध भारतीय विद्युत कायद्याचे कलम १३५ नुसार फौजदारी कारवाई करण्यात येत आहे. भारतीय विद्युत कायदा २००३ च्या कलम १३५ नुसार वीजचोरीच्या गुन्ह्यासाठी दंड व तीन वर्षांपर्यंत तुरुंगवासाच्या शिक्षेची तरतूद आहे. सध्या थकबाकीमुळे वीजपुरवठा खंडित केलेल्या वीजजोडण्यांची तपासणी सुरू आहे. थकबाकीदारांनी अन्य ठिकाणाहून वीजवापर केल्याचे आढळून आल्यास वीजचोरीची कारवाई करण्यात येत आहे.

### पूर्णा नदीकाठावरून सात

टाले यांच्या शेतातून ७५ मीटर, अब्दुल साजीव अब्दुल राजीक यांच्या शेतातून ५० मीटर, नरेंद्र मंगल जामनिक यांच्या शेतातून १५० मीटर, यशवंत पुंडलिक पंडित यांच्या शेतातून २१ मीटर आणि मोहम्मद आसीम मोहम्मद कासम यांच्या शेतातून ३० मीटर केबल लंपास केली. याप्रकरणी मोहम्मद जावेद शेख लुकमान यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल केला असून, पुढील तपास सुरू आहे.

### वंदे मातरमच्या मुद्द्यावरून

मातरम, सोनिया गांधी हाय हाय, राहुल गांधी हाय हाय अशा घोषणा दिल्या. काँग्रेसचे आंदोलन जिल्हाध्यक्ष अभय साळुंखे यांच्या नेतृत्वाखाली झाले.

यावळी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनीही भाजपचा निषेध करीत त्यांच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी केली. भाजपच्या अरेरावीला आपण घाबरणार नाही असे सुनावले. आंदोलनादरम्यान भाजप आणि काँग्रेसचे कार्यकर्ते आमनेसामने आल्याने परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यासाठी लातूर पोलिसांनी दोन्ही गटांच्या मध्ये मोठी पोलीस फळी तैनात केली. भाजप कार्यकर्ते आंदोलनावर ठाम होते, तर काँग्रेस भवनसमोरून हटण्यास काँग्रेसचे कार्यकर्तेतयारर नसल्याने पोलिसांची चांगलीच धावपळ उडाली. दरम्यान, या आंदोलनामुळे लातूर शहरातील प्रमुख मार्गांवरील वाहतुकीवर परिणाम झाला. वाहतूक सुरळीत करण्यासाठी पोलिसांना अतिरिक्त बंदोबस्तासह प्रयत्न करावे लागले. परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यासाठी पोलिसांकडून दोन्ही गटांना शांततेचे आवाहन करण्यात आले.

### एटापल्ली तालुक्यात वाघाच्या

मृतेदह आढळून आला. वाघाने हल्ला करुन वड्डे यांना काही अंतरावर फरफटत नेल्याचे दिसून आले. पोलिस आणि वनपालांनी घटनास्थळी जाऊन पंचनामा केला.

मागील काही दिवसांपासून जारावंडी परिसरातील गावांमध्ये वाघाचा वावर आहे. यापूर्वी वाघाने पाळीव जनावरांना लक्ष्य केले होते. परंतु आता मनुष्यावरही हल्ले सुरु झाल्याने नागरिक भयभीत झाले आहेत.

सामाजिक कार्यकर्ते मुकेश कावळे यांनी १८ जुलैला वनाधिकाऱ्यांना निवेदन देऊन वाघाचा बंदोबस्त करण्याची मागणी केली होती. परंतु या मागणीकडे दुर्लक्ष करण्यात आल्याने १८ ऑगस्टला चक्काजाम आंदोलन करण्याचा इशारा कावळे यांनी दिला आहे. घटना सकाळी घडली असतानाही वरिष्ठ वनाधिकारी घटनास्थळी पोहचले नाही आणि त्यांनी मृतकाच्या कुटुंबीयांना तत्काळ आर्थिक मदतही केली नाही, याबद्दल कावळे यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली.

### कल्याणमध्ये उच्च न्यायालयाच्या

समस्यांचा समाना करावा लागल्याने पहिली बॅच परीक्षा रुममध्ये गेली ती लवकर परत आली नाही. त्यामुळे दुसऱ्या आणि तीसऱ्या बॅचची मुले साडे तीन वाजेपर्यंत बाहेरच ताटकळत होती. हा गोंधळ परिक्षा केंद्रावर उडाल्याने त्याठिकाणी पोलिसांना पाचारण करावे लागले. अखेरीस कल्याण न्यायालयाच्या न्यायाधीशांनाही पाचारण केले. परिक्षा रद्द करुन नव्याने घेणार की नाही ? याविषयी काही ठोस माहिती समोर आलेली नाही. या सगळ्या प्रकारामुळे परिक्षा देणाऱ्याा परिक्षार्थींच्या पालकांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे.

### भुसावळ मालधक्यावर बंद

येत असल्याने रेल्वे कर्मचाऱ्यांनी आत डोकावून पाहिले असता हा भयावह प्रकार समोर आला. मृतदेहाच्या अंगावर काही कपडे शिल्लक आहेत, मात्र चेहरा आणि शरीर पूर्णपणे सडल्यामुळे त्याची ओळख पटवणे कठीण झाले आहे.

या प्रकारामुळे अनेक गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत:

सुरक्षा रक्षक असताना अज्ञात व्यक्ती बंद गोडाऊनमध्ये पोहोचली कशी?

त्या खोलीची चावी कोणी घेतली होती की कुलूप तोडून प्रवेश केला गेला?

ही आत्महत्या आहे की पुरावा नष्ट करण्यासाठी झालेला घातपात?

तपास सोडून हद्दीचा वाद!

घटनेची माहिती मिळताच रेल्वे सुरक्षा बल (इंझ), रेल्वे पोलीस (उंझ) आणि महाराष्ट्र राज्य पोलीस दल घटनास्थळी दाखल झाले. परंतु, गुन्हा दाखल करून तपास चक्रे फिरवण्याऐवजी 'हा भाग आमच्या हद्दीत येत नाही' असा कांगावा करत अधिकारी एकमेकांकडे बोट दाखवत राहिले. वरिष्ठ अधिकाऱ्यांशी फोनवर चर्चा दळत घटनास्थळावर केवळ 'हद्दीची चर्चा' सुरू होती.

एकीकडे महिनाभरापासून बंद खोलीत मृतदेह सडत राहतो अन् दुसरीकडे खाकी वर्दी हद्दीच्या वादात अडकते, यावरून रेल्वे प्रशासन आणि पोलिसांच्या कार्यक्षमतेवर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

### ठाणे जिल्ह्याच्या विकासाला

मोठ्या प्रमाणावर नियंत्रणात आला असून अनेक नक्षलवाद्यांनी आत्मसमर्पण करून मुख्य प्रवाहात प्रवेश केला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या नेतृत्वाखाली शांतता, सुरक्षा आणि विकास या त्रिसूत्रीमुळे देशाच्या दुर्गम भागातही विकासाची नवी पहाट उगवली असल्याचे सांगितले.

राज्याच्या तिजोरीवर पहिला हक्क बळीराजाचा असल्याचे सांगत शिंदे यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजना २०२६ लागू करून निवडणुकीतील आश्वासन पूर्ण केल्याचे सांगितले. शेतकऱ्यांना आधुनिक शेतीसाठी सिंचन, सुधारित अवजारे, कृषी तंत्रज्ञान आणि विविध योजनांचा लाभ देण्यात येत असून ग्रामीण अर्थव्यवस्था मजबूत करण्यावर सरकारचा विशेष भर असल्याचे त्यांनी नमूद केले.

नवीन गृहनिर्माण धोरणाद्वारे गरीब व मध्यमवर्गियांना परवडणारी पक्की घरे उपलब्ध करून देण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. मुंबईसह संपूर्ण महाराष्ट्र झोपडपट्टीमुक्त करण्याचे हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी सरकार कटिबद्ध आहे. पुनर्विकासात अधिकृत अथवा अनाधिकृत रहिवाशांवर अन्याय होणार नाही; प्रत्येकाला न्याय, हक्क आणि सन्मानाने घर मिळेल, अशी ग्वाही त्यांनी दिली. कृषी व्हिलगीकरण योजनेअंतर्गत हजारो शेतकऱ्यांना लाभ मिळाला असून ?ग्री-स्टॅक प्रणालीवर १७ हजारांहून अधिक शेतकऱ्यांची नोंदणी पूर्ण झाली आहे. काही महिन्यांपूर्वी ठाणे जिल्हा परिषद शाळेतील १५ विद्यार्थ्यांना इस्रो भेटीची संधी मिळाली. ग्रामीण भागातील विद्यार्थी उद्याचे शास्त्रज्ञ बनू शकतात, हा विश्वास या उपक्रमातून अधिक दृढ झाला असल्याचे शिंदे म्हणाले.

ठाणे शहरात ६,०५९ एआय आधारित सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आले असून गुन्हेगारीवर प्रभावी नियंत्रण ठेवले जात आहे. ६५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांसाठी 'आधारवड' ?प, तर पोलिस व जनतेतील दरी कमी करण्यासाठी 'पोलिस मित्र' सुरू करण्यात आले आहे. सायबर गुन्ह्यांविरोधात व्यापक जनजागृती मोहीम राबविण्यात येत असून डिजिटल युगात नागरिकांचे संरक्षण हे सरकारचे सर्वोच्च प्राधान्य असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी ठाणे जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ, ठाणे मनपा आयुक्त सौरभ राव, ठाणे पोलिस आयुक्त आशुतोष डुंबरे, खासदार नरेश म्हस्के, आमदार संजय केळकर, महापौर शर्मिला पिंपळोळकर, उपमहापौर कृष्णा पाटील, सभागृह नेते हनुमंत जगदाळे आणि सर्व प्रमुख अधिकारी, कर्मचारी आणि पोलिस तसेच सर्वसामान्य ठाणेकर नागरिक उपस्थित होते.

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ सोमवार, १७ ऑगस्ट २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


## स्वातंत्र्य दिनी जिल्हा परिषदेत ध्वजारोहण

### ‘घनकचरा व्यवस्थापन नियम २०२६’ जनजागृती अभियानाचा शुभारंभ

■ प्रतिनिधी | वाशिम ■

स्वातंत्र्य दिनानिमित्त वाशिम जिल्हा परिषदेत मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक अर्पित चौहान यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी किरण गणेश कोवे यांच्यासह विविध विभागांचे प्रमुख, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. ध्वजारोहणानंतर राष्ट्रीय गीत, राष्ट्रगीत व राज्यगीताचे सामूहिक गायन करण्यात आले. तसेच भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन करण्यात आले. मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान यांनी उपस्थितांना स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा दिल्या. यानंतर ‘घनकचरा व्यवस्थापन नियम २०२६’ बाबत उपस्थितांना शपथ देण्यात आली.

**१० दिवस, १० संदेश**

अभियानांतर्गत दररोज घनकचरा व्यवस्थापनाशी संबंधित विविध विषयांवर सोशल मीडिया पोस्टर, इन्फोग्राफिक्स, व्हिडिओ तसेच अन्य माध्यमांतून संदेश प्रसारित केले जाणार आहेत. अभियानाच्या पहिल्या दिवशी ‘स्वच्छ पर्यावरण हा मूलभूत अधिकार’ या विषयातून सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांची माहिती देण्यात येणार आहे. त्यानंतर घरगुती कचऱ्याचे चार प्रकारांत वर्गीकरण, उघड्यावर कचरा न टाकणे, झाकलेल्या घंटागाडीचा वापर, ओल्या कचऱ्यापासून खतनिर्मिती, प्लास्टिकमुक्त गाव, बल्क वेस्ट जनरेटरची जबाबदारी, जुन्या कचऱ्याची वैज्ञानिक विल्हेवाट, शाळा-अंगणवाडी व सार्वजनिक संस्थांची भूमिका तसेच नियमांचे पालन न करणाऱ्यांवरील दंडात्मक कारवाई आदी विषयांवर जनजागृती केली जाणार आहे.





जिल्ह्यातील ग्रामपंचायती, शाळा, अंगणवाडी, आरोग्य केंद्रे, महिला बचत गट, स्वयंसेवी संस्था, युवक तसेच ग्रामस्तरीय कर्मचाऱ्यांनी या अभियानात सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन जिल्हा पाणी व स्वच्छता विभागाच्या वतीने करण्यात आले आहे. नागरिकांनीही सोशल मीडियावरील अभियानातील संदेश जास्तीत जास्त शेअर करून स्वच्छता व घनकचरा व्यवस्थापनाबाबत जनजागृतीस हातभार लावावा, असे मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान यांनी सांगितले. यासाठी त्यांनी स्वातंत्र्य दिनानिमित्त समाजमाध्यमांवर व्हिडिओ संदेशही प्रसारित केला. ‘स्वच्छ पर्यावरण – प्रत्येक नागरिकाचा हक्क’ हा अभियानाचा प्रमुख संदेश असून, #SWMRules2026 #Swachh Bharat Mission # Z P Washim # Clean Village # iec Campaign हे हॅशटॅग वापरून अभियान व्यापक करण्याचे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे. कार्यक्रमाला पंचायत विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी आत्माराम बोंद्रे, सामान्य प्रशासन विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी संजय गणविर, मुख्य लेखा व वित्त अधिकारी सु. ब. जाधव, शिक्षणाधिकारी विठ्ठल भुसारे, जल जीवन मिशनचे प्रकल्प संचालक गजानन खुळे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. पांडुरंग ठोंबरे, ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता महेश कान्हेकर यांच्यासह अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन उपशिक्षण अधिकारी गजानन डाबेराव यांनी केले.

**१० दिवसीय सोशल मीडिया अभियानाचा शुभारंभ**

स्वच्छ भारत मिशनच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या ‘घनकचरा व्यवस्थापन नियम २०२६’ या १० दिवसीय सोशल मीडिया ध्ं अभियानाचा शुभारंभही यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान यांच्या हस्ते करण्यात आला. हे अभियान दि. १५ ते २४ ऑगस्ट २०२६ या कालावधीत राबविण्यात येणार असून, यादरम्यान घनकचरा व्यवस्थापनाबाबत जनजागृती करण्यात येणार आहे.

## घराला आग लागल्यामुळे मोठ्या प्रमाणात नुकसान



■ प्रतिनिधी | मालेगाव ■

झोडगा खुर्द येथील केशव वाघ यांच्या घराला आग लागून घरातील संसार उपयोगी वस्तू जळून खाक, झालेची घटना आज दि ,१६ आगस्ट रोज रविवारी दुपारी ३ वाजता घडली असून, आग कशामुळे मुळे लागली याचे कारण मात्र कळाले नाही.

घरातील सर्व जन आपल्या शेतात काम करण्यासाठी गेले होते, आग लागल्याने,धुवा व आग शेजारी गावकऱ्यांना व जवळच्या शेतातील शेतकऱ्यांना , दिसले तेंव्हा धावपळ करून पाणी टाकून विझवण्यासाठी प्रयत्न केले , परंतु त्या अगोदर च घरातील असलेल्या टिव्ही, सोफासेट, गादी, खुर्च्या ,कपडे कपाटं फैन कुलर टीनाखालील लाकडे, गहू, तांदूळ, सोन्याची एकदाही, टेबल फैशन, नवीन कपडे इतर वस्तू जळून नष्ट झाले असल्याने जवळजवळ २ लाख ४२ हजार रुपयांच नुकसान झाल्याचे घरमालकांनी सांगितले,या मध्ये केशव वाघ या शेतकरयांन फार मोठे नुकसान झाले असून या घराचा पंचनामा पाहणी करून शासनाकडून आर्थिक मदत मिळाली पाहिजे अशी मागणी होत आहे

## प्रवेश प्रक्रियेला गती देण्यासाठी केंद्र संयोजकांचे चर्चासत्र उत्साहात



■ प्रतिनिधी | वाशिम ■

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, विभागीय केंद्र अमरावती अंतर्गत सावित्रीबाई फुले महिला महाविद्यालय, वाशिम येथील अभ्यास केंद्राच्या वतीने शैक्षणिक सत्र २०२६-२७ मधील प्रवेश प्रक्रियेच्या अनुषंगाने महत्त्वपूर्ण चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. बुधवार, दि. १२ ऑगस्ट रोजी महाविद्यालयाच्या परिसरात हे चर्चासत्र वातावरणात संपन्न झाले. या चर्चासत्रासाठी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या अमरावती विभागीय केंद्राचे वरिष्ठ शैक्षणिक सल्लागार डॉ. जयंत वडते प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. तसेच सावित्रीबाई फुले महिला महाविद्यालयातील अभ्यास केंद्राचे केंद्रप्रमुख तथा प्राचार्य डॉ. विजय पांडे, केंद्र संयोजक डॉ. प्रज्ञा क्षीरसागर आणि केंद्र सहाय्यक श्री. दत्ता गिरी यांची प्रमुख उपस्थिती होती. शैक्षणिक सत्र २०२६-२७ साठी विद्यापीठाच्या विविध अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेबाबत या चर्चासत्रात सविस्तर मार्गदर्शन व चर्चा करण्यात आली. विशेषतः बी.ए., बी.लिब. सायन्स, एम.लिब. सायन्स, एम.ए. आणि एम.बी.ए. आदींनी उपस्थितांना मार्गदर्शन करण्यात आले.

## नरेगा कामात घोळ; चौकशीचा अहवाल मागविला

### सुकळी येथे बनावट हजेरीपत्रकाद्वारे अनुदान लाटल्याचा आरोप

### दोषींवर कारवाईची मागणी

■ प्रतिनिधी | खेट्री ■

पातूर पंचायत समितीअंतर्गत सुकळी ग्रामपंचायतीमध्ये नरेगा कामांमध्ये बनावट हजेरीपत्रक तयार करून शासनाचे अनुदान लाटल्याचा आरोप करण्यात आला आहे. राष्ट्रपाल गवई, सुरेश अंभोरे, अरुणा राजेश अंभोरे व अनंता भानुदास वांडे यांनी याप्रकरणी जिल्हाधिकारी, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी आणि पातूरचे गटविकास अधिकारी यांच्याकडे २४ जुलै रोजी तक्रार दाखल केली.

सुकळी येथे वृक्षलागवड तसेच पेव्हर ब्लॉक रस्त्यांच्या कामांमध्ये एनएमएमएस ॲपचा वापर करताना रोजगार सेवकांकडून हजेरी नोंदविताना अनियमितता झाल्याचा तक्रारदारांचा आरोप आहे. संबंधित हजेरीपत्रकांची सखोल चौकशी करून दोषी रोजगार सेवक व संबंधित अधिकाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करावी, अशी मागणीही करण्यात आली होती.



कारवाई न झाल्यास आमरण उपोषण करण्याचा इशारा तक्रारदारांनी दिला होता.

दरम्यान, तक्रारीची दखल घेत नरेगा विभागाच्या उपजिल्हाधिकाऱ्यांनी २९ जुलै रोजी जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना पत्र पाठवून चौकशीचे निर्देश दिले. त्यानंतर जिल्हा परिषद नरेगा विभागाच्या गटविकास अधिकाऱ्यांनी ७ ऑगस्ट रोजी पातूरच्या गटविकास अधिकाऱ्यांना प्रकरणाची तत्काळ चौकशी करून अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यामुळे आता चौकशीत नेमके काय निष्पन्न होते, याकडे ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

## राज्य शासनाच्या विविध शासकीय ८ विभागात ८६ हजार कोटींची देयके रखडली

**-१८-१९ ऑगस्टला कंत्राटदारांचा आझाद मैदानात एल्गार**

**- राज्यातील सर्व कंत्राटदारांनी बहूसंख्येने सहभागी होण्याचे आवाहन**

■ प्रतिनिधी | वाशिम ■

राज्याच्या विकासकामांचा गाडा पुढे नेणाऱ्या शासकीय कंत्राटदारांची तब्बल ८६ हजार ६६२ कोटींची देयके शासनाच्या विविध विभागांकडे रखडल्याने कंत्राटदारांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. वारंवार निवेदने, बैठका आणि पाठपुरावा करूनही प्रश्न मार्गी न लागल्याने महाराष्ट्र राज्य शासकीय कंत्राटदार फेडरेशनने आता आक्रमक पवित्रा घेतला असून, १८ आणि १९ ऑगस्ट रोजी मुंबईतील आझाद मैदानावर आंदोलनाचा इशारा दिला आहे. कामे करूनही बिले मिळत नसतील तर कंत्राटदारांनी व्यवसाय कसा करायचा? असा सवाल उपस्थित करीत प्रलंबित देयकांवर तातडीने निर्णय घेण्याची मागणी फेडरेशनने केली आहे. तसेच या आंदोलनात राज्यातील शासकीय कंत्राटदारांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन महाराष्ट्र स्टेट गव्हर्मेंट कॉन्ट्रॅक्टर फेडरेशनचे पश्चिम विदर्भ संघटक सुधीर जाधव, वाशिम जिल्हा कंत्राटदार संघाचे अध्यक्ष राजू अग्रवाल, उपाध्यक्ष मुकेश ठाकूर आणि सचिव स्वप्नील सरनाईक यांनी केले आहे.

शासनाला दिलेल्या निवेदनात फेडरेशनने नमूद केले आहे की, राज्याच्या विविध विकासकामांसाठी शासकीय यंत्रणांकडून कंत्राटदारांमार्फत मोठ्या प्रमाणावर कामे करून घेतली जातात. रस्ते, पूल, शासकीय इमारती, पाणीपुरवठा, सिंचन, ग्रामीण विकास, पर्यटन तसेच अन्य पायाभूत सुविधांची कामे पूर्ण करण्यासाठी कंत्राटदार स्वतःचे भांडवल, बँक कर्ज आणि उपलब्ध आर्थिक साधनांचा वापर करतात. मात्र कामे पूर्ण झाल्यानंतर शासनाकडून देयके वेळेत मिळत नसल्याने कंत्राटदारांची आर्थिक कोंडी होत असल्याचा आरोप महाराष्ट्र राज्य शासकीय कंत्राटदार फेडरेशनने केला आहे.

फेडरेशनच्या माहितीनुसार, १५ ऑगस्ट २०२६ पर्यंत सार्वजनिक बांधकाम विभागाकडे सुमारे १७ हजार ५०० कोटी, आदिवासी विकास विभागाकडे ९ हजार ८८१ कोटी, ग्रामविकास विभागाकडे १ हजार १८१ कोटी, पाणीपुरवठा विभागाकडे तब्बल ४० हजार कोटी, जलसंपदा विभागाकडे ७ हजार कोटी, पर्यटन विभागाकडे १ हजार १०० कोटी, तर इतर विविध विभागांकडे सुमारे १० हजार कोटींची देयके प्रलंबित आहेत. या सर्वांचा एकत्रित आकडा तब्बल ८६ हजार ६६२ कोटींवर पोहोचला असल्याचा दावा फेडरेशनने केला आहे.

इतक्या मोठ्या प्रमाणावर देयके रखडल्याने कंत्राटदारांसमोर आर्थिक संकट उभे ठाकले आहे. बँकांकडून घेतलेल्या कर्जाचे व्याज, कामगारांचे वेतन, बांधकाम साहित्य पुरवठादारांची देणी, यंत्रसामग्रीचा खर्च, जीएसटी तसेच अन्य वैधानिक देणी वेळेत भागवावी लागतात. मात्र शासनाकडून कोट्यवधी रुपयांची देयके मिळत नसल्याने या सर्व आर्थिक जबाबदाऱ्यांचा भार कंत्राटदारांवर पडत आहे. स्वतःच्या पैशातून कामे सुरू ठेवून शासनाच्या बिलांची प्रतीक्षा करण्याची वेळ कंत्राटदारांवर आली असल्याने त्यांच्यात तीव्र असंतोष निर्माण झाला आहे. या प्रश्नावर फेडरेशनने शासनाकडे अनेक वेळा निवेदने सादर केली असून संबंधित विभागांचे मंत्री, अधिकारी तसेच वरिष्ठ प्रशासकीय यंत्रणेचे लक्ष वेधले आहे. विविध बैठका घेऊन प्रलंबित देयकांचा प्रश्न तातडीने सोडविण्याची मागणीही करण्यात आली. मात्र १५ ऑगस्टपर्यंत मोठ्या प्रमाणावर बिले अद्याप प्रलंबित असल्याने केवळ आश्वासनांवर समाधान मानण्यास कंत्राटदार तयार नसल्याचे फेडरेशनने स्पष्ट केले आहे.

या पार्श्वभूमीवर प्रलंबित असलेली सर्व पात्र बिले तातडीने अदा करावीत, प्रत्येक विभागातील थकीत बिलांचा विभागनिहाय आढावा घेऊन निश्चित कालमर्यादेत देयके देण्याचे वेळापत्रक जाहीर करावे, आवश्यक निधीची तातडीने तरतूद करावी आणि भविष्यात कंत्राटदारांची बिले दीर्घकाळ प्रलंबित राहणार नाहीत, यासाठी कायमस्वरूपी आर्थिक व्यवस्था निर्माण करावी, अशी मागणी या आंदोलनातून करण्यात येणार आहे. तसेच मुख्यमंत्री, वित्तमंत्री, संबंधित विभागांचे मंत्री आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत फेडरेशनच्या प्रतिनिधी मंडळाची तातडीने संयुक्त बैठक घेऊन प्रलंबित देयकांवर ठोस निर्णय घ्यावा, अशीही मागणी करण्यात आली आहे.

## ध्यानमय वाशिमच्या संकल्पाला नवी दिशा

### १९ ऑगस्टला निःशुल्क ध्यान व स्वाध्याय सत्र

■ प्रतिनिधी | वाशिम ■

वाशिम शहर व जिल्ह्यातील नागरिकांनी तणावरहित, सकारात्मक आणि आनंदी जीवनशैलीचा अनुभव घ्यावा, या उद्देशाने पिरॅमिड स्पिरिच्युअल सोसायटीज मूव्हमेंट (झएएश), वाशिम यांच्या वतीने ‘ध्यानमय वाशिम’ हा संकल्प हाती घेण्यात आला आहे. या संकल्पाचा एक भाग म्हणून बुधवार, दि. १९ ऑगस्ट रोजी दुपारी १.३० वाजता निःशुल्क ध्यान व स्वाध्याय सत्राचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम २रा मजला, पाटणी ज्वेल्सच्या वर, सी विंग, पाटणी कमर्शियल कॉम्प्लेक्स, वाशिम येथे होणार असून, याच ठिकाणी ध्यान हॉलचा उद्घाटन समारंभही आयोजित करण्यात आला आहे.



स्व. आ. राजेंद्र पाटणी यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ पाटणी परिवाराने हा ध्यान हॉल कायमस्वरूपी निःशुल्क उपलब्ध करून दिला आहे. नागरिकांना ध्यान, स्वाध्याय आणि आत्मविकासासाठी नियमितपणे शांत व सकारात्मक वातावरण उपलब्ध व्हावे, या उद्देशाने ही सुविधा देण्यात आली आहे. या कार्यक्रमानंतर ब्रह्मर्षी प्रेमनाथजी यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष ध्यानसत्र होणार असून, त्यासाठी ते बंगळुरूहून विशेषतः वाशिम येथे येत आहेत. ब्रह्मर्षी प्रेमनाथजी हे पिरॅमिड स्पिरिच्युअल सोसायटीज मूव्हमेंटमधील आध्यात्मिक मार्गदर्शक म्हणून ओळखले जातात. त्यांनी ब्रह्मर्षि पत्रीजी यांच्या सान्निध्यात तब्बल २५ वर्षे ध्यान, आत्मविकास व आध्यात्मिक साधनेचा सखोल अभ्यास केला आहे. मानवकल्याणाच्या ध्येयाने प्रेरित होऊन त्यांनी आपला यशस्वी व्यवसाय सोडून ध्यान, स्वाध्याय, अनापानसती ध्यान, शाकाहारी जीवनशैली आणि आध्यात्मिक साधनेचा प्रसार करण्यासाठी आपले जीवन समर्पित केले आहे. ध्यान ही केवळ आध्यात्मिक साधना नसून धावपळीच्या जीवनात मनाला आणि शरीराला विश्रांती देणारे प्रभावी साधन म्हणून अनेक जण तिचा अनुभव घेत आहेत. नियमित ध्यानामुळे मन शांत व स्थिर होण्यास, एकाग्रता व स्मरणशक्ती सुधारण्यास, अनावश्यक विचारांपासून मनाला विश्रांती मिळण्यास तसेच सकारात्मक विचारसरणी व निर्णयक्षमता विकसित होण्यास मदत होऊ शकते. तणाव, चिडचिड आणि अस्वस्थता कमी करण्यास, आत्मविश्वास व आत्मजाणीव वाढविण्यास तसेच भावनिक संतुलन राखण्यासही ध्यान सहाय्यकारी ठरू शकते.

## स्वातंत्र्य दिनी पत्रकार भवनात झेंडा वंदन

**अकोला :** अकोला जिल्हा पत्रकार संघा तर्फे भारताच्या ८० व्या स्वातंत्र्य दिना निमित्त १५ आगस्ट ला पत्रकार भवन मध्ये ज्येष्ठ पत्रकार प्रा मधुभाऊ जाधव यांच्या हस्ते झेंडा वंदन करण्यात आले, मराठी पत्रकार परिषदेचे माजी अध्यक्ष सिद्धार्थ शर्मा, जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष शौकत अली मिरसाहेब, माजी आ लक्ष्मणरावं तायडे,दीपक देशपांडे, कमल किशोर शर्मा, शरद गांधी, तुषार हांडे, दिलीप गिऱ्हे, समाधान खरात, पी एस मौर्य, सर्वेशचंद्र कटियार,दिलीप दांदले ,नितीन विनोद गुप्ता,गिरणार हागे,डॉ मोहन खडसे , मनीष खर्चे, विजय ढवळे, आदी सह पत्रकार मंडळी उपस्थित होते. झेंडा वंदन ,राष्ट्रगीत झाल्या नंतर प्रा मधु जाधव, सिद्धार्थ शर्मा, मिरसाहेब,डॉ मोहन खडसे यांनी सर्वांना शुभेच्छा दिल्या.

## वाशिममध्ये तिरंग्याच्या साक्षीने स्वातंत्र्यदिनाचा राष्ट्रभक्तीमय जल्लोष

### हजारो दुचाकीस्वारांच्या सहभागाने भव्य तिरंगा मोटरसायकल रॅली; वीरांगनांच्या वेशभूषेतील विद्यार्थ्यांनी वेधले लक्ष



■ प्रतिनिधी | वाशिम ■

भारतीय स्वातंत्र्याच्या ८०व्या वर्धापन दिनानिमित्त भारतीय जनता पार्टी, वाशिम शहराच्या वतीने शहरातील विविध ठिकाणी ध्वजारोहण कार्यक्रम तसेच वाशिम शहर मंडळ, वाशिम ग्रामीण मंडळ व अनसिंग मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य तिरंगा मोटरसायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले. राष्ट्रध्वजाचा सन्मान, देशभक्तीचा उत्स्फूर्त जयघोष आणि हजारो नागरिकांचा सहभाग यामुळे संपूर्ण वाशिम शहर अक्षरशः तिरंगामय झाले.

विविध ठिकाणी आयोजित ध्वजारोहण कार्यक्रमांना भाजपा शहर व जिल्ह्यातील पदाधिकारी, लोकप्रतिनिधी, नगरसेवक-नगरसेविका तसेच महिला व पुरुष कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. भाजपा वाशिम शहराध्यक्ष मनीष मंत्री, वाशिम तालुकाध्यक्ष एकनाथ कड पाटील आणि अनसिंग मंडळ अध्यक्ष संतोष उगले पाटील यांच्या पुढाकारातून भव्य तिरंगा मोटरसायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले. रॅलीला आमदार श्याम खोडे, भाजपा जिल्हाध्यक्ष पुरुषोत्तम चितलांगे, माजी आमदार विजयराव जाधव, भाजपा नेते राजू राजे पाटील, नगराध्यक्ष अनिल केंदळे, सुरेश मापारी, विजू खांजोडे, माजी जिल्हाध्यक्ष सुनील लुंगे यांच्यासह शहर व ग्रामीण भागातील भाजपा पदाधिकारी, नगरसेवक-नगरसेविका, महिला-पुरुष कार्यकर्ते, सेवानिवृत्त माजी सैनिक, शालेय विद्यार्थी आणि व्यापारी बांधवांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

**माजी सैनिकांचा सन्मान**

राष्ट्रसेवेत योगदान देणारे माजी सैनिक संदीप बैस, रामेश्वर ठेंगडे, शंकर वाडकर, मोहन गोरे आणि सुरेश डाळ यांचा उपस्थित मान्यवरांच्या हस्ते शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. देशसेवेप्रती त्यांच्या योगदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त करून त्यांना मनःपूर्वक धन्यवाद देण्यात आले. याची जबाबदारी जिल्हा महामंत्री गणेश खंडाळकर, गजानन नवगनकर आणि साईनाथ वाघमारे यांनी सांभाळली.

**वीरांगनांच्या वेशभूषेतील विद्यार्थ्यांनी वेधले लक्ष**

रॅलीचे विशेष आकर्षण ठरले ते भारत माता, राजमाता जिजाऊ माँसाहेब, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, झाशीची राणी लक्ष्मीबाई आणि राणी पद्मावती यांच्या वेशभूषेत सहभागी झालेल्या शालेय विद्यार्थ्यांचे मनोहारी सादरीकरण. विद्यार्थ्यांनी साकारलेल्या या ऐतिहासिक झांकीने उपस्थितांची मने जिंकली. या प्रेरणादायी देखाव्यातून शौर्य, त्याग, संस्कार आणि राष्ट्रभक्तीचा संदेश प्रभावीपणे देण्यात आला. या झांकीचे नियोजन हेमलताताई विसपुते, छायाताई मडके, ज्योतीताई इंगोले आणि अनिताताई काकडे यांनी घेतली होती.

**हजारो दुचाकींवर डौलाने फडकला तिरंगा**

हजारो दुचाकीस्वारांच्या सहभागामुळे रॅलीला भव्य स्वरूप प्राप्त झाले. प्रत्येक दुचाकीवर डौलाने फडकणारा तिरंगा, देशभक्तीपर गीते आणि ‘भारत माता की जय’, ‘वंदे मातरम’ अशा घोषणांनी वाशिम शहराचा परिसर दुमदुमून गेला. शहरी व ग्रामीण भागातील देशभक्त नागरिकांसह भाजपा युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष प्रदीप देशमुख यांच्या नियोजनाखाली युवकांनीही मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदविला.

**राष्ट्रपुरुषांना अभिवादन करत रॅलीचा प्रवास**

रॅलीचा प्रारंभ अकोला नाका येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून करण्यात आला. त्यानंतर रॅली पाटणी चौक मार्गे डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात पोहोचली. येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन करण्यात आले. पुढे दिघेवाडी चौक, बालू चौक मार्गे छत्रपती शिवाजी महाराज चौकात पोहोचून महाराजांना पुष्पहार अर्पण करण्यात आला. त्यानंतर टिळक बगीचा येथील लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून रॅली पाटणी चौक मार्गे अकोला नाका येथे परतली. येथे रॅलीचा उत्साहपूर्ण समारोप करण्यात आला.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठीत सवय

# ‘महाराष्ट्र देशाचे ग्रोथ इंजिन’ - सीएम फडणवीस



**मुंबई** - महाराष्ट्र देशातील सर्वात मोठी अर्थव्यवस्था असलेले राज्य असून यंदाच्या पहिल्या सहामाहीतील राज्याचा आर्थिक विकासदर जवळपास ८.८ टक्के असल्याचे त्यांनी सांगितले. प्रत्येक जिल्हा विकासाचे ‘ग्रोथ इंजिन’ बनविण्याचा शासनाचा प्रयत्न असून आतापर्यंत जवळपास १३ जिल्ह्यांनी निर्धारित लक्ष्य पूर्ण केले आहे. गडचिरोली, पालघर, नंदुरबार यांसह राज्यातील प्रत्येक भागात विकास पोहोचविण्यात सरकार कटिबद्ध आहे’, असे त्यांनी स्पष्ट केले.

‘विकसित भारताच्या संकल्पनेमध्ये राज्याची भूमिका अत्यंत महत्त्वाची असून महाराष्ट्र हे देशाच्या विकासाचे ‘ग्रोथ इंजिन’आहे. शेवटच्या घटकापर्यंत विकास पोहोचविण्यासोबतच महाराष्ट्राला कायमस्वरूपी दुष्काळमुक्त करण्याचा राज्य सरकारचा संकल्प आहे’, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शनिवारी मुंबईत केले.

देशाचे सीमांचे रक्षण करणाऱ्या जवानांना अभिवादन

स्वातंत्र्यसंग्राम सेनानी, क्रांतिकारक तसेच देशाच्या सीमांचे रक्षण करणाऱ्या जवानांना अभिवादन करून मुख्यमंत्र्यांनी राज्यातील जनतेला स्वातंत्र्यदिनाच्या शुभेच्छा दिल्या. मंत्रालयात भारताच्या ८०व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त झालेल्या मुख्य शासकीय समारंभात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले. ध्वजारोहणानंतर मुख्यमंत्री फडणवीस यांनी उपस्थित प्रशासकीय अधिकारी, सेनादलाचे अधिकारी, निमंत्रित नागरिक यांची भेट घेऊन शुभेच्छा दिल्या. यावेळी कौशल्य विकास मंत्री मंगल प्रभात लोढा, वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे, मुंबईच्या महापौर रितू तावडे, मुख्य सचिव राजेश अग्रवाल आदी उपस्थित होते.

‘पंतप्रधान नरेंद्र मोदीयांच्या नेतृत्वाखाली भारताने गेल्या १२ वर्षांत जगातील चौथ्या क्रमांकाची मोठी अर्थव्यवस्था होण्याचा टप्पा गाठला असून २५ कोटी नागरिकांना गरिबीतून बाहेर काढण्यात देशाला यश आले आहे. विकसित भारत म्हणजे केवळ विकसित अर्थव्यवस्था नव्हे, तर दीन-दलित, गोरगरीब, आदिवासी, शेतकरी, शेतमजूर आणि महिलांसह समाजातील प्रत्येक घटकाच्या जीवनात सकारात्मक परिवर्तन घडविणे महत्त्वाचे आहे’, असे मुख्यमंत्री म्हणाले.

‘शेतकऱ्यांसाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमाफी योजना राबविण्यात येत असून ५६ लाख शेतकऱ्यांना ३६ हजार कोटी रुपयांची कर्जमाफी देण्यात येत आहे. शेतकऱ्यांना दिवसा वीज उपलब्ध करून देण्याच्या दिशेनेही मोठी प्रगती झाली असून सध्या ७६ टक्के शेतकऱ्यांना दिवसा वीज मिळत आहे. पुढील वर्षभरात १०० टक्के शेतकऱ्यांना दिवसा वीज देण्याचा संकल्प पूर्ण करण्यात येईल’, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

‘महिला शेतकरी कायदा तयार करून त्यांना शेतकऱ्याचा दर्जा देण्याचा निर्णय घेणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे’, असे फडणवीस यांनी सांगितले. महिलांसह समाजातील वंचित घटकांच्या विकासासाठी लक्षित योजना राबवून सर्वांना सोबत घेऊन विकास साधण्याचा सरकारचा प्रयत्न असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. ‘युवकांसाठी जागतिक दर्जाचे शिक्षण, रोजगाराच्या संधी महाराष्ट्रातील युवकांना जागतिक दर्जाचे शिक्षण मिळावे यासाठी ‘एज्युसिटी’च्या माध्यमातून परदेशी विद्यापीठांना राज्यात आणले जात आहे. राज्यातील विद्यापीठांचा दर्जा उंचावण्यासोबतच आधुनिक आणि ‘कटिंग-एज’ शिक्षण उपलब्ध करून देण्याचे प्रयत्न सुरू आहेत. महाराष्ट्र देशाचे ‘स्टार्टअप कॅपिटल’ बनले असून राज्यात सर्वाधिक गुंतवणूक आणि परकीय गुंतवणूक होत आहे. त्यामुळे युवकांसाठी रोजगाराच्या मोठ्या प्रमाणावर संधी निर्माण होत आहेत’, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

# तृणमूलचे नेते आशिष बॅनर्जी यांनी पक्ष कार्यालयात जीवन संपवले



**नवी दिल्ली**- तृणमूल काँग्रेसचे नेते आणि पश्चिम बंगाल विधानसभेचे माजी उपाध्यक्ष आशिष बॅनर्जी यांनी रविवारी सकाळी त्यांच्या बीरभूम जिल्ह्यातील पक्ष कार्यालयात गळफास घेत आत्महत्या केली. ते माजी मंत्री आणि रामपूरहाटमधून पाच वेळा आमदार राहिले होते. त्यांनी लिहिलेली आत्महत्येची चिठ्ठीही घटनास्थळी सापडली आहे. आशिष बॅनर्जी यांनी २००१ ते २०२६ या काळात सलग २५ वर्षे या मतदारसंघाचं प्रतिनिधित्व केले होते. मात्र, २०२६ च्या पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीत बॅनर्जी यांचा भारतीय जनता पक्षाचे ध्रुव साहा यांच्याकडून पराभव झाला होता. आशिष बॅनर्जी यांनी काल (१५ ऑगस्ट) स्थानिक स्वातंत्र्यदिन सोहळ्यात भाग घेऊन तिथे तिरंगा फडकवला. तर, दुसऱ्याच दिवशी त्यांनी आपलं जीवन संपवले.

घटनेच्या ठिकाणी एक सुसाईड नोट देखील सापडली आहे. या पत्रात बॅनर्जी यांनी आपल्या राजकीय कारकिर्दीत कधीही भ्रष्टाचारात सामील नसल्याचे सांगत कोणतंही चुकीचे काम नसल्याचा दावा केला आहे.

त्यांनी तारापीठ रामपूरहाट विकास प्राधिकरणाशी संबंधित कथित गैरव्यवहारांच्या आरोपांचा संदर्भ दिला आहे. तिथे ते अध्यक्ष होते.

# अजय, शाहरुख, टायगरला तुकाराम मुंढेंचा दणका

## ‘विमल इलायची’च्या जाहिरातीबाबत कारणे दाखवा नोटीस



**मुंबई :** तुकाराम मुंढे यांच्या नेतृत्वातील अन्न आणि औषध प्रशासन विभागाने (एफडीए) बॉलिवूड अभिनेत्यांना दणका दिला आहे.

अजय देवगण, शाहरुख खान आणि टायगर श्रॉफ यांना ‘विमल इलायची’च्या जाहिरातीबाबत कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे. या जाहिरातीद्वारे राज्यात प्रतिबंधित असलेल्या ‘विमल पान मसाला’ची अप्रत्यक्ष जाहिरात (सरोगेट ॲडव्हर्टायझिंग) केली जात असल्याचा आरोप एफडीएने त्यांच्यावर केला आहे.

राज्यात तंबाखू आणि पान मसाल्याची विक्री आणि प्रसार रोखण्यासाठी महाराष्ट्र एफडीएने कारवाई तीव्र केली असून आता हे तीन अभिनेतेही प्रशासनाच्या रडारवर आले आहेत.

या आठवड्यात बजावण्यात आलेल्या नोटिशीद्वारे अजय देवगण, शाहरुख खान आणि टायगर श्रॉफ यांना या जाहिरातीतील त्यांच्या सहभागाबाबत स्पष्टीकरण देण्यास सांगण्यात आले आहे. एफडीएच्या मते, ही जाहिरात ‘विमल पान मसाला’ ब्रँडशी संबंधित असून ‘अन्न सुरक्षा आणि मानके कायदा, २००६’ (एफएसएस) अंतर्गत तंबाखूजन्य उत्पादनांची अप्रत्यक्ष जाहिरात ठरु शकते.

# ‘वंदे मातरम्’ वेळी सोनिया गांधींनी खर्गेंसाठी खुर्ची मागितली



## भाजपचा संताप, ‘गांधी घराण्याला संपूर्ण गायनाबाबत एवढी अस्वस्थता का?’

**मुंबई/नवी दिल्ली :** राजधानी दिल्लीत काँग्रेसच्या स्वातंत्र्य दिनाच्या कार्यक्रमावरुन शनिवारी वाद निर्माण झाला; ‘वंदे मातरम्’ गीत पूर्ण वाजवण्यास ज्येष्ठ नेत्या सोनिया गांधी यांनी आक्षेप घेतल्याचा आरोप भाजपने केला.

मात्र, काँग्रेसने स्पष्ट केले की, सोनिया गांधी केवळ पक्षाचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांच्यासाठी खुर्चीची मागणी करत होत्या. यावरुन भाजप उपाध्यक्ष केशव उपाध्ये यांनी गांधी घराण्याला ‘वंदे मातरम्’ॲलर्जी का?’ असा सवाल विचारला आहे.

‘गांधी घराण्याला ‘वंदे मातरम्’ची ॲलर्जी का? भारताच्या सांस्कृतिक चेतनेचे, सभ्यतागत वारशाचे आणि राष्ट्रभावनेचे प्रतीक असलेल्या ‘वंदे मातरम्’च्या संपूर्ण गायनावेळी काँग्रेसच्या सर्वोच्च नेतृत्वाच्या हावभावांनी अनेक प्रश्न निर्माण केले आहेत.’

‘व्हिडिओमध्ये सोनिया गांधी आणि त्यानंतर राहुल गांधी यांचे हावभाव कॅमेऱ्यात स्पष्टपणे दिसतात. स्वातंत्र्यदिनाच्या पवित्र दिवशी ‘वंदे मातरम्’ सुरू असताना नेमके हे हावभाव कशासाठी होते?’ असा सवाल केशव उपाध्ये यांनी ’एक्स’ सोशल मीडियावर विचारला आहे.

# शेख हसीना यांच्या प्रत्यर्पणाबाबत भारतीय न्यायालय घेणार निर्णय

## बांगलादेशशी पडद्यामागून चर्चा सुरू



बांगलादेशातील पदच्युत पंतप्रधान शेख हसीना यांच्या प्रत्यार्पणाची मागणी तारीक रहमान यांच्या नेतृत्वाखालील बांगलादेश सरकारकडून पुन्हा करण्यात आली आहे. मात्र, भारतातील उच्चपदस्थ सरकारी अधिकाऱ्यांनी स्पष्ट केलं आहे की, अशा प्रकारच्या प्रत्यार्पणाच्या विनंतीवर भारताच्या न्यायव्यवस्थेकडून निर्णय घेतला जाईल. हा निर्णय राजकीय किंवा राजनैतिक पातळीवर घेतला जाणार नाही. दरम्यान, ढाका आणि नवी दिल्ली यांच्यात हा प्रश्न अधिक टोकाच्या भूमिकेपासून दूर नेण्यासाठी सखोल चर्चा सुरू असल्याचंही अधिकाऱ्यांनी सांगितलं.

भारत सरकारमधील एका वरिष्ठ अधिकाऱ्याने द इंडियन एक्स्प्रेसला सांगितलं की, ‘प्रत्यार्पणाबाबतचा अंतिम निर्णय आपल्या न्यायालयांकडून घेतला जाईल. हा राजकीय किंवा राजनैतिक निर्णय असणार नाही. न्यायालयीन प्रक्रियेदरम्यान शेख हसीना यांच्यावर आरोप असलेले गुन्हे भारतीय कायद्यानुसारही गुन्हे ठरतात का, हे सिद्ध करावं लागेल.’

दुसऱ्या एका अधिकाऱ्याने सांगितलं की, शेख हसीना यांनी स्वतःच यावर्षी डिसेंबरमध्ये बांगलादेशात परतण्याचा मानस व्यक्त केला आहे. ५ ऑगस्ट रोजी झालेल्या पत्रकार परिषदेत त्यांना बांगलादेशात कधी परतणार, असा प्रश्न विचारण्यात आला होता. त्यावेळी १९७१ च्या बांगलादेश मुक्तिसंग्रामाचा संदर्भ देत त्यांनी म्हटलं होतं, ‘डिसेंबर हा आमचा विजयाचा महिना आहे. त्यामुळे मला डिसेंबरमध्ये मायदेशी परतायचं आहे.’

बांगलादेशात शेख हसीना यांना मृत्युदंडाची शिक्षा सुनावण्यात आली असून, त्यांच्या अवामी लीग पक्षावरही बंदी घालण्यात आली आहे. त्यामुळे त्यांचं प्रत्यार्पण करण्याची मागणी आणि दिल्ली-ढाका यांच्यातील सध्याचे राजनैतिक संबंध यांना वेगळं करता येणार नाही, असंही अधिकाऱ्याने सांगितलं. बांगलादेशचे पंतप्रधान तारीक रहमान यांच्या प्रत्यार्पणाच्या मागणीबाबत विचारलं असता, भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते यापूर्वी म्हणाले होते, ‘आम्ही या प्रकरणाचा आमच्या प्रस्थापित प्रक्रियेनुसार आढावा घेत आहोत. माझ्याकडे सांगण्यासारखी कोणतीही माहिती उपलब्ध झाल्यास मी ती कळवेन.’

परराष्ट्र मंत्रालयातील अधिकाऱ्यांनी द इंडियन एक्स्प्रेसला सांगितलं की, बांगलादेशने भारताकडे केलेल्या प्रत्यार्पणाच्या विनंतीसोबत २०१३ मध्ये दोन्ही देशांदरम्यान झालेल्या प्रत्यार्पण करारातील तरतुदींनुसार आवश्यक असलेली सर्व कायदेशीर कागदपत्रे जोडण्यात आली आहेत.

# हायअलर्ट असताना वाराणसी विमानतळावर गोळीबार



**वाराणसी** -लाल बहादूर शास्त्री आंतरराष्ट्रीय विमान तळावर (बाबतपूर) रविवारी सकाळी एका प्रवाशाच्या पिस्तुलातून अचानक गोळी सुटल्याने मोठी खळबळ उडाली. या अपघातात एका महिला कर्मचाऱ्यासह दोन कर्मचारी जखमी झाले आहेत. जखमींना तातडीने उपचारासाठी जवळच्या खासगी ट्रॉमा सेंटरमध्ये दाखल करण्यात आले असून पोलिसांनी प्रवाशाला ताब्यात घेतले आहे.

आजमगड येथील रहिवासी कमलेश राय हे पत्नीसह एअर इंडिया एक्सप्रेसच्या विमानाने मुंबईला जाण्यासाठी विमानतळावर पोहोचले होते. नियमानुसार, त्यांनी आपल्याकडील परवानाधारक पिस्तूल आणि मॅगझिनची माहिती सुरक्षा अधिकाऱ्यांना आधीच दिली होती. सकाळी सुमारे ९:३० वाजता विमानतळ सुरक्षा कक्षात शस्त्र आणि कागदपत्रांची तपासणी सुरू असताना पिस्तुलातून अचानक एक राउंड फायर झाला. पिस्तुलातून निघालेली गोळी आधी जमिनीवर (फरशीवर) आदळली आणि नंतर तिथे उपस्थित असलेल्या कर्मचाऱ्यांना लागली. यामध्ये रोहित राज यांच्या हाताला, तर गया (बिहार) येथील रहिवासी असलेल्या सुमन (वय ३२) यांच्या मांडीला गोळी लागली.

# ‘लेक लाडकी’ योजनेची अर्जप्रक्रिया सुलभ

**मुंबई :** मुलींच्या सक्षमीकरणासाठी राबवण्यात येणाऱ्या ‘लेक लाडकी’ योजनेचा लाभ अधिकाधिक पात्र मुलींना मिळावा, यासाठी अर्ज प्रक्रिया सुलभ करण्यात आली आहे. लाभार्थी मुलींच्या पालकांना आता ‘आपले सरकार’ पोर्टलद्वारे थेट ऑनलाइन अर्ज करता येणार आहे. अर्जासाठी आवश्यक कागदपत्रांची संख्याही कमी करण्यात येणार आहे. यामुळे अर्ज प्रक्रिया अधिक जलद आणि पारदर्शक होण्यास मदत होईल, अशी माहिती महिला व बालविकासमंत्री आदिती तटकरे यांनी दिली.

या योजनेसाठी १ एप्रिल २०२३ पासून पात्र ठरलेल्या लाभार्थ्यांना १५ ऑगस्ट २०२७ पर्यंत अर्ज करता येणार आहे. त्यानंतर पोर्टलवर नोंदणी होणाऱ्या नवीन प्रकरणांसाठी मुलीच्या जन्मानंतर एक वर्षाच्या आत अर्ज करणे आवश्यक राहणार आहे. नवीन सुलभ प्रक्रियेत आधार क्रमांकाच्या आधारे आवश्यक माहिती स्वयंचलितपणे प्राप्त होणार असून लाभार्थी, माता आणि पिता यांची ई-केवायसी करण्यात येणार आहे. त्यामुळे वारंवार कागदपत्रे सादर करण्याची आवश्यकता राहणार नाही. लाभ मिळवण्यासाठी पुन्हा अर्ज करण्याची गरज भासणार नाही.महिला व बालविकास विभागामार्फत ‘लेक लाडकी’ योजना मुलींच्या शिक्षणाला प्रोत्साहन देणे, त्यांचे सक्षमीकरण करणे आणि मुलींबाबत समाजात सकारात्मक दृष्टिकोन निर्माण करण्याच्या उद्देशाने राबवण्यात येत आहे. १ एप्रिल २०२३ रोजी किंवा त्यानंतर जन्मलेल्या मुलींना या योजनेअंतर्गत जन्मानंतर पाच हजार रुपये, पहिलीत प्रवेश घेतल्यानंतर सहा हजार रुपये, सहावीत प्रवेश घेतल्यानंतर सात हजार रुपये, अकरावीत प्रवेश घेतल्यानंतर आठ हजार रुपये आणि मुलगी १८ वर्षांची झाल्यानंतर ७५ हजार रुपये, असा एकूण एक लाख एक हजार रुपयांचा आर्थिक लाभ दिला जातो.

# संक्षिप्त

## जम्मू येथे देशसेवा बजावताना मंगळवेढ्याच्या जवानाला वीरमरण



**सोलापूर :** देशसेवेचे कर्तव्य बजावत असताना सोलापूर जिल्ह्यातील मंगळवेढा तालुक्यातील गणेशवाडी येथील जवान वैभव तात्यासाहेब आवताडे (वय ३१) यांना वीरमरण आले. भारतीय लष्कराच्या मराठा सिग्नल रेजिमेंटमध्ये कार्यरत असलेल्या या जवानाच्या निधनाची अधिकृत माहिती कुटुंबियांना देण्यात आली. या दुःखद बातमीने गणेशवाडीसह संपूर्ण मंगळवेढा तालुक्यावर शोककळा पसरली आहे.अत्यंत प्रतिकूल आर्थिक परिस्थितीतून संघर्ष करत वैभवेवत असताना त्यांना वीरमरण आले. वैभव हे काही दिवसांपूर्वीच सुट्टी संपवून पुन्हा कर्तव्यावर रुजू झाले होते. १३ ऑगस्टच्या रात्री सुमारे ११ वाजता त्यांनी पत्नी आणि आई-वडिलांशी दूरध्वनीवरून संवाद साधला होता. कुटुंबीयांची आपुलकीने विचारपूस करणारा हा संवाद त्यांचा शेवटचा ठरेल, याची कल्पना त्यावेळी कोणालाही नव्हती.

## मुंबईत हादरवणारी घटना!



**मुंबई**- नेव्ही नगर येथील निवासस्थानी १५ ऑगस्ट रोजी एक नौदल सैनिक, त्यांची पत्नी आणि त्यांची दोन मुले मृतावस्थेत आढळून आली आहेत. या घटनेमुळे पोलिसांनी सखोल तपास सुरू केला आहे.प्राथमिक माहितीनुसार, नौदल सैनिकाने स्वतःचे जीवन संपवल्याचा संशय आहे. दोन्ही मुलांचे मृतदेहही घराच्या आतच आढळून आले. प्रथमदर्शनी मिळालेल्या माहितीनुसार, मुलांच्या मृत्यूचं संभाव्य कारण अद्याप निश्चित झालेले नाही. शवविच्छेदन (पोस्ट-मॉर्टम) आणि फॉरेन्सिक तपासणीचे अहवाल आल्यानंतरच मृत्यूचे नेमकं कारण स्पष्ट होईल, असं अधिकाऱ्यांनी सांगितले आहे.

## एमपीएससीच्या पदभरतीमध्ये ऐतिहासिक अर्ज नोंदणी





**नागपूर:** महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने ‘महाराष्ट्र गट-क सेवा संयुक्त पूर्व परीक्षा २०२६’ च्या पदसंख्येत तब्बल ३ हजार ८८ पदांची मोठी वाढ जाहीर केली असून, यामुळे भरती प्रक्रियेतील एकूण पदांची संख्या आता थेट ५,७०७ वर पोहोचली आहे. या परीक्षेसाठी अर्ज सादर करण्यासाठी पूर्व नियोजित १० ऑगस्ट २०२६ ची मुदत वाढवून देण्यात आली होती. एमपीएससीने २५ जून २०२६ रोजी प्रसिद्ध केलेल्या मूळ जाहिरातीनुसार (क्र. ०१७/२०२६) सुरुवातीला २६१९ रिक्त पदांसाठी भरती जाहीर केली होती. परंतु सामान्य प्रशासन विभागाचा निर्णय आणि विविध विभागांकडून प्राप्त झालेल्या नवीन मागणीपत्रांनुसार आयोगाने अतिरिक्त ३०८८ पदांचा या परीक्षेत समावेश केला. यामुळे एकूण पदसंख्या ५,७०७ झाली असून यामध्ये बहुप्रतिक्षित तलाठी पदाचाही समावेश करण्यात आला आहे. या भरतीसाठी महाराष्ट्रातून तब्बल १२ लाख ६३ हजार विद्यार्थ्यांनी अर्ज केलेले आहेत त्यामुळे पाच हजार जागांसाठी प्रचंड मोठी स्पर्धा असल्याचे दिसून येते.

## जरांगे यांच्या टीकेच्या केंद्रस्थानी यापुढे भुजबळ ऐवजी बावनकुळे



**छत्रपती संभाजीनगर :** कोणत्याही पक्षाची बाजू घेऊन अंतरवली सराटी येथे येऊ नये असे आवाहन करत जरांगे यांनी सरकार विरोधाचा इरादा पुन्हा जाहीर केला. यावेळी बावनकुळे आणि संजय शिरसाठ या दोन मंत्र्यांवर टीका केली. जरांगे यांच्या पूर्वीच्या आंदोलनात छगन भुजबळ यांच्यावर टीका केली जात. आता मात्र नवे दोन मंत्री त्यांच्या टीकेच्या केंद्रस्थानी असल्याचे दिसून येत आहे. अंतरवली सराटीमध्ये आज मराठा आरक्षण प्रश्नांवरील अभ्यासकाची जरांगे यांनी बैठक बोलावली आहे. दिल्ली येथील आंदोलनास भेट देऊन आल्यानंतर आता आपण हिंदी शिकू आणि २०२९ मध्ये हिंदीमध्ये भाषण करू असेही त्यांनी जाहीर केले आहे.आपल्या पक्षाला चांगले म्हणणाऱ्यांनी येऊ नये, विसंगती करण्यासाठी येऊ नका.अशा अभ्यासकांनीही सोडणार नाही, असे जरांगे यांनी रविवारी पत्रकार बैठकीत सांगितले. हैदराबाद गॅझेटिअरनुसार सर्वांना प्रमाणपत्र घ्यायचे आहे. ज्यांची निवड झाली त्यांनी आपला अर्ज आणावेत. जे येऊ शकत नाहीत त्यांनी मुलांना पाठवावे आणि आरक्षण प्रमाणपत्र मिळेपर्यंत घरी जायचे नाही, असे ठरवून आंतरवलीस यावे असेही जरांगे म्हणाले.

## कंबरेला पिस्तूल घेऊन सर्रासपणे फिरला, बारामती पोलिसांना खबर




**बारामती :** बारामती शहरात बेकायदेशीर शस्त्रे बाळगून फिरणाऱ्या टोळक्याविरुद्ध कारवाई करताना बारामती शहर पोलिसांनी एका सराईत आरोपीला गावठी पिस्तूल आणि दोन जिवंत काडतुसांसह ताब्यात घेतले. प्रदीप सुरेश नकाते (वय २७, रा. महात्मा फुलेनगर, आमराई, बारामती) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. त्याच्यासोबत असलेले तीन संशयित पोलिसांची चाहूल लागताच पसार झाले असून, त्यांचा शोध सुरू आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ९ ऑगस्ट रोजी पोलीस शिपाई अक्षय सिताफ यांना नकाते हा कमरेला पिस्तूल घेऊन काही साथीदारांसह फिरत असल्याची माहिती मिळाली होती. साथीदारांकडेही घातक हत्यारे असल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी तातडीने वरिष्ठ अधिकाऱ्यांना याबाबत कळविले.

## ४९ दिवसांची गूढ कहाणी अखेर न्यायालयात संपली

**वडोदरा** - गुजरातमधील बहुचर्चित स्वीटी पटेल हत्याकांडाचा तब्बल पाच वर्षांनंतर निकाल लागला आहे. २०२१ मध्ये बेपत्ता झालेल्या स्वीटी पटेल यांच्या हत्या प्रकरणात वडोदरा जिल्ह्यातील करजण कोर्टाने त्यांचे पती आणि तत्कालीन पोलीस निरीक्षक अजय अमृत देसाईला दोषी ठरवत जन्मठेपेची शिक्षा सुनावली. या प्रकरणातील सहआरोपी किरीटसिंह जडेजा यालाही कोर्टाने पाच वर्षांच्या कारावासाची शिक्षा सुनावली आहे. १४ ऑगस्ट २०२६ रोजी हा निकाल देण्यात आला.

# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक २६० ■ सोमवार, १७ ऑगस्ट २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.


# शहरात चोरांचा धुमाकूळ; एकाच रात्री १० दुकाने फोडली

## व्यापाऱ्यांमध्ये दहशत, पोलिसांच्या रात्रीच्या गस्तीवर प्रश्नचिन्ह







**वर्धा जनमाध्यम:** स्वातंत्र्यदिनाचा उत्साह साजरा करून वर्धेकर गाढ झोपेत असताना चोरट्यांच्या टोळीने शहरात अक्षरशः धुमाकूळ घातला. मध्यरात्री सुमारे अडीच ते पहाटे चार वाजेपर्यंत चोरट्यांनी शहरातील विविध भागांतील दुकानांना लक्ष्य करीत तब्बल १० दुकानांचे शटर फोडले. काही दुकानांमधून रोख रक्कम व साहित्य लंपास करण्यात आले, तर बॅचलर रोडवरील मगन संग्रहालयाजवळील सराफा दुकानातून जवळपास १० किलो चांदी चोरीला गेल्याची प्राथमिक माहिती आहे. रविवारी सकाळी एकापाठोपाठ एक दुकानफोडीच्या घटना उघडकीस येताच शहरात खळबळ उडाली. व्यापाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, चोरट्यांना हुडकून काढण्याचे मोठे आव्हान पोलिसांसमोर उभे ठाकले आहे.

**रामनगर हद्दीत पाच दुकानांना लक्ष्य-** रामनगर पोलिस ठाण्याच्या हद्दीतील धुनीवाले मठ ते प्रियदर्शिनी महाविद्यालयाकडे जाणाऱ्या मार्गावर चोरट्यांनी तब्बल पाच दुकानांचे शटर फोडले. प्रकाश माखिजानी यांच्या व्यावसायिक प्रतिष्ठानाचे शटर तोडून चोरट्यांनी सुमारे ४० हजार रुपयांची रोख रक्कम लंपास केली. त्यानंतर राजेश माखिजानी व महेश माखिजानी यांच्या दुकानांनाही लक्ष्य करण्यात आले. दोन्ही दुकानांचे शटर फोडून काही साहित्य चोरून नेण्यात आल्याची माहिती आहे.

याच परिसरातील वसीम अक्रम पठाण यांच्या 'डेली निड्स' दुकानाचेही शटर फोडण्यात आले. येथून सुमारे दोन हजार रुपये रोख चोरून नेण्यात आले. चोरट्यांनी उमेश भोयर यांच्या किराणा दुकानाचेही शटर फोडले; मात्र येथे त्यांच्या हाती काही लागले नाही.

चोरीचे सत्र यावर थांबले नाही. बॅचलर रोडवरील भोयर महाविद्यालयाजवळील पंकज मुरारका यांच्या व्यावसायिक प्रतिष्ठानाचे शटरही फोडण्यात आले. येथेही चोरट्यांनी चोरी करण्याचा प्रयत्न केला; मात्र विशेष माल हाती लागला नसल्याची माहिती आहे.

**सराफा दुकानातून १० किलो चांदी लंपास**

यानंतर चोरट्यांनी बॅचलर मार्गावरील स्टेट बँक जवळील दिनेश बोधनकर यांच्या सराफा दुकानाला लक्ष्य केले. दुकानाचे शटर फोडून आत प्रवेश केलेल्या चोरट्यांनी मोठ्या प्रमाणावर चांदीचा माल लंपास केला. पोलिसांच्या प्राथमिक माहितीनुसार, जवळपास १० किलो चांदी चोरीला गेल्याचे सांगण्यात येत आहे. या चोरीमुळे व्यापारी वर्गात अधिकच खळबळ उडाली आहे.

**शहर पोलिसांच्या हद्दीतही दुकानफोडी-** रामनगर परिसरात धुमाकूळ घातल्यानंतर चोरट्यांनी शहर पोलिस ठाण्याच्या हद्दीतही मोर्चा वळविला. नागपूर मार्गावरील गिरिराज ऑटो, नालवाडी येथील जिजाऊ मेडिकल आणि एका मोबाइल दुकानाचे शटर फोडण्यात आले. या तिन्ही ठिकाणी चोरी करण्याचा प्रयत्न झाल्याचे सांगण्यात येत आहे.

**कान्हापुरातही मोबाइल शॉपी फोडली-** वर्धा शहरातील दुकानफोडीनंतर चोरट्यांनी सेलू पोलिस ठाण्याच्या हद्दीतील कान्हापूरकडे मोर्चा वळविला. तेथे एका मोबाइल दुकानाचे शटर फोडून चोरट्यांनी दोन पॉवर बँक, हेडफोन सेट आणि कीपॅड असलेले चार मोबाइल असा सुमारे १० हजार रुपयांचा मुद्देमाल लंपास केला.

**चोरट्यांची पोलिसांना उघड आव्हान ?-** एकाच रात्री शहरातील विविध भागांत तब्बल दहा दुकाने फोडली जाणे ही साधी चोरीची घटना नसून पोलिसांच्या सुरक्षा व्यवस्थेलाच आव्हान असल्याची भावना व्यापाऱ्यांमध्ये व्यक्त होत आहे. विशेष म्हणजे शहरातील प्रमुख मार्गांवर, वर्दळीच्या रस्त्यांवर आणि बँकेच्या परिसरालगत असलेल्या दुकानांनाही चोरट्यांनी लक्ष्य केले.

स्टेट बँकेला लागून असलेल्या इंदिरा सद्भावना भवन परिसरातील रस्त्यालगतच्या सराफा दुकानावर चोरट्यांनी डल्ला मारला. त्यामुळे पोलिसांच्या रात्रीच्या गस्तीवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. रात्री पोलिसांची प्रभावी गस्त सुरू असती तर चोरट्यांना एकापाठोपाठ एवढी दुकाने फोडण्याचे धाडस झाले असते का, असा प्रश्न व्यापारी व नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. शहरात महत्त्वाच्या ठिकाणी पोलिसांची गस्त असते, असा दावा केला जात असला तरी प्रत्यक्षात चोरटे अडीच ते चार या वेळेत जवळपास दीड तास विविध भागांत फिरून दुकानांची शटर फोडतात आणि चोरी करून पसार होतात, ही बाब सुरक्षा व्यवस्थेसाठी गंभीर ठरली आहे. गस्तीचे वाहन नेमके कोणत्या भागात होते? संशयास्पद हालचाली पोलिसांच्या नजरेस का पडल्या नाहीत? असे प्रश्न आता उपस्थित होत आहेत.

**सीसीटीव्हीत पाच चोरटे कैद-** दुकानफोडी करणाऱ्या टोळीच्या हालचाली काही दुकानांतील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांमध्ये कैद झाल्या आहेत. काही ठिकाणी चोरट्यांनी सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची तोडफोड करण्याचा प्रयत्न केला. मात्र काही फुटेजमध्ये दोन दुचाकींवरून पाच चोरटे जाताना दिसून आल्याची माहिती आहे. त्यामुळे पोलिसांकडून सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे टोळीचा माग काढण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

चोरट्यांनी सर्व घटना मध्यरात्री सुमारे २.३० ते पहाटे ४ वाजेच्या दरम्यान केल्याची प्राथमिक माहिती आहे. त्यामुळे चोरीपूर्वी परिसराची रेकी करण्यात आली होती का, चोरट्यांना दुकानांची माहिती होती का, या दिशेनेही तपास सुरू आहे.

**श्वान पथक, फॉरेन्सिक आणि ठसे तज्ज्ञांची पाहणी-** चोरीच्या घटनांची माहिती मिळताच पोलिस यंत्रणा खडबडून जागी झाली. अपर पोलिस अधीक्षक सदाशिव वाघमारे, उपविभागीय पोलिस अधिकारी सुनील महाडीक, शहर पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक नागेशकुमार चतरकर, रामनगर पोलिस ठाण्याच्या ठाणेदार पौर्णिमा राखुंडे यांच्यासह वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली.

घटनास्थळी श्वान पथक, फॉरेन्सिक पथक आणि ठसे तज्ज्ञांना पाचारण करण्यात आले. दुकानांचे शटर, परिसरातील वस्तू आणि इतर ठिकाणांहून चोरट्यांचे ठसे मिळतात का, याची तपासणी करण्यात आली. सीसीटीव्ही फुटेजही पोलिसांकडून ताब्यात घेण्यात येत आहे.

**चोरट्यांच्या शोधार्थ सात पथके रवाना-** एकापाठोपाठ झालेल्या दुकानफोडीच्या घटनांनंतर पोलिस विभाग ॲक्शन मोडवर आला आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या निर्देशानुसार रामनगर पोलिसांची दोन, शहर पोलिसांची दोन, स्थानिक गुन्हे शाखेची दोन आणि सेलू पोलिसांची एक, अशा एकूण सात पथकांची स्थापना करून ती विविध दिशांनी चोरट्यांच्या शोधार्थ रवाना करण्यात आली आहेत. शहरासह परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले जात असून, संशयितांच्या हालचालींचा माग काढला जात आहे. चोरीच्या पद्धतीवरून या घटनांमागे एकाच टोळीचा हात आहे का, याचाही तपास सुरू आहे.

**व्यापाऱ्यांमध्ये असुरक्षिततेची भावना-** एकाच रात्री एवढ्या मोठ्या प्रमाणावर दुकानफोडी झाल्याने व्यापाऱ्यांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे. दुकानांमध्ये लाखो रुपयांचा माल असताना रात्रीच्या वेळी पोलिस गस्तीवरच व्यापाऱ्यांचा मोठा आधार असतो. मात्र चोरट्यांनी सलग दुकाने फोडून पोलिसांच्या सुरक्षा व्यवस्थेवरच प्रश्नचिन्ह निर्माण केले आहे.

चोरट्यांनी दुकाने फोडली; पण त्याहून मोठा प्रश्न वर्धा शहराच्या सुरक्षा व्यवस्थेचा आहे. एकाच रात्री दहा दुकानांचे शटर तुटत असताना पोलिस यंत्रणेला या टोळीची चाहूल का लागली नाही, याचे उत्तर आता पोलिसांनाच द्यावे लागणार आहे. चोरट्यांना लवकरात लवकर जेरबंद करून व्यापाऱ्यांचा विश्वास पुन्हा मिळविण्याचे आव्हान पोलिसांसमोर आहे.

# तीन मैत्रिणींचा प्रवास ठरला अखेरचा

## श्वानामुळे दुचाकी अनियंत्रित; ट्रॅव्हल्सच्या चाकाखाली तिघींचा करुण अंत



**हिंगणघाट जनमाध्यम :** स्वातंत्र्यदिनाचा उत्साह अवघ्या शहरात शिगेला पोहोचला असतानाच हिंगणघाट शहरात काळजाचा थरकाप उडविणारी दुर्घटना घडली. दुचाकीसमोर अचानक श्वान आडवा आल्याने दुचाकीवरील तिन्ही विद्यार्थिनी रस्त्यावर कोसळल्या. त्याचवेळी मागून आलेल्या ट्रॅव्हल्सच्या चाकाखाली त्या आल्याने तिन्ही कोवळ्या जीवांचा घटनास्थळीच दुर्दैवी मृत्यू झाला. शनिवारी सकाळी साडेनऊच्या सुमारास बसस्थानक ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर शाळा मार्गावरील साखरकर कॉम्प्लेक्सजवळ हा भीषण अपघात झाला. या घटनेने हिंगणघाट शहरावर शोककळा पसरली.

मिसबा जावेद शेख (१७), टाका मज्जीद संत चोखोबा वार्ड, आरोही अनुप चौरे (१६), रा. स्वीपर कॉलनी आणि समृद्धी रूपक धामसे (१६) संत गोमाजी वार्ड, अशी मृत विद्यार्थिनींची नावे आहेत.

मिसबा, आरोही आणि समृद्धी या तिन्ही मैत्रिणी एमएच-३२ ए.डब्ल्यू. ५७७९ क्रमांकाच्या बाईकने डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा चौकाकडून डॉ. बाबासाहेब आंबेडकर शाळेकडे जात होत्या. साखरकर कॉम्प्लेक्सजवळ त्यांची दुचाकी आली असता अचानक श्वान आडवा आला. त्यामुळे दुचाकीवरील नियंत्रण सुटले आणि तिघीही रस्त्यावर कोसळल्या.

दरम्यान, त्याच मार्गाने एमएच-४९ ए.टी. ३४३८ क्रमांकाची ट्रॅव्हल्स जात होती. दुचाकीवरून रस्त्यावर कोसळलेल्या तिघीही ट्रॅव्हल्सच्या चाकाखाली आल्या. काही क्षणांतच झालेल्या या भीषण अपघातात मिसबा, आरोही आणि समृद्धी यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. अपघाताचे दृश्य पाहून उपस्थितांच्या अंगावर अक्षरशः शहारे आले.

घटनेची माहिती मिळताच हिंगणघाट पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली.

पोलिसांनी पंचनामा करून तिन्ही मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी उपजिल्हा रुग्णालयात पाठविले. अपघातग्रस्त दुचाकी आणि ट्रॅव्हल्स पोलिसांनी ताब्यात घेतली असून या प्रकरणाची नोंद हिंगणघाट पोलिसांनी केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

### एसडीपीओंनी घटनास्थळ गाठले; आमदारांकडून कुटुंबीयांचे सांत्वन

या अपघातात दगावलेल्या मिसबा शेख आणि समृद्धी ठामसे या डॉ. बाबासाहेब आंबेडकर ज्युनिअर कॉलेजच्या विज्ञान शाखेतील अकरावीच्या विद्यार्थिनी होत्या, तर आरोही चौरे ही मोहता विद्यालयाची विद्यार्थिनी होती. तिन्ही मैत्रिणी एकत्र दुचाकीवरून जात असतानाच काळाने त्यांच्यावर झडप घातली. अपघाताची माहिती मिळताच उपविभागीय पोलिस अधिकारी सुशिल कुमार नायक आणि पोलिस निरीक्षक अनिल राऊत यांनी घटनास्थळी धाव घेत पाहणी केली. पोलिसांनी परिस्थिती नियंत्रणात घेत पुढील कारवाई सुरू केली. दरम्यान, भीषण अपघाताची माहिती मिळताच आमदार समीर कुणावार यांनी उपजिल्हा रुग्णालय गाठले. त्यांनी मृत विद्यार्थिनींच्या कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले.

### तीन कुटुंबांवर दुःखाचा डोंगर

स्वातंत्र्यदिनाच्या आनंदात शाळा-कॉलेजकडे निघालेल्या तीन मैत्रिणींचा प्रवास अखेरचा ठरला. अवघ्या १५ ते १७ वर्षांच्या या विद्यार्थिनींच्या अकाली मृत्यूने त्यांच्या कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला असून, हिंगणघाट शहरात हळहळ व्यक्त होत आहे. रस्त्यावर अचानक येणाऱ्या मोकाट श्वानांचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

# अज्ञात वाहनाच्या धडकेत युवकाचा मृत्यू; चालक पसार



**हिंगणघाट जनमाध्यम :** नागपूरकडे जाणाऱ्या मार्गावर अज्ञात वाहनाने दुचाकीला दिलेल्या जोरदार धडकेत २८ वर्षीय तरुणाचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना १४ ऑगस्ट रोजी रात्री घडली. करमजित लालसिंग बावरी (वय २८, रा. संत चोखोबा वार्ड, हिंगणघाट) असे मृत तरुणाचे नाव आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, १४ ऑगस्ट रोजी रात्री सुमारे ९.१५ ते ९.३५ वाजताच्या दरम्यान करमजित हा दुचाकीने नागपूरकडे जाणाऱ्या मार्गावरून जात होता. गिमा टेक्स कंपनीजवळील गोविंद राठी कंपनीच्या गेटसमोर अज्ञात वाहनाने त्याच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. या अपघातात करमजित गंभीर जखमी झाला. अपघाताची तीव्रता लक्षात येण्यापूर्वीच अज्ञात वाहनचालक वाहनासह घटनास्थळावरून पसार झाला.

दरम्यान, गंभीर जखमी अवस्थेतील करमजित याला उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. या घटनेमुळे संत चोखोबा वार्ड परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

या प्रकरणी गुरमितसिंग नानकसिंग जुणी (वय १८, रा. डॉ. आंबेडकर चौक, वडनेर) यांच्या तक्रारीवरून हिंगणघाट पोलिसांनी अज्ञात वाहनचालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांकडून घटनास्थळाची पाहणी करून अज्ञात वाहनाचा शोध घेण्यात येत असून, परिसरातील सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे वाहनचालकाचा माग काढण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

# जनमाध्यमच्या दणक्याने प्रशासन जागे;

# जिल्हाधिकारी कार्यालयावरील राजकीय बॅनर हटवले



**वर्धा जनमाध्यम :** शासकीय इमारतीच्या आवारात राजकीय बॅनरबाजी करून नियमांची पायमल्ली करण्याचा प्रकार समोर आल्यानंतर अखेर प्रशासनाला जाग आली. वर्धा जिल्हाधिकारी कार्यालयाच्या कंपाउंडवर महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या स्वागतासाठी काही कार्यकर्त्यांनी लावलेले बॅनर दैनिक जनमाध्यमने उघडकीस आणल्यानंतर प्रशासनाने तातडीने हटविले. त्यामुळे सत्तेच्या स्वागतासाठी सरकारी जागेचा वापर करण्याच्या प्रकाराला अखेर ब्रेक लागला.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या गेटवर भाजपचा दरबार या मथळ्याखाली दैनिक जनमाध्यमने ही बातमी प्रकाशित केली होती. शासकीय इमारतींच्या भिंती, कंपाउंड किंवा परिसरात राजकीय स्वरूपाचे बॅनर लावण्यास नियमांनुसार निर्बंध असतानाही हा प्रकार घडल्याने प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले होते. बातमी प्रसिद्ध होताच प्रशासनाने हालचाली सुरू करून बॅनर हटविले. मात्र या संपूर्ण प्रकरणात विरोधकांची भूमिका अधिकच संशयास्पद ठरली आहे. सत्ताधाऱ्यांच्या या बॅनरबाजीची माहिती असूनही विरोधकांनी आवाज उठविण्याऐवजी बघ्याची भूमिका घेतल्याचे चित्र आहे. जनतेच्या प्रश्नांवर सरकारला धारेवर धरण्याचा दावा करणारे विरोधक या प्रकरणात मात्र एकमेकांकडे बोट दाखवित असल्याची चर्चा आहे. शासकीय वास्तू ही कोणत्याही पक्षाची मालमत्ता नसून ती जनतेच्या पैशातून उभी राहिलेली सार्वजनिक व्यवस्था आहे. त्यामुळे राजकीय स्वागतासाठी तिचा वापर करण्याचा प्रकार गंभीर असताना प्रशासनाने कारवाई करण्यास विलंब का केला, असा प्रश्न उपस्थित होत आहे. जनमाध्यमच्या बातमीने प्रशासनाला जाग आणली; बॅनर हटले. पण नियमभंग करणाऱ्यांवर कारवाई होणार का हा प्रश्न आता जनतेतून उपस्थित केला जात आहे. केवळ बॅनर हटविणे पुरेसे नसून नियम सर्वांसाठी समान आहेत, हे प्रशासनाने कृतीतून दाखवावे, अशी मागणी होत आहे.

# एटीएममध्ये हातचलाखी; वृद्धासह दोघांना दीड लाखांचा चुना

## कार्डची अदलाबदल करून खात्यावर डल्ला; हिंगणघाटात दोन भामट्यांचा धुमाकूळ



**हिंगणघाट जनमाध्यम :** एटीएममधून पैसे काढण्यासाठी गेलेल्या ग्राहकांच्या असहायतेचा फायदा घेत दोन भामट्यांनी एटीएम कार्डची अदलाबदल केली आणि काही क्षणांतच त्यांच्या खात्यांवर डल्ला मारला. या प्रकारात दोन ग्राहकांना तब्बल १ लाख ५३ हजार ३०० रुपयांचा आर्थिक फटका बसला. तुकडोजी चौक परिसरातील ?क्सिस बँकेच्या एटीएममध्ये हा प्रकार घडला असून, या प्रकरणी हिंगणघाट पोलिसांनी अज्ञात दोन युवकांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

शिरूड येथील मोहनदास उरकुडकर (७०) हे तुकडोजी चौकातील ?क्सिस बँकेच्या एटीएममध्ये पैसे काढण्यासाठी गेले होते. यावेळी एटीएममध्ये उपस्थित असलेल्या दोघांनी त्यांना बोलण्यात गुंतवून अथवा हातचलाखीने त्यांच्या एटीएम कार्डची अदलाबदल केल्याचा संशय आहे. कार्ड बदलल्यानंतर चोरट्यांनी त्यांच्या खात्यातून तब्बल १ लाख ४३ हजार रुपये काढून घेतले. याच टोळीने प्रभाकर वैद्य यांचेही एटीएम कार्ड बदलून त्यांच्या खात्यातून १० हजार ३०० रुपये काढले. अशाप्रकारे दोघांच्या खात्यांवर डल्ला मारत भामट्यांनी एकूण १ लाख ५३ हजार ३०० रुपये लंपास केले. रक्कम खात्यातून वजा झाल्याचे लक्षात आल्यानंतर दोन्ही ग्राहकांना आपली फसवणूक झाल्याचे समजले. त्यांनी तातडीने पोलिसांत तक्रार दाखल केली. त्यावरून हिंगणघाट पोलिसांनी फसवणुकीच्या कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे.

एटीएममध्ये अनोळखी व्यक्तींची मदत घेणे टाळा, कार्ड कोणाच्याही हातात देऊ नका आणि व्यवहारानंतर कार्ड आपलेच आहे ना, याची खात्री करा, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे. दरम्यान, एटीएममधील सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे संशयितांचा शोध सुरू असून पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक हरिहर सोनकुसरे करीत आहेत.

# मृत्यू समोर उभा; शेतमजुराची वाघाशी थरारक झुंज

## आरडाओरड आणि धैर्यामुळे वाघाने घेतली माघार

**हिंगणघाट जनमाध्यम :** डोळ्यांसमोर साक्षात मृत्यू उभा ठाकला. अंगावर वाघाने झडप घातली. तरीही ५५ वर्षीय शेतमजुराने हिंमत सोडली नाही. जीवाच्या आकांताने वाघाशी झुंज देत त्याने केलेल्या आरडाओरडीमुळे अखेर वाघाने माघार घेत जंगलाच्या दिशेने धूम ठोकली. या थरारक प्रसंगात गजानन सूर्यभान नागोसे जखमी झाले. त्यांच्यावर हिंगणघाट उपजिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत. ही घटना शनिवारी दुपारी धामनगाव (सातेफळ) तलाव परिसरात घडली.

गजानन नागोसे हे सकाळी सुमारे १० वाजता शेळ्या घेऊन जंगलालगतच्या भागात गेले होते. दुपारी साडेएकच्या सुमारास शेळ्या चरत असताना दबा धरून बसलेल्या वाघाने अचानक त्यांच्यावर हल्ला केला. क्षणभर नागोसे यांना काहीच कळले नाही. मात्र, संकटाची चाहूल लागताच त्यांनी प्रसंगावधान राखत वाघाचा प्रतिकार केला.

वाघाच्या हल्ल्याने नागोसे यांच्या मांडीवर, डोक्यावर आणि पाठीवर जखमा झाल्या. रक्तबंबाळ अवस्थेतही त्यांनी मोठमोठ्याने आरडाओरड केली. त्यांच्या प्रतिकाराने व आवाजाने वाघ काही क्षणांत मागे हटला आणि जंगलात पसार झाला. त्यामुळे नागोसे यांचा जीव थोडक्यात बचावला. घटनेनंतर जखमी नागोसे यांना तातडीने उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. या घटनेने धामनगाव परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, जंगलालगत शेती व पशुपालन करणाऱ्या नागरिकांमध्ये चिंतेचे सावट पसरले आहे.

# पत्रकारितेचा निर्भीड आवाज हरपला; अनुप कुमार भार्गव यांचे निधन

## नागपूर येथे उपचारादरम्यान अखेरचा श्वास, आज स. १० वाजता अंत्ययात्रा



**पुलगाव जनमाध्यम :** पुलगावच्या पत्रकारिता क्षेत्रातील परिचित व्यक्तिमत्त्व आणि एका दैनिकाचे संपादक अनुप कुमार भार्गव यांचे रविवारी दुपारी अडीच वाजता नागपूर येथे उपचारादरम्यान दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाने पुलगावसह वर्धा जिल्ह्यातील पत्रकारिता, सामाजिक आणि विविध क्षेत्रांत शोककळा पसरली आहे.

भार्गव कुटुंबावर नियतीने अवघ्या आठ दिवसांतच दुसरा मोठा आघात केला आहे. आठ दिवसांपूर्वीच अनुप कुमार भार्गव यांच्या मातोश्रींचे निधन झाले होते. मातोश्रींच्या निधनाचे दुःख सावरण्याचा प्रयत्न सुरू असतानाच रविवारी अनुप कुमार यांच्या निधनाची दुःखद बातमी समोर आली. त्यामुळे संपूर्ण भार्गव कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून, या दुहेरी आघाताने कुटुंबीय, नातेवाईक आणि मित्रपरिवार हळहळला आहे. अनुप कुमार भार्गव यांनी पत्रकारितेच्या माध्यमातून पुलगाव आणि परिसरातील विविध प्रश्नांना सातत्याने वाचा फोडली. संपादक म्हणून त्यांनी स्थानिक घडामोडींना व्यासपीठ देत जनतेच्या प्रश्नांना आवाज देण्याचे काम केले. त्यांच्या निधनाने पत्रकारिता क्षेत्रातील एक सक्रिय आणि संवेदनशील आवाज हरपल्याची भावना व्यक्त होत आहे.

अनुप कुमार भार्गव हे ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. अशोक कुमार भार्गव यांचे बंधू होते. भार्गव कुटुंबाचा सामाजिक क्षेत्रातील परिचय असून, अनुप कुमार यांच्या निधनाने कुटुंबावर आणखी एक मोठे दुःख कोसळले आहे. त्यांच्या पश्चात तीन भाऊ, पत्नी, चार मुली, जावई असा मोठा परिवार आहे.

अनुप कुमार भार्गव यांच्या पार्थिवावर आज सोमवार १७ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता पुलगाव येथील निवासस्थानावरून अंत्ययात्रा निघणार आहे.

# वणा नदीपात्रात ४४ वर्षीय व्यक्तीचा मृतदेह आढळला

**हिंगणघाट जनमाध्यम :** संत कबीर वॉर्डातील ४४ वर्षीय व्यक्तीचा मृतदेह वणा नदीच्या पात्रात आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली. प्रथमदर्शनी पाण्यात बुडून मृत्यू झाल्याचे दिसत असले, तरी मृत्यू नेमका कोणत्या परिस्थितीत झाला, याचा तपास हिंगणघाट पोलिसांकडून सुरू आहे. मृत व्यक्तीचे नाव प्रितम रामभाऊजी वाकोडे (वय ४४, रा. संत कबीर वॉर्ड, हिंगणघाट) असे आहे. पोलिसात दाखल तोंडी तक्रारीनुसार, प्रितम वाकोडे हे रोजमजुरीचे काम करीत होते. १४ ऑगस्ट रोजी सकाळी साडेदहा वाजताच्या सुमारास ते दारूच्या नशेत घरी आले. त्यानंतर काही वेळाने ते घराबाहेर पडले. मात्र, रात्री उशिरापर्यंत घरी परतले नसल्याने नातेवाईक व परिचितांनी त्यांचा शोध सुरू केला.

१५ ऑगस्ट रोजी सकाळपासून शोध सुरू असताना दुपारी एक वाजताच्या सुमारास वणा नदीच्या पात्रात एक व्यक्ती मृतावस्थेत पडल्याची माहिती मिळाली. पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून मृतदेह बाहेर काढला. पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी उपजिल्हा रुग्णालयात पाठविण्यात आला. प्राथमिक अहवालानुसार पाण्यात बुडून मृत्यू झाल्याचे नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणी मर्ग डायरी क्र. ०१/२०२६ नोंदविण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे.


## संपादकीय

**प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे**

# विरोधकांकडून लोकशाही वेठीस!

संसद ही चर्चा करून प्रश्न सोडविण्याची जागा, कुस्तीचा आखाडा नव्हे. पण, चर्चेसाठी विरोधकांकडे सबळ मुद्दा असावा लागतो आणि त्याची सशक्तपणे मांडणीदेखील करावी लागते. विरोधात असताना एकट्या देवेंद्र फडणवीस यांनी तत्कालीन सरकारला सळो की पळो करून सोडले होते, यावरून विरोधकांची ताकद लक्षात येते. मात्र, इतके कष्ट घेण्यापेक्षा संसदेचे कामकाजच गदारोळातून बंद पाडून विरोधकांनी लोकशाहीला वेठीस धरण्याचा नतद्रष्टपणा केला, हे केवळ दुर्दैवीच! वाहतूक असो की सरकारी काम, ते बंद पाडण्यात तुम्हाला यश आले, तर तुम्ही नेते, अशी भारतात नेतेपणाची काहीशी अघोषित व्याख्या. ही विचारसरणी खरं तर स्वातंत्र्यपूर्व काळातील. तेव्हा देशावर परक्या ब्रिटिशांचे राज्य असल्याने त्या सरकारच्या कामात अडथळा निर्माण करणे, ही स्वातंत्र्यसैनिकांची नेहमीची रणनीती होती आणि ती त्या लढ्याला पोषक व समर्थनीयही होती. पण, स्वातंत्र्यानंतरही तीच विचारसरणी कवटाळून बसल्याने देशाच्या प्रगतीत मोठी बाधा येते, याची जाणीवच भारतातील विरोधी नेत्यांना झालेली नाही. किंबहुना, त्यांना देशहितापेक्षा आपल्या पक्षीय हिताचीच चिंता अधिक. म्हणूनच संसदेचे पावसाळी अधिवेशन काल विरोधकांच्या गोंधळात संपुष्टात आले, यात नवल नाही. काही दिवसांपूर्वी 'जंतरमंतर'वर 'नीट' पेपरफुटीच्या विरोधात 'कॉकरोच जनता पार्टी'ने आंदोलन केले. प्रारंभी त्या आंदोलनाला सामान्य जनतेचा तितकासा प्रतिसादही मिळत नव्हता. पण, आम आदमी पार्टी आणि डाव्या संघटनांनी आपल्या भाडोत्री कार्यकर्त्यांच्या मदतीने तेथे झुंडीचे राजकारण सुरू केले आणि मोदी सरकारला घेरण्याचा डाव आखला. शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीवरून या डाव्या इकोसिस्टमने विद्यार्थी आंदोलनाच्या आमिषाने राजधानीत कायदा-सुव्यवस्थेची स्थिती उत्पन्न केली आणि दिल्लीत हिंसाचार फैलावू नये, यासाठी सरकारला प्रधान यांचा राजीनामा घ्यावा लागला. त्यामुळे हे आंदोलन संपले, मात्र प्रधान यांच्या राजीनाम्याचे श्रेय 'कॉकरोच जनता पार्टी'ला मिळाल्याने, काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांचे पित्त खवळले आणि त्यांनी आपले स्वतंत्र आंदोलन सुरू ठेवले. म्हणूनच आता त्यांनाही पंतप्रधान आणि गृहमंत्र्यांचाच राजीनामा हवा आहे आणि त्यासाठी त्यांनी नेहमीप्रमाणे खोटे 'नॅरेटिव्ह' उभे करण्याचा केविलवाणा प्रयत्न केला. आंदोलनकर्त्या विद्यार्थ्यांवर पॅलेट गनने गोळीबार केला आणि खिळे लावलेल्या लाठ्यांनी त्यांना मार देण्यात आला, असा आरोप करून त्यांनी संसदेचे कामकाज बंद पाडले. अधिवेशनाच्या प्रारंभी काँग्रेसने केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी या लाठीमाराबद्दल निवेदन देण्याची मागणी केली. सरकारने या प्रकरणी संसदेत सविस्तर चर्चेची तयारी दर्शविल्यावर मात्र राहुल गांधींचे हे खोटे आणि उसने अवसान गळून पडले. कारण, पॅलेट गन आणि खिळे लावलेल्या लाठ्यांचा वापर झालाच नव्हता, ही गोष्ट तपासात स्पष्ट झाली. शिवाय, या विद्यार्थ्यांच्या आंदोलनात घुसून काही समाजकंटकांनी पोलिसांवर आणि अन्य सुरक्षा कर्मचाऱ्यांवर भीषण हल्ले केले. त्यावरही प्रकाश पडला असता. त्या हल्ल्यांचे व्हिडिओ फुटेज पोलिसांकडे आहेत. संसदेत अमित शाह यांनी ही सारी वस्तुस्थिती मांडली असती, तर काँग्रेसची अब्रू धुळीस मिळाली असती आणि तिचे कारस्थान उघड झाले असते. आधी अमित शाह यांनी संसदेत निवेदन द्यावे, यावर ठाम असलेल्या काँग्रेसने, शाह यांनी त्याची तयारी दाखविल्यावर गोलपोस्ट बदलला! 'आम्हाला शाह यांचा उपदेश ऐकायचा नाही, त्यांनी राजीनामाच दिला पाहिजे,' अशी नवी मागणी राहुल गांधी यांनी केली. त्यावरून संसदेला ओलीस धरले. एरव्ही 'लोकसभेत बोलू दिले जात नाही, पंतप्रधान नरेंद्र मोदी हुकुमशहा आहेत, ते लोकशाही नष्ट करीत आहेत, संसदेत माझ्यासमोर बोलण्याची अमित शाह यांच्यात हिंमत नाही,' असे वेडगळ आरोप करणारे राहुल गांधी संसदेत अमित शाह यांना बोलण्यापासून का रोखत होते? त्यांचा हा दुटप्पीपणा जनतेच्या लक्षात येत नाही, असे त्यांनी समजू नये. या अधिवेशनात प्रधान यांना राजीनामा द्यावा लागल्याने सरकार काहीसे बचावात्मक पवित्र्यात आले. पण, त्यानंतर काँग्रेसने संसदेला जे ओलीस धरले होते, त्याबाबत सरकारने मवाळ भूमिका का घेतली, याची चर्चा सुरू आहे. एक-दोन दिवस गोंधळ सहनही करता आला असता, पण संपूर्ण पावसाळी अधिवेशन या गोंधळात वाहून गेले. सभागृहात घोषणाबाजी करणे, मंत्र्यांना बोलू न देणे आणि अध्यक्षांपुढील मोकळ्या जागेत धाव घेऊन गोंगाट माजविल्याबद्दल अशा सदस्यांना खरं तर अधिवेशन काळापुरते निलंबित करता आले असते. अशा सदस्यांवर नंतरही कसलीच कारवाई केली का गेली नाही, हे अनाकलनीयच. यामुळे आपण संसदेला ओलीस धरू शकतो, असा राहुल गांधींचा समज दृढ झाला. जनतेच्या समस्या सोडविण्यासाठी चर्चा करून तोडगा काढण्यासाठी संसद आणि विधिमंडळे स्थापन झाली आहेत. लोकसभा-राज्यसभा हे कुस्तीचे आखाडे नाहीत. तेथे आपले मुद्दे तर्कशुद्ध आणि वास्तव पुराव्यासह मांडून सरकारला कारवाई करण्यास भाग पाडणे, हे विरोधी पक्षांचे काम. सरकारविरोधात घोषणाबाजी आणि धरणे देणे, या सभागृहाबाहेर करावयाच्या गोष्टी आहेत. महाराष्ट्रात उद्धव ठाकरे यांनी दगाबाजी करून सत्ता मिळविली, तेव्हा विरोधी पक्षात एकटे पडलेल्या देवेंद्र फडणवीस यांनी एकहाती सरकारला सळो की पळो करून टाकले होते. त्यांनी विधानसभेत गोंधळ घातला नाही. उलट, जनतेचे मुद्दे आणि सरकारचे नाकर्तेपण विधानसभेत पुराव्यानिशी इतक्या ताकदीने मांडले की, तत्कालीन गृहमंत्र्यांना राजीनामा द्यावा लागला आणि लवकरच ते सरकारही कोसळले. म्हणजे, विरोधकांची बाजू खरी असेल आणि विरोधी नेत्यांमध्ये न्याय मिळवून देण्याची तळमळ असेल, तर सरकारला कारवाई करण्यास ते भाग पाडू शकतात, हे फडणवीसांनी दाखवून दिले. पण, ते करण्यासाठी जनतेच्या प्रश्नांची जाण असणे, जनतेच्या समस्या समर्थपणे सभागृहात सादर करणे आणि सरकारवर दबाव टाकणे आवश्यक असते. आपली सारी हयात गेली, तरी या गोष्टी करणे राहुल गांधींना जमणार नाही. कारण, त्यांच्या दृष्टीने राजकारण हा पोरखेळच. पण, आजचा मतदार हा सुज्ञ आहे. विरोधकांचा हा गोंधळ म्हणजे त्यांना आपल्या समस्यांबद्दल कळकळ आहे किंवा ते सरकारवर दबाव आणू शकतात, अशी या मतदाराची समजूत झालेली नाही. योग्य वेळी मतदार या विरोधी पक्षांना त्यांची जागा दाखवून देईलच. मात्र, सरकारनेही संसदीय गोंधळाबाबत यापुढे कठोर भूमिका घेणे तितकेच गरजेचे.

# माणूस नेमके कशामागे पळतोय?



**डॉ.** नंदू मुलमुले यांनी फार महत्त्वाची मांडणी केली आहे. वेड्यासारखे त्यांचे पॉडकास्ट गेले काही दिवस ऐकतोय. आजूबाजूला नजर फिरवली की एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते. माणूस प्रचंड धावपळीत आहे, पण तो नक्की कुठे चाललाय आणि कशासाठी पळतोय, याचे उत्तर कोणाकडेच नाही. आपण सगळेच एका अदृश्य, भयंकर रोगाचे शिकार झालो आहोत, आणि त्याचे नाव आहे 'अटेन्शन स्पॅन'ची अधोगती. मुळात Attention Span ही मानवी मेंदूची सर्वात मूलभूत ताकद आहे. डॉ. मुलमुले सर मांडतात की, २००० च्या दशकात माणसाचा सरासरी अटेन्शन स्पॅन १२ सेकंद होता, तो आज थेट ८.२५ सेकंदांवर घसरला आहे. अगदी काचेच्या बाऊलमध्ये पोहणाऱ्या गोल्ड फिश माशापेक्षाही आपली एकाग्र राहण्याची क्षमता कमी झाली आहे. लहान मुलांच्या हातात जेवताना ढकललेला स्क्रीन, त्यातून मिळणारे झटपट डोपामिन शॉट्स आणि सोशल मीडियाची अखंड स्क्रोलिंग यांनी मेंदूची विचार करण्याची मूळ ताकदच संपवून टाकली आहे. यातूनच जन्म झालाय तो FOMO म्हणजे Fear of Missing Out... आणि पर्यायांच्या महापुरात हरवून जाण्याचा. सर यावर एक भारी किस्सा सांगतात की पूर्वी कपड्याच्या दुकानात गेले की टेलर दोन-तीन मोजके तागे दाखवायचा, त्यातलाच मळखाऊ कापड निवडून दोन मीटरचा शर्ट शिवायला टाकला की विषय संपायचा. आज मॉलमध्ये हजारो शर्ट्सचे ढीग समोर पडलेले असतात. माणूस तासनतास डोकेफोड करून, सगळा मेंदू शिणवून एक शर्ट निवडतो; आणि रस्त्यावर आला की समोरून ऑटो चालवणारा नेमका तसाच शर्ट घालून चाललेला दिसतो! हॉटेलमध्ये अख्खा मेनू खालून वर वाचून जीव तोडून एक डिश मागवावी, आणि शेजारच्या टेबलावर वेगळीच रंगीबेरंगी डिश आली की 'अरेरे, हे मागवायला हवे होते' म्हणून पश्चात्ताप करत खावे. पर्याय इतके वाढलेत की Decision Making हाच एक मानसिक शाप बनला आहे. आपण कुलू-मनालीत गेलो तरी फेसबुकवर मित्राचे केरळच्या बॅकवॉटरचे फोटो पाहून तिथेच डाफरत बसतो. सतत 'मागे पडू नये' या अस्वस्थतेत जगणारा मेंदू कधीच शांत राहू शकत नाही. या 'फ्रस्ट्रेशन टॉलरन्स'च्या अभावामुळे आणि इन्फॉर्मेशनच्या भडिमाराने नातेसंबंधही उद्ध्वस्त केलेत. वृद्ध म्हणतात, 'आमचे आजकाल कोणी ऐकतच नाही.' मुले वडिलांशी दोन शब्द बोलायला जातात, तर वडील घड्याळ दाखवून सांगतात, 'मला ऑफिसला उशीर होतोय, दोन मिनिटांत काय ते बोल.' मल्टिटास्किंग नावाचा जो मोठा भ्रम कॉर्पोरेट जगतात मिरवला जातो, तो मेंदूच्या विज्ञानानुसार निव्वळ फोल आहे. एका वेळी दोन कामं नीट करणं मेंदूला शक्यच नाही. सर एक सुंदर रूपक सांगतात. समोर वाढलेलं ताट म्हणजे 'डेटा', घास तोंडात घेणं म्हणजे 'इन्फॉर्मेशन', आणि तो घास लाळ मिसळून शांतपणे चावून खाणं म्हणजे 'नॉलेज'. आज माहिती खूप आहे, पण चिंतनाची लाळ मिसळून तिचं ज्ञानात रूपांतर करायला कोणाकडे सवडच नाही. यातून बाहेर पडायचा मार्ग काय? उपाय अत्यंत साधे, पण मूलभूत आहेत. पुरेशी झोप, सकस आहार, निसर्गाशी जवळीक आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे 'आर्ट ऑफ डुइंग नथिंग'. काहीही न करता निवांत बसण्याची कला. गडकरींच्या भाषेत सांगायचं तर, जेव्हा माणूस वरवर काही करत नसतो, तेव्हाच त्याचा मेंदू आतून सर्वात जास्त सर्जनशील कामात असतो. जेवताना प्रत्येक घासाचा आस्वाद घेणे, एखादे संथ गाणे न फॉरवर्ड करता शांतपणे ऐकणं, हाच खरा माइंडफुलनेस आहे. ज्ञानेश्वरांनीही शेकडो वर्षांपूर्वी हेच सांगितले होते, 'तरी अवधान एक दिजे, मग सर्व सुखासी पात्र होईजे.' जोपर्यंत आपण या पर्यायांच्या गर्दीतून आणि स्क्रीनच्या कोलाहलातून मेंदूला थोडा निवांतपणा देत नाही, तोपर्यंत शांतता आणि सुख दोन्ही मृगजळच राहतील.

**सिद्धेश सावंत**

# रस्ते, पूल बांधले की आपोआप 'विकास' होतो?



**ए**न डी ए सरकार कडे कोणतेही समग्र, दीर्घकालीन आर्थिक धोरण नाही हे स्पष्ट आहे. फक्त रस्ते, पूल बांधले की आपोआप 'विकास' होतो ही धारणा विष्फुल थिंकिंग एवढेच फारतर म्हणता येईल. एक कोटी युवकांना ए आय ट्रेनिंग वगैरे सुद्धा तसेच आहे. मुळात नोकऱ्याच तयार होत नाहीयेत पुरेशा. कामगारांचा पुरवठा वाढून प्रश्न कसा सुटेल? अकुशल कामगाराची कौशल्ये वाढली पाहिजेत हे योग्य. पण त्याच बरोबर जे नवीन कुशल कामगार तयार होतील त्यांच्या हाताला चांगले काम मिळेल ह्याची सुद्धा खात्री होणे आवश्यक आहे. त्यासाठी कामगारांची मागणी वाढली पाहिजे. कामगारांची मागणी कधी वाढेल? जेंव्हा देशी आणि विदेशी गुंतवणूकदार श्रम प्रधान उद्योगात गुंतवणूक करतील, कारखाने टाकतील तेंव्हा. कारखानदारना गुंतवणूक करताना भविषाचा वेध घ्यावा लागतो. पुढील पंधरा वीस वर्षात देशाचे आर्थिक धोरण स्थिर असेल, उद्योगांचे व्यापक हित जपणारे असेल ह्याची बऱ्यापैकी शाश्वती लागते. नाहीतर कोण कशाला गुंतवणूक करेल) खरी गोम इथे आहे. भारत सरकार कडे स्वतःचे आर्थिक धोरण नाही. जे काय धोरण आहे ते मोजके मोठे उद्योग समूह ठरवत आहेत. सुरजीत भल्ला सुद्धा हेच म्हणत आहेत. पण त्यांच्या मते मोठे उद्योग समूह आणि सनदी अधिकारी ह्या सरकारच्या आर्थिक निरक्षरतेचा फायदा घेऊन आपले उखळ पांढरे करून घेत आहेत. मनमोहन सिंह सरकार मध्ये आर्थिक साक्षरता असल्या मुळे ही गंडवा गंडवी कमी प्रमाणात होती असे ते म्हणतात. त्यांच्या मते राजकारणी हे आर्थिक निरक्षरतेमुळे व विक्टिम आहेत. मला हे पटत नाहीये. मोठ्या उद्योग समूहांचे भाजप आणि सत्ताधाऱ्यांशी थेट हित संबंध जुळेलेले आहेत. निवडणुकीला, आमदार खासदार फोडायला वगैरे पैसे उपलब्धत करून देण्या पुरते हे मर्यादित नाहोयेत. लोकशाहीत सार्वजनिक परिप्रेक्ष महत्वाचा असतो. कोणते विषय लोकांसमोर येतात, कोणत्या विषयानी सार्वजनिक चर्चा विस्व व्यापून राहिलेले असते इत्यादींचा जनमतावर आणि म्हणून मिवडणुका वर खूप प्रभाव पडतो. ह्या सार्वजनिक परिप्रेक्षावर ताबा ठेवायचा असेल तर माध्यमांची मालकी आवश्यक असते. मोठ्या उद्योगसमुहांनी नेमके तेच केले आहे. मुठभर मोठे उद्योगसमूह आणि एन डी ए सरकारचे हित संबंध परस्पर पूरक आहेत. उद्योगपती सरकारचे राजकीय हित संबंध जपतात आणि सरकार त्यांचे आर्थिक हित संबंध जपते. आम्ही तुम्हाला सत्तेत राहायला मदत करतो, तुम्ही आर्थिक धोरण प्रक्रिया आमच्या ताब्यात ठेवा असा हा व्यवहार आहे. मोठे उद्योग समूह मग सगळीकडे इतके डोमिनेंट होतात की इतर कोणत्याच उद्योगपतीला स्कोपच उरत नाही. अर्थव्यवस्थेत गुंतवणूक करायची असेल तर लेवल प्लेईंग फील्ड खूप आवश्यक असते. तसे आता नाही. बहुतांश धोरणे हे उद्योगपती ठरवितात. प्रधान मंत्र्यांची आर्थिक सल्लागार समिती आहे, पण ती बहुतांशी शोभिवंत आहे. बंगल्याच्या भोवती बोगन वेल लावणे शास्त्र असते तसे. ना वास ना फळ. चिमणी सुद्धा बसत नाही त्यात. पण असावे लागतात. अंपायर नीट नाही. म्हणून गुंतवणूकदार येत नाहीत. मग गुंतवणूक होत नाही. रोजगार कसा तयार होणार? हे मोदींना नीट माहीत आहे. आपण कठपुतळी आहोत आणि आपल्या दोऱ्या दुसरा कोणीतरी जसा खेचेल तसे आपल्याला नाचावे लागते ह्या बाबतची अगतिकता सुद्धा आहे, पण सत्तेचा मोह सोडवत नाही. सध्या मोदींची अशी विचित्र परिस्थिती आहे. म्हणून कालच्या भाषणात दिमागी नक्षल वगैरे निरर्थक आणि पोकळ मामला होता.

मुळात नरेंद्र मोदी हे एक रंगीबेरंगी कपडे घालणारे, लोकांची करमणूक करणारे बाहुले झाले आहे. ह्या पुढील ३ वर्षे असाच मामला चालणार आहे. नरेंद्र दामोदरदास मोदी ह्या व्यक्तीची मात्र आता दया येते. त्यांना २०२९ मध्ये ह्या सगळ्यातून मुक्त करून हिमालय वगैरे कुठे जाण्याची इच्छा असेल तिथे जाता यावे ह्या साठी जमेल तेवढी मदत करूया.

**नीरज हातेकर**

## सणांचा, व्रतवैकल्यांचा महिना : श्रावण

श्रावण महिना सुरू झाला की वातावरणातच एक वेगळे चैतन्य निर्माण होते. हिंदू संस्कृतीत श्रावण महिन्याला अनन्यसाधारण महत्त्व आहे. हा महिना केवळ धार्मिक श्रद्धेचा नाही, तर निसर्ग, परंपरा, कुटुंब आणि सामाजिक एकोप्याचा सुंदर संगम घडवून आणणारा महिना आहे. त्यामुळेच श्रावणाला 'सणांचा महिना' आणि 'व्रतवैकल्यांचा महिना' असे म्हटले जाते. श्रावणातील सोमवार विशेष पवित्र मानला जातो. या दिवशी भगवान शिवाची भक्तिभावाने पूजा केली जाते. अनेक भाविक उपवास, अभिषेक आणि विविध धार्मिक विधी करतात. श्रावणातील प्रत्येक दिवसाचेही धार्मिक आणि सांस्कृतिक महत्त्व आहे. मंगळागौर, नागपंचमी, रक्षाबंधन, नारळी पौर्णिमा, श्रीकृष्ण जन्माष्टमी, गोपाळकाला, बैलपोळा अशा विविध सण-उत्सवांनी हा महिना अक्षरशः बहरून जातो. त्यानंतर येणाऱ्या गौरी-गणपतीच्या उत्सवाची चाहूलही श्रावणापासूनच लागते. नागपंचमीपासून दसरा-दिवाळीपर्यंतच्या सणांची जणू सुरुवातच श्रावणातून होते. त्यामुळे घराघरांत उत्साहाचे वातावरण निर्माण होते. सणांच्या दिवशी गोडाधोडाचा बेत, नातेवाईकांच्या भेटीगाठी, पूजा-अर्चा आणि पारंपरिक कार्यक्रम यामुळे घरातील वातावरण आनंदाने भरून जाते. श्रावणातील प्रत्येक दिवस जणू उत्सवाचा अनुभव देतो. श्रावणातील व्रतवैकल्यांमागे केवळ धार्मिक श्रद्धा नाही, तर मानसिक शिस्त, संयम आणि सकारात्मकतेचा संदेशही आहे. जीवनात सुख-दुःखाचे अनेक प्रसंग येत असतात. अशा वेळी श्रद्धा आणि आत्मविश्वास मनाला आधार देतात. सणांच्या निमित्ताने कुटुंबीय, मैत्रिणी आणि नातेवाईक एकत्र येतात. मनमोकळ्या गप्पा, हसणे-खेळणे आणि एकमेकांच्या सुख-दुःखात सहभागी होणे, यामुळे नात्यांमध्येही आपलेपणा वाढतो. विशेषतः मंगळागौरसारख्या परंपरांमधून महिलांना एकत्र येण्याची, आनंद व्यक्त करण्याची आणि सामाजिक बंध दृढ करण्याची संधी मिळते. श्रावणाचे वैशिष्ट्य केवळ धार्मिक परंपरांपुरते मर्यादित नाही. या महिन्यात निसर्गही नव्या रूपात बहरलेला असतो. श्रावणाच्या रिमझिम सरी आणि क्षणाक्षणाला बदलणारे ऊन-पावसाचे वातावरण मनाला प्रसन्न करून जाते. म्हणूनच बालकवींच्या 'श्रावणमासी हर्ष मानसी, हिरवळ दाटे चोहिकडे' या ओळी श्रावणाचे यथार्थ चित्र उभे करतात. क्षणात पाऊस, क्षणात ऊन आणि पुन्हा हिरवाईवर बरसणाऱ्या सरी—या साऱ्या निसर्गाच्या लीलांनी श्रावण अधिकच मोहक बनतो. 'हासरा, नाचरा, लाजरा, सुंदर साजिरा श्रावण' असे त्याचे वर्णन करावेसे वाटते. श्रावण हा विविध धार्मिक आणि सांस्कृतिक परंपरांना जोडणारा काळही आहे. भारतातील विविध समाजघटकांचे सण आणि उत्सव अनेकदा या कालखंडात किंवा त्याच्या आसपास येतात. त्यामुळे परंपरांचा सन्मान राखत परस्परांच्या सणांमध्ये आनंदाने सहभागी होणे, बंधुभाव वाढविणे आणि सामाजिक सलोखा जपणे ही आपल्या संस्कृतीची खरी ताकद आहे. आजच्या धावपळीच्या जीवनात माणूस तंत्रज्ञानाच्या अधिक जवळ आणि निसर्गापासून दूर जात आहे. नात्यांमध्येही प्रत्यक्ष संवाद कमी होत चालला आहे.

श्रावण म्हणजे भक्ती, पण केवळ कर्मकांड नव्हे; श्रावण म्हणजे निसर्ग, पण केवळ हिरवाई नव्हे; श्रावण म्हणजे सण, पण केवळ गोडाधोडा नव्हे. श्रावण म्हणजे मनाला प्रसन्न करणारे चैतन्य, नात्यांना घट्ट करणारा स्नेह आणि जीवनाकडे सकारात्मकतेने पाहण्याची प्रेरणा! निसर्गाच्या सान्निध्यात, परंपरांच्या सुगंधात आणि सणांच्या आनंदात मन चिंब भिजविणारा हा श्रावण प्रत्येकाच्या जीवनात सुख, समाधान, आरोग्य आणि आनंद घेऊन येवो, हीच सदिच्छा!

**श्याम ठाणेदार,**
दौंड, जि. पुणे

## संसदेची अधिवेशने आणि जनतेच्या पैशांची नासाडी!

जगातील सर्वात मोठी लोकशाही असलेल्या भारताने नुकताच देशाचा ८० वा स्वातंत्र्य दिन साजरा केला. यानिमित्ताने देशाने विविध क्षेत्रांत केलेल्या प्रगतीचे सिंहावलोकन करण्यात करण्यात आले. देश प्रतिपथावर अग्रेसर असल्याचे सरकारमधील नेतेमंडळींनी यानिमित्ताने सांगत होती तर विद्यमान सरकार देशाला अधोगतीकडे नेत असल्याचा आरोप स्वातंत्र्यदिनाच्या दिवशीही विरोधी पक्षातील मंडळी ठामपणे करत होती. सरकार आणि विरोधी पक्षातील हा संघर्ष स्वातंत्र्यानंतर आजतागायत आपण पाहत आलो आहोत. कालानुरूप सरकारला विरोध करण्याच्या पद्धती बदलल्या तरी विरोधच करण्याची सवय मात्र जुनीच आहे. लोकशाही प्रणालीमध्ये देशातील सर्वसामान्य जनता आपला लोकप्रतिनिधी निवडून देते. या लोकप्रतिनिधीने आपल्या समस्या सरकारदरबारी मांडाव्यात आणि त्यांचे निराकरण करवून घ्यावे, सरकारकडून जनतेच्या हिताची ध्येय धोरणे ठरवावीत, आवश्यक ते कायदे करण्यास लावावेत. यावर साधक-बाधक चर्चा व्हावी यासाठी वर्षातून तीन वेळा संसदेची अधिवेशने होतात. मात्र ही अधिवेशने नेमकी चर्चा करून प्रश्न सोडवण्यासाठी असतात की सरकार आणि विरोधक यांना एकमेकांविरुद्ध लढण्यासाठी अधिकृत आखाडा यानिमित्ताने उपलब्ध करून दिला जातो हा प्रश्न प्रत्येक वेळी पडतो. संसदेचे पावसाळी अधिवेशन नुकतेच पार पडले.

जनमाध्यम संवाद
वाचकांनी आपल्या प्रतिक्रिया, मत-मतांतरे ९८२२६६४०६७ क्रमांकावर पाठवा.

हे अधिवेशन १३ ऑगस्ट या दिवशी अनिश्चित काळासाठी स्थगित करण्यात आले. या अधिवेशनात लोकसभेत ११४ तासांपैकी तब्बल ९६ तास काम झाले नाही म्हणजेच केवळ १७ तास ३० मिनिटेच कामकाज झाले. या काळात लोकसभेच्या १९ बैठका झाल्या. यामुळे सुमारे १५० ते २०० कोटी रुपयांची हानी झाली. वर्ष २०२५ चे पावसाळी अधिवेशन २१ जुलै ते २१ ऑगस्ट २०२५ पर्यंत चालले होते. यात लोकसभा आणि राज्यसभा येथे प्रत्येकी २१ बैठका झाल्या. लोकसभेत केवळ ३७ तास काम झाले होते. राज्यसभेत एकूण ३७ तास आणि ४९ मिनिटे कामकाज पार पडले. गदारोळ आणि स्थगिती यांमुळे ५५ ते ६० तासांपेक्षा अधिक वेळ कामकाज होऊ शकले नाही. संसदेचे दोन्ही सभागृह म्हणजेच लोकसभा आणि राज्यसभा चालवण्यासाठी प्रतिदिन सरासरी ९ कोटी रुपये खर्च येतो. संपूर्ण पावसाळी अधिवेशनात झालेल्या गदारोळामुळे आणि वाया गेलेल्या वेळामुळे सामान्य करदात्यांच्या पैशांतून अनुमाने १५० कोटी ते २०० कोटी रुपयांपेक्षा अधिक खर्च निष्फळ ठरला आहे. प्रत्येक अधिवेशनासाठी सरकार कोट्यवधी रुपये खर्च करते. कष्टकरी सामान्य जनतेच्या घामाच्या मिळकतीतून कररूपाने सरकार दरबारी जमा होणारा हा पैसा असतो. त्याचा विनियोग व्हायला नको का? सामान्य नागरिकांवर ओढवलेल्या नैसर्गिक आणि कृत्रिम संकटांवर सरकारने योग्य तो मार्ग काढावा, सामान्य जनतेच्या मूलभूत गरजा पुरवण्यात येणाऱ्या अडथळ्यांवर उपाययोजना काढाव्यात, विद्यार्थ्यांना शैक्षणिक सुविधा मिळाव्यात, युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्यात, राज्यात कायदा आणि सुव्यवस्था यांचे पालन व्हावे. सीमा सुरक्षित राहाव्यात, स्त्रियांचे रक्षण व्हावे, सरकारी योजना तळागाळापर्यंत पोहोचाव्यात, आरोग्य व्यवस्थेबाबत सुसूत्रता असावी, एखाद्या गंभीर मुद्याबाबत स्वतंत्र कायदा करण्याची आवश्यकता असल्यास त्याबाबत विचारविनिमय घडवून आणणे, प्रचलित कायद्यात काही सुधारणा करायची असल्यास त्यावर सविस्तर अभ्यास करणे आणि या सर्वांच्या सुयोग्य नियोजनासाठी एकमेकांची मते जाणून घेणे यासाठी अधिवेशन ही संधी असते.

**जगन घाणेकर**, घाटकोपर, मुंबई

## राजकीय वर्तुळात नवा वाद

स्वातंत्र्यदिनानिमित्त (१५ ऑगस्ट २०२६) नवी दिल्लीतील काँग्रेस मुख्यालयात 'वंदे मातरम्' गीत सुरू असताना सोनिया गांधी, राहुल गांधी आणि मल्लिकार्जुन खर्गे यांच्या कथित असहजतेवरून व स्पष्टीकरण न देण्यावरून भाजप आणि काँग्रेसमध्ये जोरदार वाद निर्माण झाला आहे. भाजपने या नेत्यांवर राष्ट्रगीताचा अपमान केल्याचा गंभीर आरोप केला आहे, तर काँग्रेसने हे आरोप फेटाळून लावले आहेत. अलीकडेच संसदेत 'वंदे मातरम्'ला राष्ट्रगीतासारखाच कायदेशीर दर्जा देणारे विधेयक संमत झाले आहे दिल्लीच्या लाल किल्ल्यावरून वंदे मातरम चे संपूर्ण कडवे गायल्या गेले. भारताच्या ८० व्या स्वातंत्र्यदिनी (१५ ऑगस्ट २०२६) ऐतिहासिक लाल किल्ल्यावरून पहिल्यांदाच राष्ट्रगीत 'वंदे मातरम्' चे संपूर्ण सादरीकरण करण्यात आले. या राष्ट्रीय गीताला १५० वर्षे पूर्ण झाल्याच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त हा ऐतिहासिक सन्मान करण्यात आला आहे. बंकिमचंद्र चट्टोपाध्याय यांनी रचलेल्या या अमर गीताला आणि त्याच्या समृद्ध प्रवासाला १५० वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने हा सन्मान करण्यात आला. लष्कराच्या बँडने 'वंदे मातरम्' धुन वाजवली, तर भारतीय वायुसेनेच्या दोन एमआय-१७ हेलिकॉप्टर्सनी पुष्पवृष्टी केली; ज्यामध्ये एकावर राष्ट्रीय ध्वज आणि दुसऱ्यावर 'वंदे मातरम्'चा ध्वज होता. नुकत्याच मंजूर झालेल्या विधेयकानुसार राष्ट्रीय गीताला राष्ट्रगीताच्या समान कायदेशीर संरक्षण व सन्मान प्राप्त झाला आहे. १५ ऑगस्ट २०२६ रोजीच्या स्वातंत्र्यदिनानिमित्त काँग्रेस मुख्यालयात झालेल्या ध्वजारोहण समारंभादरम्यान 'वंदे मातरम्' या राष्ट्रीय गीताचा अपमान केला. वंदे मातरम चे पूर्ण कडवे गायला सोनिया गांधी विरोध करत असल्याचा व्हिडिओ समोर आल्याने भाजप आणि काँग्रेस यांच्यात मोठा राजकीय वाद निर्माण झाला आहे. भाजप नेत्यांनी असा आरोप केला की, कार्यक्रमात संपूर्ण 'वंदे मातरम्' गीत गायले जात असताना सोनिया गांधी आणि राहुल गांधी यांनी ते मध्येच थांबवण्याचा किंवा आक्षेप घेण्याचा इशारा केला. भाजप प्रवक्त्यांनी या घटनेचा व्हिडिओ शेअर करत, काँग्रेसची मानसिकता आजही राष्ट्रगीताचा आदर करणारी नाही, अशी तीव्र टीका केली आणि काँग्रेसने देशाची माफी मागावी अशी मागणी केली. काँग्रेसचे सरचिटणीस जयराम रमेश यांनी भाजपचे आरोप पूर्णपणे फेटाळून लावले आहेत. त्यांनी स्पष्ट केले की, काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे हे ज्येष्ठ नागरिक असून ते बऱ्याच वेळापासून उभे होते. सोनिया गांधी या 'वंदे मातरम्' थांबवण्याचा इशारा करत नव्हत्या, तर खर्गे यांच्यासाठी खुर्ची आणण्यास सांगत होत्या. १८९६ च्या कलकत्ता काँग्रेस अधिवेशनात रवींद्रनाथ टागोर यांनी स्वतः हे गीत गायले होते आणि स्वातंत्र्यलढ्यात ते एक महत्त्वाचे प्रेरणास्थान होते. काँग्रेसची भूमिका ही दोन कडवेच गाण्याचा राहिलेली असून संपूर्ण कडवे गाण्याला काँग्रेसने मान्यता दिली नाही, त्याचेच अनुसरण आजही काँग्रेसकडून होत आहे, मात्र 'वंदे मातरम्'ला राष्ट्रगीत 'जन गण मन' प्रमाणेच कायदेशीर संरक्षण दिले आहे आणि पूर्ण ६ कडवी गाण्याबाबतचे नियम आणले असताना याचे पालन करण्याची तसदी काँग्रेसने आता देखील दाखवली नाही. हा राष्ट्रगीताचा अपमान आहे. वंदे मातरम एका धर्माचे गीत नसून ते राष्ट्राचे गीत आहे. नवीन नियमानुसार वंदे मातरम चे पूर्ण कडवे गायला पाहिजे होते परंतु जाणीवपूर्वक काँग्रेसने याला विरोध केला. सत्तेलाच आपले ध्येय मानणाऱ्या आणि राष्ट्राला दुय्यम ठेवणाऱ्या लोकांकडून खऱ्या राष्ट्रप्रेमाची अपेक्षा करता येत नाही. अशा प्रवृत्तींसाठी देश म्हणजे केवळ निवडणुकीची मतपेढी आणि राष्ट्रध्वज (तिरंगा) म्हणजे केवळ राजकीय प्रचाराचे साधन असते.

**प्रा डॉ सुधीर अग्रवाल,**
वर्धा

# हक्काच्या पांदण रस्त्यासाठी स्वातंत्र्यदिनी शेतकऱ्यांचा आत्मदहनाचा प्रयत्न!

## पुसद तहसील कार्यालयात शेतकऱ्यांचा टोकाचा संताप, पोलिसांच्या सतर्कतेने अनर्थ टळला

✦जनमाध्यम | प्रतिनिधी





**पुसद, दि. १६ :** देशभर स्वातंत्र्यदिनाचा उत्साह साजरा होत असताना पुसद तालुक्यात मात्र शेतकऱ्यांच्या 'स्वातंत्र्या'चा प्रश्न ऐरणीवर आला. माळ पठारावरील बेलोरा बु. येथील शेतकऱ्यांनी शेतात जाण्यासाठीचा पांदण रस्ता अतिक्रमणमुक्त करून देण्याच्या मागणीसाठी प्रशासनाकडे वारंवार पाठपुरावा करूनही कार्यवाही होत नसल्याचा आरोप करत दि. १५ ऑगस्ट रोजी तहसील कार्यालयाच्या प्रांगणात आत्मदहनाचा प्रयत्न केला.

पोलिसांच्या सतर्कतेमुळे मोठा अनर्थ टळला. शेतकऱ्यांच्या म्हणण्यानुसार, त्यांच्या शेताकडे जाणारा एकमेव वहिवाटीचा रस्ता अतिक्रमणामुळे बंद झाला आहे. या प्रकरणी पुसद तहसीलदारांनी १९ जून २०२४ रोजी रस्ता खुला करण्याचा आदेश दिला. त्याविरोधातील अपील उपविभागीय अधिकाऱ्यांनी १२ जून २०२५ रोजी फेटाळून तहसीलदारांचा आदेश कायम ठेवला. त्यानंतर हे प्रकरण मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात रिट याचिका क्र. ३३४८/२०२५ द्वारे गेले. न्यायालयीन आदेशानंतरही प्रत्यक्ष रस्ता खुला झाला नसल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. शासनाची पाणंद रस्त्यांची मोहीम; मग स्थानिक पातळीवर अडथळा का? राज्य शासनाकडून 'मुख्यमंत्री बळीराजा शेत पाणंद रस्ते योजना' राबवून शेतकऱ्यांना शेतापर्यंत वाहतुकीची सुविधा देण्यावर भर दिला जात आहे. मात्र बेलोरा येथील शेतकऱ्यांना न्यायालयीन लढाईनंतर ही रस्त्यासाठी संघर्ष करावा लागत असल्याने महसूल प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. नामदेवराव गडदे, शिवाजी ढाले, जांबुवतराव मस्के, स्नेहा अरविंद गडदे, नथ्थूजी नारायण ढाले, यमुना नथ्थूजी ढाले, रंगराव मस्के, नथ्थूजी जामकर, कपील जैन, अरविंद नामदेव गडदे, कल्पना प्रशांत गडदे आदींनी टोकाचे पाऊल उचलण्याचा प्रयत्न केला. पोलिसांनी त्यांना ताब्यात घेऊन समज दिली. महसूल प्रशासनाने रस्ता मोकळा करण्याचे आश्वासन दिल्यानंतर परिस्थिती निवळली.

### शेतकऱ्यांचा सवाल

**"देशाला स्वातंत्र्य मिळून ८० वर्षे झाली; पण स्वतःच्या शेतात जाण्यासाठी न्यायालयाचा आदेश हातात असूनही रस्ता मिळत नसेल, तर शेतकऱ्यांच्या स्वातंत्र्याचे काय?"**
**न्यायालयीन आदेशाची अंमलबजावणी आणि शेतकऱ्यांना तातडीने रस्ता उपलब्ध करून देणे, हीच आता प्रशासनासमोरील खरी कसोटी ठरणार आहे.**

# जनुना शाळेत शिक्षकाची तातडीने नियुक्ती करा!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

✦ किरण नरवाडे



**महागाव, दि. १६ :** जनुना शाळेतील बदली आदेशाला १५ दिवस उलटूनही अंमलबजावणी नाही; विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याचा ग्रामस्थांचा आरोप. जि. प. प्राथमिक शाळा जनुना येथे आवश्यक शिक्षकाची तातडीने नियुक्ती करून विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान थांबवावे, अशी मागणी शाळा व्यवस्थापन समिती व समस्त ग्रामस्थांनी शिक्षण विभागाकडे तक्रार अर्जाद्वारे केली आहे.

शाळेतील संबंधित शिक्षिका बारतोंडे सुनिता केशवराव यांच्या बदलीचा आदेश होऊन तब्बल १५ दिवस उलटले आहेत. मात्र अद्याप या आदेशाची अंमलबजावणी झालेली नसल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिलेल्या बदली आदेशाची अंमलबजावणी का होत नाही, असा सवालही ग्रामस्थांनी उपस्थित केला आहे. जनुना येथील जि. प. प्राथमिक शाळेत सुमारे दहा विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक भवितव्याचा विचार करता शाळेत आवश्यक शिक्षक उपलब्ध असणे गरजेचे आहे. बदली आदेशाच्या अंमलबजावणीला होत असलेल्या विलंबामुळे अध्यापन व्यवस्थेवर परिणाम होऊन विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. याबाबत गटशिक्षणाधिकाऱ्यांकडे तक्रार अर्ज देऊन संबंधित बदली आदेशाची तातडीने अंमलबजावणी करावी, संबंधित शिक्षिकेला कार्यमुक्त करावे आणि जनुना शाळेसाठी आवश्यक शिक्षकाची नियुक्ती करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान तातडीने थांबविण्यासाठी प्रशासनाने दखल न घेतल्यास शाळा व्यवस्थापन समिती व ग्रामस्थांच्या वतीने लोकशाही मार्गाने आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे. तक्रार अर्जावर शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष राहुल गुणाजी नरवाडे, उपाध्यक्ष मंजुषा नामदेव खिल्लारे यांच्यासह सरपंच दत्तराव राठोड, ग्रामपंचायत सदस्य ज्ञानेश्वर कोंढवा इंगोले, सामाजिक कार्यकर्ते राजकुमार कोंडबा नरवाडे तथा समस्त ग्रामस्थांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# आध्यात्मिक मूल्यांचा आधार घेतल्यास व्यक्ती व्यसनांपासून दूर राहू शकते.- डॉ. बी.एम. सावरकर

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**राळेगाव, दि. १६ :** राष्ट्रीय सेवा योजना विभाग व कला, वाणिज्य महाविद्यालय राळेगाव यांच्या संयुक्त विद्यमाने प्रजापिता ब्रह्मकुमारी ईश्वरिय विश्वविद्यालयाच्या नशामुक्त अभियान या विषयावर जनजागृती कार्यक्रम उत्साहात पार पडला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भास्कर सावरकर यांच्या अध्यक्षतेखाली व आत्मिक बहन बी. के. मंगला यांच्या प्रमुख उपस्थितीत "नशेचे दुष्परिणाम आणि स्वस्थ जीवनशैली" या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

आपल्या अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. सावरकर यांनी संतुलित व्यक्तिमत्वाच्या विकासात आध्यात्मिकतेचे महत्त्व अधोरेखित केले. त्यांनी सांगितले की, मनसंतुलनासाठी आध्यात्मिक मूल्यांचा आधार घेतल्यास व्यक्ती व्यसनांपासून दूर राहू शकते. प्रजापिता ब्रह्मकुमारी ईश्वरिय विश्वविद्यालय ही आध्यात्मिक व शैक्षणिक संस्था भारत सरकारसोबत करारबद्ध असून, वैद्यकीय शिक्षण शाखेद्वारे देशभर विविध आरोग्य जनजागृती अभियान राबवित आहे. विद्यार्थ्यांना उद्देशून आत्मिक बहन बी. के. मंगला यांनी युवकांच्या जीवनात विविध प्रकारच्या नशेचे दुष्परिणाम स्पष्ट केले. त्यांनी विद्यार्थ्यांकडून नशामुक्तीची प्रतिज्ञा घेऊन स्वस्थ जीवनशैली अंगीकारण्याचे आवाहन केले. शेवटी सर्व विद्यार्थ्यांना नशामुक्तीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. विशाल दौलतकर यांनी केले. संचालन प्रा. विनोद गौरकार यांनी तर आभार प्रदर्शन प्रा. विशाल वाघमारे यांनी केले. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अपघातग्रस्तांच्या मदतीला धावणाऱ्या 'मुज्जूभाई'चा स्वातंत्र्यदिनी प्रशासनाकडून सन्मान

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**घाटंजी, दि. १६ :** अपघातग्रस्तांना तातडीची मदत मिळवून देत त्यांचा जीव वाचविण्यासाठी सातत्याने धावून जाणारे सामाजिक कार्यकर्ते मुज्जूमील पटेल (मुज्जूभाई) यांच्या निस्वार्थ सेवाकार्याची प्रशासनाने दखल घेतली. स्वातंत्र्यदिनाच्या कार्यक्रमात घाटंजीचे तहसीलदार विजय साळवे यांच्या हस्ते त्यांना प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

घाटंजी तालुक्यात कुठेही अपघात घडल्याची माहिती मिळताच घटनास्थळी धाव घेणे, जखमींना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यासाठी प्रयत्न करणे तसेच संकटात सापडलेल्या गरजू नागरिकांना मदतीचा हात देणे, अशी त्यांची अनेक वर्षांपासूनची सामाजिक वाटचाल आहे. त्यांच्या या कार्याची प्रशासनाने घेतलेली दखल हा त्यांच्या सेवाभावी कार्याचा गौरव मानला जात आहे.सन्मानाची कधीही अपेक्षा ठेवली नाही. एखाद्याचा जीव वाचविण्यापेक्षा मोठा सन्मान नाही. अशी भावना मुज्जूभाईंनी व्यक्त केली. मिळालेल्या सन्मानामुळे समाजासाठी अधिक व्यापकपणे कार्य करण्याची नवी प्रेरणा मिळाल्याचे त्यांनी सांगितले.

### मानवता हाच धर्म मानणारे 'मुज्जूभाई'!

**जात-पात, धर्माच्या पलीकडे जाऊन मानवसेवेलाच ईश्वरसेवा मानणारे मुज्जूभाई सर्वधर्मीयांमध्ये लोकप्रिय आहेत. युवकांमध्येही त्यांच्या सामाजिक कार्याबद्दल विशेष आदर आहे.**

## थोडक्यात

### १७ वर्षांच्या निष्कलंक सेवेला केंद्राचा सलाम..! पोलीस हवालदार निलेश भोयर यांना उत्कृष्ट सेवा पदक



**झरी-जामणी :** पोलीस दलात तब्बल १७ वर्षे प्रामाणिकपणे व निष्ठेने सेवा बजावणारे पोलीस हवालदार निलेश मारोती भोयर यांना त्यांच्या दीर्घकालीन व निष्कलंक सेवेसाठी भारत सरकारच्या गृह मंत्रालयाकडून उत्कृष्ट सेवा पदक जाहीर करण्यात आले. १५ ऑगस्ट रोजी जाहीर झालेले पदक व प्रशस्तीपत्र पोलीस अधीक्षक कुमार चिंता यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले.सध्या अपर पोलीस अधीक्षक कार्यालय, यवतमाळ येथील वाचक शाखेत कार्यरत असलेले भोयर यांनी विविध जबाबदाऱ्या कर्तव्यनिष्ठेने पार पाडल्या. नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी त्यांनी नेहमीच संवेदनशील भूमिका घेतली. दुर्भा, ता. झरी-जामणी येथील शेतकरी कुटुंबातून आलेल्या भोयर यांनी प्रतिकूल परिस्थितीवर मात करत पोलीस सेवेत उल्लेखनीय वाटचाल केली. त्यांच्या प्रामाणिकपणा, शिस्त व सेवाभावाची केंद्र सरकारने घेतलेली दखल ही त्यांच्या कार्याची गौरवाची पावती मानली जात आहे. पदक मिळाल्याबद्दल पोलीस अधिकारी, कर्मचारी, मित्रपरिवार व ग्रामस्थांकडून त्यांचे अभिनंदन होत आहे.



### जिव्हाळा संस्थेच्या समाजसेवेला शासनाची गौरव मुद्रा..!

**'उत्कृष्ट कार्य गौरव पुरस्कार-२०२६'ने सन्मान**

**उमरखेड :** ग्रामीण व वंचित घटकांच्या विकासासाठी गेल्या १५ वर्षांपासून सातत्याने कार्यरत असलेल्या जिव्हाळा संस्थेच्या समाजाभिमुख कार्याची महाराष्ट्र शासनाने दखल घेत 'उत्कृष्ट कार्य गौरव पुरस्कार-२०२६' प्रदान केला. स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने जिल्हाधिकारी कार्यालय, यवतमाळ येथे झालेल्या सोहळ्यात पालकमंत्री तथा मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांच्या हस्ते संस्थेचे अध्यक्ष अतुल लताताई राम मादावार यांनी पुरस्कार स्वीकारला. महिला व बाल सक्षमीकरण, शिक्षण, आरोग्य, पोषण, युवक व कौशल्य विकास, रोजगार, जलसंधारण, कृषी, पर्यावरण संवर्धन आणि आपत्ती व्यवस्थापन अशा विविध क्षेत्रांत संस्थेने उल्लेखनीय काम केले आहे. विशेषतः मागील वर्षीच्या नैसर्गिक आपत्तीच्या काळात पूरग्रस्त हजारो कुटुंबांना मदत, जीवनावश्यक साहित्याचे वितरण, आरोग्यविषयक उपक्रम आणि पुनर्वसनाच्या माध्यमातून संस्थेने प्रशासनाला मोलाची साथ दिली. यवतमाळ जिल्ह्यातील नववी ते बारावीच्या २२५ मुलींना CSR निधीतून शैक्षणिक शिष्यवृत्ती उपलब्ध करून देत ग्रामीण व आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थिनींच्या शिक्षणाला संस्थेने आधार दिला आहे. यावेळी जिल्हाधिकारी विकास मीना, पोलीस अधीक्षक कुमार चिंता, निवासी जिल्हाधिकारी अनिरुद्ध बक्षी, आमदार दुष्यंत चतुर्वेदी यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. धनराज राऊत, गजानन श्रीरामांजवार, रुद्राक्ष मादावार व रोहित अलमुलवार उपस्थित होते.

# वाळू तस्करीप्रकरणी जिल्हाधिकाऱ्यांसह अधिकाऱ्यांवर 'मोक्का'ची मागणी..

## २५ हजार ब्रास अवैध वाळूसाठ्याचा आरोप

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**पांढरकवडा, दि. १६ :** आर्णी तालुक्यातील मौजा आयता-जालांदी आणि झरी तालुक्यातील मौजा सतपल्ली परिसरातील सुमारे २५ हजार ब्रास अवैध वाळूसाठ्याच्या प्रकरणात जिल्हाधिकारी, संबंधित एसडीओ, तहसीलदार तसेच अज्ञात वाळू तस्करांविरुद्ध कठोर कारवाई करावी, अशी मागणी व्हिसल ब्लोअर व आरटीआय कार्यकर्ते रजनीकांत बोरेले यांनी केली आहे.

बोरेले यांनी १५ ऑगस्ट रोजी 'आपले सरकार' पोर्टलवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मुख्य सचिव, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे आणि अमरावती विभागीय आयुक्तांकडे तक्रार केली आहे. संबंधित अधिकाऱ्यांनी कर्तव्यात कसूर करून अवैध वाळूसाठ्याला अप्रत्यक्ष अभय दिल्याचा आरोप त्यांनी केला असून, त्यांच्या मालमत्तेची एटीएस मार्फत चौकशी करून दोषी आढळल्यास सेवेतून बडतर्फ करण्याची मागणी केली आहे. स्टिंग ऑपरेशनमध्ये मोठ्या प्रमाणात वाळूसाठा, मशीनरी, हायवा वाहने, सीसीटीव्ही कॅमेरे तसेच इंटरनेट व मोबाईल लिंक आढळल्याचा दावा बोरेले यांनी केला आहे. या उपकरणांच्या नोंदणीसाठी वापरलेल्या आधारकार्डांची ही चौकशी करावी, अशी मागणी आहे. तसेच संबंधित वाळू तस्करांवर यापूर्वी किती गुन्हे दाखल आहेत, ते तडीपार आहेत का किंवा त्यांच्यावर गुन्हे सिद्ध झाले आहेत का, याची संपूर्ण गुन्हेगारी पार्श्वभूमी तपासून 'मोक्का'अंतर्गत कारवाई करावी, असे त्यांनी म्हटले आहे. दरम्यान, यवतमाळ व नांदेड जिल्ह्यातील तीन आमदारांचा वाळू तस्करीशी कथित संबंध असल्याची चर्चा असल्याचा दावा तक्रारीत करण्यात आला असून, या चर्चेची ही निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे. आरोपांची अधिकृत पुष्टी झालेली नसून, प्रशासनाच्या चौकशीनंतरच वस्तुस्थिती स्पष्ट होणार आहे.

# चोरांबा येथे पशुवैद्यकीय दवाखान्याचे जिल्हाधिकारी विकास मीना यांच्या हस्ते भूमिपूजन

## पशुपालकांच्या सुविधेत होणार मोठी भर

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**चोरांबा, दि. १६ :** चोरांबा येथे सामूहिक वनहक्क व्यवस्थापन समितीच्या प्रयत्नाने परिसरातील पशुपालकांना अत्याधुनिक आणि दर्जेदार पशुवैद्यकीय सेवा स्थानिक पातळीवर उपलब्ध व्हाव्यात, या उद्देशाने चोरांबा येथे उभारण्यात येणाऱ्या पशुवैद्यकीय दवाखान्याचे भूमिपूजन जिल्हाधिकारी विकास मीना यांच्या हस्ते दि.१४ ऑगस्ट रोजी मोठ्या उत्साहात करण्यात आले.

या दवाखान्यामुळे परिसरातील पशुपालकांना आपल्या जनावरांच्या उपचारासाठी दूरवर जाण्याची आवश्यकता राहणार नसून, आजारांचे निदान, उपचार आणि पशुधनाच्या आरोग्याशी संबंधित विविध सेवा भविष्यात एकाच ठिकाणी उपलब्ध होणार आहेत. भूमिपूजनप्रसंगी जिल्हाधिकारी विकास मीना यांनी पशुधन हे ग्रामीण अर्थव्यवस्थेचे महत्त्वाचे साधन असून, पशुपालकांच्या आर्थिक उन्नतीसाठी पशुवैद्यकीय सुविधा सक्षम असणे गरजेचे असल्याचे सांगितले. या दवाखान्याचे काम दर्जेदार आणि वेळेत पूर्ण करण्यावर भर देण्यात यावा, असे निर्देशही त्यांनी संबंधित यंत्रणेला दिले. नवीन पशुवैद्यकीय दवाखान्यामुळे चोरांबा व परिसरातील पशुपालकांना मोठा दिलासा मिळणार असून, पशुधनाचे आरोग्य सुधारण्यासोबतच पशुसंवर्धनाला चालना मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. या भूमिपूजन सोहळ्यामुळे परिसरातील पशुपालकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. यावेळी प्रकल्प अधिकारी पांढरकवडा डोंगरे, घाटंजीचे दंडाधिकारी विजय साळवे, जिल्हा परिषदेचे उपअभियंता पांढरकवडा शिंदे साहेब, गटविकास अधिकारी डाबरे मॅडम, तालुका आरोग्य अधिकारी भोसेकर सर, पशुवैद्यकीय अधिकारी चव्हाण साहेब यांच्यासह पंचायत समितीचे विस्तार अधिकारी संतोष दहिफळे, ठाकरे साहेब व निलेश घनकर साहेब उपस्थित होते.तसेच चोरंबा ग्रामपंचायतीचे सचिव, मंडळ अधिकारी शिंदे साहेब, तलाठी सिडाम मॅडम यांचीही उपस्थिती होती. कार्यक्रमाला सामूहिक वन हक्क व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष बंडू तोडसाम, सचिव कांचन उरकुडे, योगिता तोडसाम, ज्योती रंदये, खजिनदार पवन रंदये तसेच समितीचे सदस्य रमेश पडलवार, रवी खवास, चंद्रशेखर पडलवार, विजय रंदये, अंबादास मेश्राम, संतोष भाऊ यांच्यासह समस्त ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# यवतमाळ येथे युवा कुणबी मराठा ग्रुपच्या बैठकीला तरुणांचा प्रचंड प्रतिसाद

## समाजविकासासाठी युवकांचे ऐक्य आणि सकारात्मक पाऊल

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**यवतमाळ , दि. १६ :** शहरातील आर्णी बायपास मार्गावरील हॉटेल समर्थ प्राईड येथे रविवारी (१६ ऑगस्ट) युवा कुणबी मराठा ग्रुपच्या वतीने आयोजित विशेष बैठकीस युवकांचा अभूतपूर्व आणि सकारात्मक प्रतिसाद मिळाला. समाजात सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी आणि विकासाची नवी दिशा ठरवण्यासाठी शेकडो तरुण व उद्योजक एका व्यासपीठावर एकत्र आले होते.

दुपारी ११:३० वाजता सुरू झालेल्या या बैठकीत समाजहित, तरुणांचे सबलीकरण आणि उद्योग-व्यवसायातील नवीन संधी यांसारख्या अत्यंत महत्त्वाच्या विषयांवर अत्यंत उत्साहात व विधायक वातावरणात चर्चा झाली. समाजातील नवउद्योजक आणि युवा पिढीने मांडलेले विचार आगामी काळातील प्रगतीला गती देणारे ठरणार आहेत. समाजबांधवांच्या या उत्स्फूर्त सहभागामुळे युवा कुणबी मराठा ग्रुपच्या आगामी सामाजिक उपक्रमांना मोठी ऊर्जा मिळाली असून, भविष्यात विकासाची नवी शिखरे गाठण्याचा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

# रुग्णसेवा सक्षम करण्याच्या बैठकीत निधी अभावाचा मुद्दा ऐरणीवर

## रुग्ण कल्याण समितीची बैठक संपन्न..

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**बाभुळगाव, दि. १६ :** ग्रामीण रुग्णालय, बाभुळगाव येथे सन २०२६-२७ मधील रुग्ण कल्याण समितीची प्रथम बैठक ७ ऑगस्ट रोजी झाली. रुग्णसेवेचा दर्जा उंचावण्यासह रुग्णालयाच्या मूलभूत सुविधांवर बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली. मात्र, चालू आर्थिक वर्षात रुग्ण कल्याण समितीला अद्याप निधी प्राप्त झालेला नसल्याची बाबही यावेळी समोर आली.

जिल्हा शल्य चिकित्सकांचे प्रतिनिधी तथा निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. उमेश मडावी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीपूर्वी समिती सदस्यांनी रुग्णालयाची पाहणी केली. स्वच्छता, पाणीपुरवठा, वैद्यकीय व वैद्यकीय साहित्य, व्हीलचेअर, स्ट्रेचर, वैद्यकीय उपकरणांची दुरुस्ती, विद्युत व नळ दुरुस्ती, पाणी टाक्यांची स्वच्छता, बायोमेडिकल वेस्ट व्यवस्थापन तसेच प्रयोगशाळेच्या साहित्याबाबत सुविधा, पायाभूत सुविधा आणि दैनंदिन कामकाजाचा आढावा घेण्यात आला. रुग्णांना वेळेत उपचार व औषधे मिळावीत, रुग्णांशी संवेदनशीलतेने वागावे आणि शासनाच्या विविध आरोग्य योजनांचा पात्र लाभार्थ्यांना जास्तीत जास्त लाभ मिळवून द्यावा, यावर भर देण्यात आला. औषधे ही चर्चा झाली. आवश्यक निधीसाठी सक्षम प्राधिकरणाकडे पाठपुरावा करण्याचा निर्णय घेण्यात आला. यावेळी डॉ. मडावी यांनी रुग्ण हा आरोग्य व्यवस्थेच्या केंद्रस्थानी असल्याचे सांगत गुणवत्तापूर्ण सेवा देण्याच्या सूचना केल्या.

**तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी पुसद**
**जि. यवतमाळ यांचे कार्यालय, पुसद**

**जाहिरनामा**

एम.आर.सी. ८१/१४५/२०२६ तहसिल कार्यालय, पुसद
दिनांक १५/०५/२०२६

**आवेदक- श्री.सी. मधुकर मनिराम जाधव रा. शेलू बु. ता. पुसद जि. यवतमाळ**

**अनावेदक- नगर परिषद, पुसद सचिव, ग्राम पंचायत शेलू बु. ता. पुसद जि. यवतमाळ**

ज्याअर्थी अर्जदार नामे श्री. सौ मधुकर मनिराम जाधव पुसद जि. यवतमाळ यांनी त्यांचे मुलगी नामे श्री/सी/श्रीमती मा मधुकर जाधव राशेलू बु. यांच्या जन्माची मृत्यूची नोंद न्यायालयात जन्म मृत्यू नोंदणी कायद्याचे कलम १३ (३) प्रमाणे वि ३०/०६/२००९ रोजी त्यांच्या जन्म मृत्य त्यांचे राहत्या घरी मौजा शेलू बु. ता. पुसद जि. यवतमाळ येथे झाला आहे. या बाबत य जन्माची / मृत्यूची नोंद सचिव, ग्रामपंचायत शेलू बु. पंचायत समिती पुसद यांना घेण्याकरीता आदेश देण्यात यावा याकरीता १२/०३/२०२६ रोजी अर्ज या कार्यालयास प्राप्त झाले आहे. या करीता एम.आर.सी. ८१/१४५/२०२६ तहसिल कार्यालय, पुसद वतीने सचिव, ग्रामपंचायत शेलू बु. यांना पत्र देण्यात येत आहे. ज्याअर्थी सर्वत्र जनतेस या जाहीर नोटीसव्दारे कळविण्यात येते की, स अर्जदार नामे, श्री. मधुकर मनिराम जाधव रा. शेलू बु. स्वतः आई/ मुलगा/मुलगी / वडील / भाऊ बहिण/पूतण्या/आजोबा / पती / प नामे श्री. सी. माधवी मधुकर जाधव रा शेलू बु. ता. पुसद यांच्या जन्माची/ मृत्यूची नोंदणी बाबत कोणाचाही कोणत्याही प्रकारची हरव अथवा आक्षेप असेल तर त्यांनी हि जाहिर नोटीस प्रकाशित झाल्यापासून १५ दिवसाच्या आत या कार्यालयात आपण स्वतः हजर अ आपले वकिला मार्फत हबर राहुन आपली हरकत अथवा आक्षेप लेखी स्वरुपात नोंदवावा, अन्यथा कोणालाही काहीही सांगवयाचे नाह असे गृहीत धरुन सदरहु अर्जदाराचा अर्ज निकाली काढण्यात येईल यांची नोंद घ्यावी.

आज दिनांक १५/०५/२०२६ रोजी माझ्या सहीने व शिक्यानिशी दिली आहे.

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी,**
**पुसद**

# जिल्ह्यात ८० वा स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा





## जलसंधारण, शेतकऱ्यांच्या मदतीवर भर - दादाजी भुसे

**अमरावती/का.प्र.** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेत ३०८ कोटी रुपयांची शेतकऱ्यांना मदत करण्यात आली. त्यासोबतच जलसंधारणासाठी विविध उपाययोजना करण्यात आल्या आहे. येत्या काळातही जलसंधारण आणि शेतकऱ्यांना मदतीवर भर देण्यात येणार असल्याचे प्रतिपादन शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी केले.

स्वातंत्र्य दिनाच्या ७९ व्या वर्धापन दिनानिमित्त विभागीय आयुक्त कार्यालयात ध्वजवंदनाचा मुख्य कार्यक्रम पार पडला. यावेळी विभागीय आयुक्त नयना गुंडे, विशेष पोलिस महानिरीक्षक डॉ. महेश पाटील, जिल्हाधिकारी आशिष येरेकर, पोलिस आयुक्त राकेश ओला, जिल्हा पोलिस अधीक्षक निकेतन कदम आदी उपस्थित होते.

मंत्री श्री. भुसे यांनी, जिल्ह्यात पावसाचे प्रमाण कमी झाल्याने पाणीटंचाईचा सामना करण्यासाठी 'जलसंधारण अभियान' राबवले जाणार आहे. तसेच, २१ ऑगस्ट रोजी माजी मुख्यमंत्री सुधाकरराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त 'जल संधारण दिन' साजरा करण्यात येणार आहे.

त्यासोबतच काही भागातील अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीसाठी मदत देण्यात येणार आहे. शेतकऱ्यांना मदत व्हावी, म्हणून कर्जमुक्ती झालेल्या शेतकऱ्यांना पीक कर्ज वाटप करण्यात येत आहे.

शिक्षण क्षेत्रातही धोरणात्मक निर्णय घेण्यात आले आहे. शाळांमध्ये राष्ट्रगीतानंतर 'गर्जा महाराष्ट्र माझा' हे राज्यगीत अनिवार्य करण्यात आले आहे. शिक्षणक्षेत्रात मनुष्यबळ उपलब्ध व्हावे, यासाठी केंद्रप्रमुख पदांची भरती करण्यात आली आहे, तसेच पवित्र पोर्टलद्वारे ३० हजार शिक्षक भरती प्रक्रिया सुरू आहे. २६ जानेवारी रोजी २ कोटी विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या सामूहिक कवायतीची 'वर्ल्ड बुक ऑफ रेकॉर्ड'मध्ये नोंद झाली असल्याचे सांगितले.

यावेळी विशेष पोलिस महानिरीक्षक डॉ. महेश पाटील, उपजिल्हाधिकारी ज्ञानेश्वर घ्यार, विधी अधिकारी नरेंद्र बोहरा, पोलिस उपअधिक्षक तयुब युनुस मुजावर, नागरी हक्क संरक्षण च्या पोलिस अधीक्षक अनिता पाटील, पोलिस निरीक्षक अशोक लांडे, सहायक पोलिस उपनिरीक्षक अनिल काळे, पोलिस हवालदार प्रशांत भटकर, त्र्यंबक मनोहर, राजेश पांडे, प्रभाकर बोदडे, हेड कॉन्स्टेबल निलेश अंबर्ते, दिपमाला साळुंखे, अतुल कडू, प्रदिप बद्रे, मिलींद बेलसरे, हरीना नेत्रदान समितीचे मनोज राठी, राजेंद्र वर्मा, रामप्रकाश मिश्रा, मुकेश लोहिया, शिष्यवृत्ती परीक्षेत यश मिळविल्याबद्दल सारांश सारडा, गार्गी कुऱ्हाडे, दिया पाटील यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी जलसंधारण, व्यसनमुक्ती, पॉश कायदा, साक्षरतेची शपथ घेण्यात आली. तसेच जलसंधारणाच्या लोगोचे अनावरण करण्यात आले.

## महानगरपालिकेमध्ये गुणवंत कर्मचा-यांचा सत्कार

**अमरावती-** अमरावती महानगरपालिका तर्फे स्वातंत्र्य दिनाचा वर्धापन दिन साजरा करण्यात आला. स्वातंत्र्य दिनाच्या वर्धापन दिनानिमित्त शनिवार दिनांक १५ ऑगस्ट रोजी सकाळी ८.०० वाजता मा.महापौर श्रीचंद तेजवानी यांचे शुभहस्ते ध्वजारोहण करयात आला. महापौर श्रीचंद तेजवानी यांचे हस्ते महानगरपालिका प्रांगणात स्वातंत्र्य दिनाचा वर्धापन दिनानिमित्य अमरावती महानगरपालिका तर्फे गुणवंत सफाई कामगार निलम शैलेंद्रसिंग चव्हाण, अमर जावे, कोमल गोहर, गणेश चावरे, इंदु चव्हाण, राजकुमार पासरे, उमा समुद्रे, नरेंद्र डुलगज, गीता बागडे, गणेश सांडे या कामगारांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी महापौर श्रीचंद तेजवानी यांनी स्वातंत्र्य दिनाचा वर्धापन दिनाच्या मंगलमय प्रसंगी, अमरावतीच्या जनतेला व उपस्थित सर्वांना शुभेच्छा दिल्या. आजचा दिवस केवळ ध्वजारोहणाचा दिवस नाही, तर हा दिवस आहे आपल्या देशाच्या स्वातंत्र्यासाठी बलिदान देणाऱ्या हजारो ज्ञात-अज्ञात स्वातंत्र्य सैनिकांना कृतज्ञतेने स्मरण करण्याचा.



अमरावती महानगरपालिका आज आपल्या ४३ व्या वर्धापन दिनाचा प्रवास पूर्ण करून नव्या दिशेने वाटचाल करत आहे. या ४३ वर्षांच्या प्रवासात अनेक लोकप्रतिनिधी, अधिकारी, कर्मचारी आणि लाखो नागरिकांनी अमरावतीच्या विकासासाठी योगदान दिले आहे. शिक्षण हे शहराच्या भविष्याची खरी गुंतवणूक आहे. महानगरपालिकेच्या ६३ शाळांमधील ११ हजारांहून अधिक विद्यार्थ्यांना डिजिटल बोर्ड, संगणक प्रयोगशाळा आणि आधुनिक क्रीडा सुविधा उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न सुरू आहे. आपल्या शहरातील अभ्यासिका आणि ग्रंथालयांच्या माध्यमातून हजारो तरुण-तरुणींना स्पर्धा परीक्षांच्या माध्यमातून यशाची संधी मिळत आहे.

गोरगरीब आणि गरजू कुटुंबांना घरकुल मिळावे, विधवा व एकल महिलांना रोजगाराची संधी मिळावी, छोट्या व्यावसायिकांना आर्थिक आधार मिळावा—यासाठी विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न आहे. शहराच्या पायाभूत सुविधामध्ये सिमेंट रस्ते, चौकांचे सौंदर्यीकरण, छत्री तलाव आणि वडाळी तलावाचे नूतनीकरण, ऐतिहासिक परकोटाचे जतन आणि शिवटेकडीवरील भव्य शिवसृष्टी अशा विविध प्रकल्पांमधून अमरावतीला नवी ओळख देण्याचा प्रयत्न सुरू आहे. मालमत्ता कराच्या थकीत रकमेवरील शास्तीमध्ये विशेष सवलत देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. दिनांक १५ ऑगस्ट ते ३१ ऑगस्ट २०२६ पर्यंत शास्तीमध्ये १०० टक्के सवलत, १ ते १५ सप्टेंबरपर्यंत ७५ टक्के, १६ ते ३० सप्टेंबरपर्यंत ५० टक्के, तर १ ते १५ ऑक्टोबरपर्यंत २५ टक्के सवलत देण्यात येत आहे.

या कार्यक्रमाचे बॅन्ड पथकाचे संचालन व सुत्रसंचालन विजयकुमार खंडारे यांनी केले.

या कार्यक्रमामध्ये महानगर पालिका आयुक्त डॉ.मंगेश गोंदावले, शर्मिला गोंदावले, अविनाश मार्डीकर, चेतन गावंडे, डॉ.राजेंद्र तायडे, स्वाती कुलकर्णी, इमाईल लालुवाले, प्रीती रेवणे, सभापती राधा कुरीलसुमती ढोके, ममता आवारे, डॉ.मधुरा कहाळे, आशिष अतकरे, मिलींद चिमोटे, संजय नरवणे, मिलींद बांबल, प्रमोद महल्ले, मनिष बजाज, सचिन वैद्य, प्रशांत वानखडे, महेश मुलचंदानी, सैय्यद राशद अली सै. शौकत अली आदि उपस्थित होते.

## भारताची एकता, अखंडता, सार्वभौमत्व आणि संविधानाचा सन्मान सदैव जपू.- आ. सुलभा खोडके

**अमरावती :-** भारत हा विविध धर्म, भाषा, संस्कृती आणि परंपरांचा संगम आहे. अनेकतेत एकता हीच आपल्या देशाची खरी ओळख आहे. आजच्या काळात समाजात सौहार्द, बंधुभाव आणि परस्पर आदर जपणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. आपण सर्वांनी एकजुटीने देशाच्या प्रगतीसाठी योगदान दिले, तर भारत जगातील सर्वात सक्षम आणि विकसित राष्ट्रांपैकी एक बनेल. आज या पवित्र स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने आपण सर्वानी भारताची एकता, अखंडता, सार्वभौमत्व आणि संविधानाचा सन्मान सदैव जपण्यासाठी शपथबद्ध व्हावे, असे आवाहन आ.सुलभा संजय खोडके यांनी केले.

आ. सुलभा खोडके यांच्या जनसंपर्क कार्यालय येथे मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी आमदार महोदयांच्या हस्ते भारतीय



तिरंग्याचे ध्वजारोहण करून राष्ट्रध्वजाला मानवंदना अर्पण करण्यात आली. तसेच सर्व उपस्थितांनी सामूहिक राष्ट्रगान करून देशाप्रतीची कृतज्ञता व्यक्त करून स्वातंत्र्यलढ्यातील थोर महापुरुष, क्रांतिकारी व हुतात्म्यांचे स्मरण केले. यावेळी उपस्थितांना शुभेच्छा देतांना आ.सुलभ खोडके म्हणाल्या कि, स्वातंत्र्य म्हणजे केवळ परकीय सत्तेतून मुक्त होणे नव्हे, तर देशप्रेम, राष्ट्रभक्ती, जबाबदारी, शिस्त, कर्तव्य आणि एकात्मता यांचा स्वीकार करणे आहे. आपल्या संविधानाने प्रत्येक नागरिकाला समान हक्क दिले आहेत, तसेच देशाप्रती काही महत्त्वाची कर्तव्येही दिली आहेत. या कर्तव्यांचे प्रामाणिकपणे पालन करणे हीच आपल्या स्वातंत्र्यसैनिकांना खरी आदरांजली ठरेल. राष्ट्रीय एकता आणि अखंडता हीच आपल्या देशाची सर्वात मोठी ताकद असल्याचे सुद्धा आमदार महोदयांनी अधोरेखित केले. कार्यक्रमाला विधान परिषद आमदार - संजय खोडके, यश खोडके, अविनाश मार्डीकर, प्रशांत डवरे, अँड.किशोर शेळके, ममता संदीप आवारे, भोजराज काळे, मनपा नगरसेवक चंदू खेडकर, प्रशांत धर्माळे, प्रमोद महल्ले, मीनल सवाई, रतन डेंडूले, मनीष बजाज, मंगेश मनोहरे, तसेच नगरसेवक यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस परिवार, सर्व सहकारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अज्ञानाचा अंधार दूर करुन ज्ञानाचा प्रकाश पसरवणे हीच खरी राष्ट्रसेवा - कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते

**अमरावती -** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाने शैक्षणिक विकासामध्ये दिलेले योगदान उल्लेखनीय असून सर्व शिक्षक व विद्यार्थी या योगदानामधील सातत्य कायम ठेवतील. अज्ञानाचा अंधार दूर करुन ज्ञानाचा व कौशल्याचा प्रकाश पसरवणे हीच आपली खरी राष्ट्रसेवा असेल, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी केले. विद्यापीठात ८० वा भारतीय स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

यावेळी कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी ध्वजारोहण केले, त्याप्रसंगी मार्गदर्शन करतांना ते बोलत होते. ध्वजस्तंभाजवळ प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, विद्यार्थी विकास संचालक डॉ. राजीव बोरकर, पदव्युत्तर शारीरिक शिक्षण विभागप्रमुख डॉ. तनुजा राऊत व श्री राजेश पिददी आदी उपस्थित होते.



ध्वजारोहणप्रसंगी

उपस्थितांना संबोधित करतांना कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते म्हणाले, वीर हुतात्म्यांनी आपल्या प्राणांचे बलिदान देऊन आपल्याला स्वातंत्र्य मिळवून दिले, त्यांच्या त्यागाचे स्मरण करण्याचा आणि त्यांच्या चरणी नम्र कृतज्ञता व्यक्त करण्याचा आजचा हा दिवस आहे.

शिक्षण हे समाज परिवर्तनाचे आणि राष्ट्र उभारणीचे सर्वात मोठे साधन आहे. संत गाडगे बाबा यांच्या नावाने ओळखल्या जाणाऱ्या आपल्या विद्यापीठाने नेहमीच ज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञान, साहित्य, सांस्कृतिक, क्रीडा आणि सामाजिक बांधीलकीचा वारसा पुढे चालवला आहे. विद्यापीठाने प्रतिष्ठित क्युएस रँकिंगमध्ये मानाचे स्थान मिळवले असून एशियन युनिव्हर्सिटी रँकिंगमध्ये १००१-११०० बँडमध्ये आणि दक्षिण आशियामध्ये ३३० वा क्रमांक पटकावला आहे. हे यश आपल्या सर्वांच्या प्रचंड मेहनतीचे फलित आहे. आंतरराष्ट्रीय परिषदेत रुबिना चांद शेख आणि डॉ. अनिता पाटील व अनघा उंदिरवाडे यांनी मिळविलेले यश उल्लेखनीय आहे.

विद्यापीठाचे विद्यार्थी, खेळाडू, कलावंत, कलाकार, संशोधक यांनी विद्यापीठाच्या नावलौकिकामध्ये भर घातली आहे. आंतर विद्यापीठ आणि अखिल भारतीय स्तरावरील क्रीडा स्पर्धा, सांस्कृतिक स्पर्धा, संशोधन स्पर्धा आणि इतरही स्पर्धांमध्ये विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी दर्जेदार व नेत्रदीपक कामगिरी करुन पदके व पारितोषिके मिळवली आहेत.

## जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्या हस्ते ध्वजारोहण



**अमरावती(जिमाका) :** जिल्हाधिकारी कार्यालयात ८० वा भारतीय स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा झाला. जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले. विविधक्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या जिल्ह्यातील अधिकारी-कर्मचाऱ्यांचा अधिकाऱ्यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. स्वातंत्र्य दिनी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रांगणात देशप्रेम व उत्साहाचे वातावरण होते. वंदेमातरम् गीताला १५० वर्ष पूर्ण झाल्याच्या औचित्याने कार्यक्रमाची सुरुवात वंदे मातरम् गीताने झाली. यानंतर जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी ध्वजारोहण करून राष्ट्रीय ध्वजास मानवंदना दिली यावेळी पोलीस बँड पथकाकडून राष्ट्रगीत व महाराष्ट्र सादर झाले. जिल्हास्तरावर उत्कृष्ट कार्य करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचा यावेळी प्रमाणपत्र देऊन जिल्हाधिकारी श्री. येरेकर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. जिल्हाधिकार्यालयातील निवडणूक शाखेचे उपजिल्हाधिकारी शिवाजी शिंदे यांना उत्कृष्ट उपजिल्हाधिकारी म्हणून गौरविण्यात आले. तिवसा तहसीलदार मयुर कळसे आणि अचलपूरचे तहसीलदार सुदर्शन शहारे यांना उत्कृष्ट तहसीलदाराच्या पुरस्काराने गौरविण्यात. धारणी तहसील कार्यालयातील नायब तहसीलदार राजेश माळी यांना उत्कृष्ट नायब तहसीलदार म्हणून गौरविण्यात. तहसिल कार्यालय, अंजनगाव सुर्जी चे सहायक महसूल अधिकारी राहुल चव्हाण, मोर्शी तहसिल कार्यालययातील मंडळ अधिकारी मेघा खाडे, जिल्हधिकारी कार्यालयातील महसूल सहाय्यक प्रतिक पावडे, तहसिल कर्यालय यांना उत्कृष्ट कार्यासाठी गौरविण्यात आले.

## माजी विद्यार्थी डॉ. तुषार लांजेवार यांचा विशेष सत्कार

**अंजनगाव बारी :** अंजनगाव बारी येथील जिल्हा परिषद मुलांच्या शाळेत ८० वा स्वातंत्र्य दिन उत्साहपूर्ण व देशभक्तीमय वातावरणात साजरा करण्यात आला. शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष रोशन जयसिंग पुनिया यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रोशन जयसिंग पुनिया होते, तर प्रमुख अतिथी म्हणून शाळेचे माजी विद्यार्थी तथा एम.डी. हृदयरोग तज्ज्ञ डॉ. तुषार लांजेवार उपस्थित होते. यावेळी सरपंच शोभा खडसे, उपसरपंच अरविंद निंबर्ते साहेब, उपाध्यक्षा



दिपाली जुमळे, उमेश वसुले, दीपक निचत, पूजा वाढई, परी धोटे, मोनिका तिखे, माया गुर्जर, बंडू डकरे, जगदीश अंबाडकर, वसंतराव सोनार, पंकज हटवार, प्रशांत माहेकर, गोपाल शेवतकार, दिपाली मलवार, रोशण गभने, अक्षय बारबुद्धे तसेच माजी व्यवस्थापण समिती अध्यक्ष गजानन पाटील उपस्थित होते.

ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळेत शिक्षण घेऊन एम.डी. पदवी प्राप्त करून हृदयरोग तज्ज्ञ म्हणून कार्यरत असलेले डॉ. तुषार लांजेवार यांचा विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी आदर्श म्हणून रोशन जयसिंग पुनिया यांच्या हस्ते शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन विशेष सत्कार करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांनी मोठी स्वप्ने पाहून मेहनतीने ती पूर्ण करावीत, असे आवाहन करण्यात आले. यावेळी मुख्याध्यापिका संध्र्य राठोड, केंद्रप्रमुख प्रविण धाडसे, सर्व शिक्षकवृंद, शाळा व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी व सदस्य, पालक, विद्यार्थी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेतील शिक्षकवृंद व शाळा व्यवस्थापन समितीने परिश्रम घेतले.

## तिरंगा रॅली, संगीतमय कवायत, कॉपीमुक्त अभियानाची शपथ

**अंजनगाव बारी :** जनता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, अंजनगाव बारी येथे ८० वा स्वातंत्र्य दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळा समितीचे सभापती महादेवरावजी चकुले होते. प्रमुख उपस्थितीमध्ये संस्थेचे उपाध्यक्ष राजेश टारपे, संस्थेचे सदस्य सोमेश्वरराव इंगोले, प्राचार्य गजेंद्र अवघड, पर्यवेक्षिका मनिषा चिंचोळकर तसेच गावातील प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते.

प्रारंभी भारतमाता व महात्मा गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला.



अध्यक्ष महादेवरावजी चकुले यांच्या हस्ते ध्वजपूजन व ध्वजारोहण करण्यात आले. राष्ट्रगीत व राज्यगीतानंतर इयत्ता पाचवी ते आठवीच्या विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीतांवर संगीतमय कवायत सादर केली. तसेच विद्यार्थ्यांनी कॉपीमुक्त अभियानाची शपथ घेतली. इयत्ता सातवी, आठवी व नववीच्या विद्यार्थ्यांनी सामूहिक गीत सादर केले. स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांना पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यासाठी मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी गरजू विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते गणवेशाचे वाटप करण्यात आले. दि. १३ ऑगस्ट रोजी संस्थेचे पदाधिकारी, शाळा प्रशासन व गावातील प्रतिष्ठित नागरिकांच्या सहकार्याने आयोजित तिरंगा रॅलीत विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

प्राचार्य गजेंद्र अवघड यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा दिल्या. अध्यक्ष महादेवरावजी चकुले यांनीही शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अमोल डवरे व आभार प्रदर्शन संतोष पवार यांनी केले. यावेळी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, माजी विद्यार्थी व नागरिक मोठ्या संख्येने

## विनायक विद्या मंदिर कला, वाणिज्य महाविद्यालय

**अमरावती -** प्रवीण खोडके मेमोरियल ट्रस्ट अमरावती द्वारा संचालित विनायक विद्या मंदिर कला वाणिज्य महाविद्यालय अमरावती येथे भारताचा ८० वा स्वातंत्र्य दिन सोहळा आज मोठ्या उत्साहात व देशभक्तीपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असलेल्या प्रवीण खोडके मेमोरियल ट्रस्टच्या अध्यक्ष - आमदार - सौ.सुलभाताई संजय खोडके यांच्या हस्ते राष्ट्रध्वजाचे ध्वजारोहण करून मानवंदना अर्पण करण्यात आली. तदनंतर सर्व उपस्थितांनी सामूहिक राष्ट्रगान सादर करून तिरंग्यास सलामी देत स्वातंत्र्य भारताचा गौरव केला. यावेळी उपस्थितांना शुभेच्छा देतांना आमदार - सौ. सुलभाताई खोडके म्हणाल्या कि, देशाला सक्षम, स्वावलंबी आणि विकसित राष्ट्र बनविण्याची मोठी जबाबदारी आजच्या विद्यार्थ्यांवर आहे. विद्यार्थ्यांनी शिक्षणासोबतच देशप्रेम, शिस्त,



सामाजिक बांधिलकी आणि राष्ट्रहिताची भावना मनात रुजवावी. आपल्या ज्ञानाचा व कौशल्याचा उपयोग देशाच्या प्रगतीसाठी करण्याचे आवाहन आमदार महोदयांनी केले.

तत्पूर्वी कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या स्वागताने झाली. विनायक विद्यामंदिराच्या विविध हाऊसेसचे कॅप्टन तसेच स्काऊट-गाईडच्या विद्यार्थ्यांच्या स्क्वॉडने मान्यवरांचे शिस्तबद्ध पद्धतीने स्वागत केले. त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते राष्ट्रपिता महात्मा गांधी व स्वर्गीय विनायकदादा खोडके यांच्या प्रतिमेचे पूजन- वंदन व माल्यार्पण करण्यात आले. ध्वजारोहण झाल्यानंतर राष्ट्रगीताने संपूर्ण वातावरण देशभक्तीने भारावून गेले. यानंतर विद्यार्थ्यांनी प्रतिज्ञेचे वाचन केले तसेच संविधानाच्या उद्देशपत्रिकेचे सामूहिक वाचन करण्यात आले. कार्यक्रमात विनायक गुरुकुलच्या विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीतावर मनमोहक नृत्य सादर करून उपस्थितांची मने जिंकली. तसेच विद्यार्थ्यांनी प्रभावी देशभक्तीपर भाषणे सादर करून स्वातंत्र्यदिनाचे महत्त्व विशद केले. विनायक गुरुकुलच्या गुणवंत - यशवंत विद्यार्थ्यांचा यावेळी मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या विद्यार्थ्यांना विनायक गुरुकुलच्या संचालिका - रेखा सुर्वे व मुख्याध्यापिका आरती निर्मळ मॅडम यांचे मार्गदर्शन लाभले. यावर्षी महाविद्यालयाने आपल्या स्थापनेची २५ वर्षे पूर्ण केली. या रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त महाविद्यालयाच्या वतीने प्रवीण खोडके मेमोरियल ट्रस्टच्या अध्यक्ष आमदार - सौ. सुलभाताई खोडके, व सचिव - श्री यश खोडके यांचा महाविद्यालयाला गेल्या २५ वर्षांपासून मार्गदर्शन करून यशस्वी वाटचालीस प्रेरणा दिल्याबद्दल विशेष सत्कार करण्यात आला.

## देशभक्तिपर गीत, भाषणे व आकर्षक कवायतीने रंगला सोहळा

**अंजनगाव बारी :** गांधी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, बडनेरा येथे ८० वा स्वातंत्र्य दिन उत्साहपूर्ण व देशभक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी न्यू एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष डॉ. हेमंत देव होते. यावेळी आनंदराव इंगोले, डॉ. बळीरामजी ग्रेसपुंजे, रामेश्वर लाड, रमेशजी निचत यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमास विद्यालयाचे प्राचार्य विनोद चिंचोळकर, पर्यवेक्षक दिगंबर करडे, कु. सैनी मॅडम तसेच गांधी इंग्लिश प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रितेश खूळसाम यांनी केले, तर



निलीमा देव यांनी 'वंदे मातरम' सादर केले. यावेळी प्राथमिक इंग्रजी माध्यमातील चिमुकल्या विद्यार्थ्यांनी देशभक्तिपर भाषणे व गीतांचे सादरीकरण करून उपस्थितांची मने जिंकली. विद्यार्थ्यांनी आकर्षक कवायत सादर करत देशभक्तीचा संदेश दिला. एनसीसी पथक, हरित सेना पथक तसेच स्काऊट-गाईड पथकाने प्रमुख पाहुण्यांना मानवंदना दिली. स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांनी नशामुक्ती व कॉपीमुक्तीची शपथ घेतली. विविध देशभक्तिपर कार्यक्रमांमुळे संपूर्ण विद्यालय परिसरात उत्साहाचे व देशभक्तीचे वातावरण निर्माण झाले होते. कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करण्यात आले.

# श्रावण सोमवार शिवमूठ व्रत कथा

# नागकन्या आणि देवकन्येने केली खास मदत

सणाचे महत्व पूजाविधीची माहिती तर आपल्याला मिळतेच परंतु या सणांच्या खास अशा कहाण्या देखील आहेत. श्रावण सोमवारी वाहणाऱ्या शिवमुठीचे अनोखे महत्व आहे. याच सोमवारच्या शिवमुठीचे महत्व सांगणारी ही कथा...श्रावण मासारंभाच्या पहिल्या सोमवारी हा दिवस शिवामूठ म्हणून साजरा केला जातो. यामुळे याला खास महत्व प्राप्त झालं आहे. श्रावण महिना सुरू झाला की श्रावणी सोमवार, मंगळा गौर,नागपंचमी, रक्षाबंधन अशा सर्व सणांची रेलचेल सुरू होते. सणाचं महत्व पूजाविधीची माहिती तर आपल्याला मिळतेच परंतु या सणांच्या खास अशा कहाण्या देखील आहेत. श्रावण सोमवारी वाहणाऱ्या शिवमुठीचे अनोखे महत्व आहे. याच सोमवारच्या शिवमुठीचे महत्व सांगणारी ही कथा...

कथा श्रावण सोमवार शिवामूठीची - आटपाट नगर होते तिथे एक राजा होता, त्या राजाला चार सुना होत्या. तीन आवडत्या होत्या एक नावडती होती. आवडत्या सुनांना तो चांगल्या चांगल्या वस्तू आणून देत असे आणि नावडतीला जेवायला उष्ट खरगटे, नेसायला जाडें भरडे, राहावयास गुरांचे घर आणि गुराख्याचे काम देत असत. पुढे श्रावणमास आला पहिला सोमवार आला त्या दिवशी त्या नावडतीची नागकन्येशी आणि देवकन्येशी भेट झाली, ते कुठे जात आहेत अशी विचारणा केल्यावर कळाले महादेवाच्या देवळात शिवामूठ वाहायला जात आहेत. नावडतीने विचारलं त्याने काय होतं ? भक्ती होते आणि इच्छित कार्य सिद्धीस जाते,मुलबाळ हो,नावडती माणसे आवडती होतात, वडीलधाऱ्यांचा आशिर्वाद मिळतो. यानंतर नागकन्या आणि देवकन्येने नावडतीला विचारलं तू कोणाची कोण ? नावडतीने सांगितले राजाची सून, मी देखील तुमच्या सोबत येते.नावडती त्यांच्याबरोबर देवळात गेली.

**शिवामूठीचा वसा** - नागकन्या आणि देवकन्या वसा वसू लागल्या, नावडतीने विचारले काय बोलताय, तेव्हा त्यांनी सांगितले शिवामूठीचा वसा वसतो आहोत. या वसाला नेमके काय करावे ? मूठ चिमूट तांदुळ घ्यावे, शिवराई सुपारी घ्यावी. गंध फूल घ्यावं, दोन बेलाची पाने घ्यावी, मनोभावे पूजा करावी, हाती तांदूळ घ्यावे आणि म्हणावे शिवा शिवा महादेवा, माझी शिवामूठ ईश्वरादेवा, सासूसासऱ्या, दिराभावा,नणंदाजावा,भ्रतरा,नावडत ी आहे ती आवडती कर रे देवा असे म्हणून तांदूळ वहावेत. संध्याकाळ पर्यंत उपास नाही निभवला तर दूध प्यावे, संध्याकाळी आंघोळ करावी. देवाला बेल वहावा आणि मुकाट्यानं जेवण करावे. हा वसा पाच वर्ष करावा.पहिल्या सोमवारी तांदूळ, दुसऱ्यास तीळ तिसऱ्यास मूग, चौथ्यास जव आणि पाचव्यास सातू शिवमूठीकरीता घ्यावे.

**अशी झाली पूजा सफल** - पहिल्या सोमवारी सगळं साहित्य नागकन्या आणि देवकन्येने दिलं आणि दुसऱ्या सोमवारी नावडतीस घरून आणायला सांगितले. त्या दिवशी तिने मनोभावे पूजा केली. संपूर्ण दिवस उपवास केला. जावानणंदानीं उष्ट माष्ट पान दिले ते तीने गाईला घातले.



शंकराची आराधना केली आणि दूध पिऊन निजून राहिली. पुढे दुसरा सोमवार आला , नावडतीने घरातून सर्व सामान घेतला, पूढे नागकन्येबरोबर जाऊन मनोभावे पूजा केली, आणि शिवा शिवा महादेवा माझी शिवामूठ ईश्वरा देवा, सासूसासऱ्या,दिराभावा, नणंदाजावा,नावडती आहे आवडती कर रे देवा, असे म्हणून तिळ वाहिले. संपूर्ण दिवस उपवास केला, शंकराला बेल वाहिलं,दूध पिऊन निजून राहिली, संध्याकाळी सासऱ्यानं विचारलं तुझा देव कुठे आहे. नावडतीने सांगितले माझा देव लांब आहे, वाटा कठीण आहेत कांटे कुटे आहेत साप वाघ आहेत तेथे माझा देव आहे. पुढं तिसरा सोमवार आला, पूजेचं सामान घेतलं, देवाला जाऊ लागली,घरची माणसं मागे जाऊ लागली. नावडती तुझा देव दाखव म्हणू लागली. नावडतीला रोजचा सराव होता तिला काही वाटलं नाही परंतु सर्वांना पुष्कळ काटेकुटे लागले. नावडतीची दया आली. आजपर्यंत रानात कशी येत असेल कोण जाणे.

वर्तमान देऊळ सुवर्णाचं झाले- नावडतीला चिंता पडली देवाला प्रार्थना केली देवाला तिची करूणा आली. नागकन्या, देवकन्यासह वर्तमान देऊळ सुवर्णाचं झाले. रत्नजडिताचे खांब झाले, सगळ्यांनी देवाचे दर्शन घेतले नावडती पूजा करू लागली गंधफूल वाहू लागली नंतर शिवमूठ घेऊन शिवा शिवा महादेवा माझी शिवामूठ ईश्वरा देवा,सासूसासऱ्या, दिराभावा, नणंदाजावा,नावडती आहे आवडती कर रे देवा, असे म्हणून शिवाला वाहिली. राजाला मोठा आनंद झाला. नावडतीवर प्रेम वाढले. दागिने घालायला दिले, खुंटीवर पागोटं ठेवून तळे पाहायला गेले. नावडतिची पूजा झाली. पूजा झाल्यावर सर्व बाहेर आले. राजा परत आला, माझं पागोटं देवळी राहिले घेऊन येतो म्हणाला देवळाजवळ आला देऊळ अदृश्य झालेलं होतं तेथे एक लहान देऊळ होतं आणि एक पिंड होती. त्यावर नावडतीने केलेली पूजा होती. जवळ खुंटीवर पागोटं होतं ते घेऊन ते बाहेर आले सुनेला विचारू लागले हे असे कसे झाले ? सूनेने सांगितलं माझ्या गरिबाचा हाच देव, मी देवाला प्रार्थना केली त्यामुळे त्याने तुम्हाला दर्शन दिले.

सुनेमुळे देव भेटला म्हणून तिला पालखीत घालून घरी नेलं नावडती होती ती आवडती झाली. जसा तिला शंकर प्रसन्न झाला तसा तुम्हा आम्हा सर्वांना होवो ही साठा उत्तराची कहाणी पाचा उत्तरी सुफळ संपूण.

**प्रियंका वाणी**

---

## यंदा किती श्रावणी सोमवार?



श्रावणातील सोमवारी केल्या जाणाऱ्या शिव पूजनाला अनन्य साधारण महत्त्व आहे. १३ ऑगस्ट पासून श्रावण मास सुरू होत आहे. चातुर्मासातील श्रावण महिन्या ला मराठी वर्षात अनन्य साधारण महत्त्व आहे. प्रत्येक दिवशी व्रत आणि या सगळ्या व्रतांचे वेगवेगळे महत्त्व हे श्रावण महिन्याचे वैशिष्ट्य मानले जाते. आषाढी एकादशी पासून सृष्टीचे पालक श्रीविष्णू योग निद्रेत गेल्यानंतर संपूर्ण ब्रह्मांडाचा कारभार महादेव शिवशंकर यांच्याकडे येतो.

श्रावण मास महादेवांच्या उपासना, पूजन, आराधना यासाठी सर्वोत्तम मानला गेला आहे. श्रावणात येणाऱ्या सोमवारी विशेष व्रताचरण केले जाते. श्रावण महिना पूर्वी 'नभ' या नावाने ओळखला जात असे. या महिन्यात रात्रीच्या प्रारंभी पूर्वेला श्रवण नक्षत्र उगवते आणि रात्रभर आकाशात राहून पहाटे पश्चिमेस मावळते. तसेच श्रावण पौर्णिमेला चंद्र श्रवण नक्षत्रापाशी असतो. म्हणून या महिन्याला 'श्रावण' असे नाव मिळाले आहे. श्रावणातील प्रत्येक दिवसाला वेगळे महत्त्व आहे. श्रावणातील शिवामूठ वाहण्याचे महत्त्व

लग्न झाल्यानंतर सलग पहिली पाच वर्षे महाराष्ट्रात स्त्रिया हे शिवास्त वाहण्याचे व्रत करतात. पाच वर्षानंतर व्रताचे उद्यापन करावे. यथाविधी शंकरांचे पूजा करून आप्तेष्टांना बोलवावे. ब्राह्मण भोजन करावे. भेटवस्तू, दक्षिणा देऊन या व्रताची समाप्ती करावी. या व्रतात श्रावणातील सर्व सोमवारी उपवास केला जातो. शिवपूजन करून त्यावर प्रत्येक सोमवारी क्रमाने तांदूळ, तीळ, मूग, जव यापैकी एकेका धान्याची एक मूठ वाहिली जाते.

पहिल्या श्रावणी सोमवारी तांदळाची एक मूठ, दुसऱ्या श्रावणी सोमवारी तीळाची एक मूठ असा हा क्रम असतो. ही मूठ वाहताना 'नमः शिवाय शान्ताय पंचवक्त्राय शूलिने । शृकभृ - महाकाल णयुक्ताय शम्भवे ।।' असा मंत्र म्हणावा. प्रत्येक सोमवारी शिवामूठ वाहताना शिवा शिवा महादेवा... माझी शिवामूठ ईश्वरा देवा सासू-सासरा, दिरा-भावा, नणंदाजावा, भ्रतारा नावडतीची आवडती कर रे देवा, असे म्हणत महादेवाची मनोभावे पूजा करावी.

श्रावण महिना हा महादेव शिवशंकर यांचे पूजन, नामस्मरण, उपासना करण्यासाठी सर्वोत्तम मानला गेला आहे. श्रावणातील प्रत्येक सोमवारला विशेष महत्त्व प्राप्त होते. श्रावणी सोमवारी महादेव शिवशंकरावर जलाभिषेक, दुग्धाभिषेक, रुद्राभिषेक मोठ्या प्रमाणावर केला जातो. प्रत्येक सोमवारी महादेवावर वाहिल्या जाणाऱ्या शिवामूठीचे महत्त्वही वेगळे आहे.

**पहिला श्रावणी सोमवार:** १७ ऑगस्ट रोजी श्रावण सोमवार आहे. या दिवशी तांदूळ शिवामूठ म्हणून वाहावे.

**दुसरा श्रावणी सोमवार:** २४ ऑगस्ट रोजी श्रावण सोमवार आहे. या दिवशी तीळ शिवामूठ म्हणून वाहावे.


**तिसरा श्रावणी सोमवार:** ३१ ऑगस्ट रोजी श्रावण सोमवार आहे. या दिवशी मूग शिवामूठ म्हणून वाहावे. या दिवशी श्रावण संकष्ट चतुर्थी व्रत आहे.

**चौथा श्रावणी सोमवार:** ७ सप्टेंबर रोजी श्रावण सोमवार आहे. या दिवशी गहू शिवामूठ म्हणून वाहावे.

तसेच या दिवशी श्रावण अजा एकादशी व्रत आहे.

---

## श्रावणात घ्या महाराष्ट्रातील 'या' पवित्र शिव मंदिरांचे दर्शन



श्रावण सुरु होणार आहे. हा पवित्र महिना महादेवांना समर्पित असून या काळात महादेवांच्या मंदिरात गेल्याने अपार पुण्य मिळते. तसेच महाराष्ट्रातील प्राचीन आणि अद्भुत शिवालये आणि ज्योतिर्लिंगांना भेट देण्याचे खूप वैभव आहे. सोमवारी दर्शन घेणे केवळ पुण्यपूर्णच नाही तर आध्यात्मिक अनुभवानेही परिपूर्ण आहे. श्रावण सोमवारी अनेक जण उपवास करतात आणि शिव मंदिरांना भेट देतात आणि आशीर्वाद मिळवतात. महाराष्ट्रात अनेक प्रसिद्ध शिव मंदिरे आहे जी त्यांच्या धार्मिक महत्त्व आणि स्थापत्यकलेसाठी प्रसिद्ध आहे. १२ ज्योतिर्लिंगांपैकी, सर्वाधिक ज्योतिर्लिंगे येथे स्थापित आहे. महाराष्ट्रातील प्राचीन आणि अद्भुत शिवमंदिर आणि ज्योतिर्लिंगांचे दर्शन घेण्याचा खूप महिमा आहे. त्याच वेळी, विशेषतः श्रावणात येथे दर्शन घेतल्याने पुण्य प्राप्त होऊ शकते.

### महाराष्ट्रातील प्रमुख शिवमंदिर

### घृष्णेश्वर ज्योतिर्लिंग, औरंगाबाद

घृष्णेश्वर ज्योतिर्लिंग हे महाराष्ट्रातील औरंगाबाद जिल्ह्यात आहे जे १२ वे ज्योतिर्लिंग म्हणून ओळखले जाते आणि वेरूळच्या लेण्यांजवळ आहे. हे मंदिर श्रावण महिन्यात शिवभक्तांच्या विशेष गर्दीने भरलेले असते.



### त्र्यंबकेश्वर ज्योतिर्लिंग, नाशिक

त्र्यंबकेश्वर ज्योतिर्लिंग हे महाराष्ट्रातील नाशिक जिल्ह्यात आहे. हे मंदिर भारतातील १२ ज्योतिर्लिंगांपैकी एक आहे. गोदावरी नदीच्या काठावर वसलेले हे मंदिर भगवान शिवाच्या त्र्यंबक रूपाला समर्पित आहे. श्रावणात येथे मोठ्या संख्येने भाविक येतात.

### भीमाशंकर ज्योतिर्लिंग, पुणे



भीमाशंकर ज्योतिर्लिंग हे महाराष्ट्रातील पुणे जिल्ह्यात असून हे ज्योतिर्लिंग सह्याद्री पर्वतरांगेत आहे. घनदाट जंगले आणि हिरवळीने वेढलेले हे मंदिर श्रावणात विशेष पूजेसाठी प्रसिद्ध आहे.

### औंध नागनाथ ज्योतिर्लिंग

सतयुगाशी संबंधित औंध नागनाथ ज्योतिर्लिंगाचा उल्लेख रामायण आणि महाभारतातही आढळतो. मंदिराची स्थापत्य कला खूप प्राचीन आणि अद्भुत आहे. असे मानले जाते की पांडवांनी येथे भगवान शिवाची पूजा केली. हे ज्योतिर्लिंग हिंगोली जिल्ह्यात आहे आणि नांदेडपासून सुमारे ५० किमी अंतरावर आहे.

### परळी वैजनाथ ज्योतिर्लिंग

परळी वैजनाथ ज्योतिर्लिंग हे बीड जिल्ह्यात आहे आणि सर्वात जवळचे रेल्वे स्टेशन परळी वैजनाथ आहे. भगवान शिव यांनी येथे अमृत कलश स्थापित केला होता, ज्यामुळे हे ठिकाण अमरत्वाचे प्रतीक बनले. या मंदिरात शिवलिंगावर जल अर्पण करण्यास मनाई आहे, परंतु भाविक बाहेरून जल अर्पण करू शकतात.

### केदारेश्वर मंदिर

हे मंदिर महाराष्ट्रातील अहमदनगर जिल्ह्यातील हरिश्चंद्र गड किल्ल्यामध्ये आहे आणि श्रावण महिन्याच्या सोमवारी येथे लांब रांगा दिसतात. हे एक रहस्यमय मंदिर आहे जे फक्त एकाच खांबावर आहे. हे मंदिर चार युगांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या चार खांबांपैकी एका वर उभे आहे.



---

# माती वाचवा, पाणी जपा, सुरक्षित भविष्य घडवा

महाराष्ट्राच्या विकासाच्या वाटचालीत माती आणि पाणी या दोन नैसर्गिक संसाधनांचे अनन्यसाधारण महत्व आहे. शेती, ग्रामीण अर्थव्यवस्था, पर्यावरण आणि मानवी जीवन यांचा थेट संबंध या दोन्ही घटकांशी आहे. त्यामुळे मातीचे संवर्धन आणि पाण्याचे शाश्वत व्यवस्थापन ही केवळ शासनाची जबाबदारी न राहता ती व्यापक लोकचळवळ बनणे ही काळाची गरज आहे. याच विचारातून राज्यात यंदा २१ ऑगस्ट हा 'जलसंधारण दिन' म्हणून साजरा करण्यात येणार आहे. माजी मुख्यमंत्री दिवंगत सुधाकरराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त साजरा होणारा हा दिवस त्यांच्या जलसंधारणविषयक दूरदृष्टीला अभिवादन करण्याबरोबरच महाराष्ट्राच्या जलसुरक्षित भविष्यासाठी नव्या संकल्पाची सुरुवात ठरणार आहे.

दिवंगत सुधाकरराव नाईक यांनी मुख्यमंत्री म्हणून काम करताना राज्यासमोरील दुष्काळ आणि पाणीटंचाईचे आव्हान केवळ मोठ्या धरणांच्या माध्यमातून सोडविता येणार नाही, हे ओळखले. पावसाचा प्रत्येक थेंब अडविणे, तो जमिनीत मुरविणे आणि स्थानिक पातळीवरील जलस्रोतांचे पुनरुज्जीवन करणे आवश्यक आहे, या भूमिकेतून त्यांनी 'पाणी अडवा, पाणी जिरवा' हा मूलमंत्र दिला. पाणलोट विकास, भूजल पुनर्भरण, पाझर तलाव, गाव तलाव, नाला बांध, माती बंधारे आणि अन्य छोट्या जलसंधारण संरचनांवर त्यांनी भर दिला. जलसंधारणाला स्वतंत्र प्रशासकीय दिशा देत त्यांनी या विषयाला लोकसहभागाची जोड दिली.

१९९१ ते १९९३ या काळात महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून त्यांनी घेतलेले अनेक निर्णय आजही दिशादर्शक ठरतात. ग्रामीण भागातील रोजगार निर्मिती आणि जलसंधारणाची कामे यांची सांगड घालून त्यांनी जलस्रोत निर्मितीला चालना दिली. जलसंधारण हे केवळ अभियांत्रिकीचे काम नसून गावागावातील नागरिकांच्या सहभागातून उभे राहणारे अभियान आहे, ही भूमिका त्यांच्या कार्यातून स्पष्ट झाली. आज जलयुक्त शिवार, भूजल पुनर्भरण, पाणलोट विकास यांसारख्या विविध उपक्रमांमध्ये त्यांच्या विचारांचे प्रतिबिंब दिसून येते.

याच योगदानाची दखल घेत दिवंगत सुधाकरराव नाईक यांचा स्मृतिदिन १० मे हा २००३ पासून जलसंधारण दिन म्हणून साजरा केला जात होता. मात्र, स्मृतिदिनाऐवजी जन्मदिवस अधिक उत्साहपूर्ण आणि लोकसहभागातून साजरा व्हावा, या विचारातून मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी विभागातील अधिकारी, सामाजिक कार्यकर्ते आणि संबंधित घटकांशी चर्चा करून २१ ऑगस्ट हा दिवस जलसंधारण दिन म्हणून साजरा करण्यासाठी पुढाकार घेतला. मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांनी यास मान्यता दिल्यानंतर शासनाने त्याबाबतचा निर्णय घेतला. त्यामुळे यापुढे दरवर्षी २१ ऑगस्ट हा दिवस महाराष्ट्राच्या जलसंधारण चळवळीचा महत्त्वपूर्ण दिवस ठरणार आहे.

व्यापक जनसहभागाची जोड

यंदाचा जलसंधारण दिन केवळ औपचारिक कार्यक्रमांपुरता मर्यादित न ठेवता त्याला व्यापक जनसहभागाची जोड देण्यात आली आहे. १५ ते २१ ऑगस्टदरम्यान 'जलसंधारण सप्ताह', तर १५ ऑगस्ट २०२६ ते २६ जानेवारी २०२७ या कालावधीत 'जलसंधारण अभियान' राबविण्यात येणार आहे. शाळा, महाविद्यालये, ग्रामपंचायती, स्थानिक स्वराज्य संस्था, स्वयंसेवी संस्था, सामाजिक संस्था आणि विविध प्रशासकीय यंत्रणांच्या माध्यमातून जलसंधारणाचा संदेश घराघरात पोहोचविण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

या अभियानातील सर्वात आकर्षक उपक्रम म्हणजे 'महा वॉकेथॉन २०२६ – वॉक फॉर वॉटर'. २१ ऑगस्ट रोजी सकाळी राज्यातील सर्व जिल्ह्यांच्या ठिकाणी एकाच वेळी तीन किलोमीटरची महा वॉकेथॉन आयोजित करण्यात येणार आहे. प्रत्येक जिल्ह्यात किमान दहा हजार नागरिकांच्या सहभागाचे उद्दिष्ट असून, राज्यभरातून तीन लाखांहून अधिक नागरिक प्रत्यक्ष सहभागी होण्याची अपेक्षा आहे. नागरिक, युवक-युवती, विद्यार्थी, महिला, लोकप्रतिनिधी, अधिकारी-कर्मचारी, राष्ट्रीय छात्र सेना, राष्ट्रीय सेवा योजना, 'माय भारत', क्रीडा संस्था, स्वयंसेवी संस्था, उद्योग क्षेत्र, कलाकार आणि विविध क्षेत्रांतील मान्यवर या उपक्रमात सहभागी होणार आहेत.

ही केवळ चालण्याची स्पर्धा नसून जलसंधारणासाठी जनजागृतीची सामूहिक पावले आहेत. वॉकथॉनच्या प्रारंभी सहभागी नागरिकांकडून मृद व जलसंधारणाची सामूहिक शपथ घेतली जाणार आहे. पाण्याचा प्रत्येक थेंब जपणे, मातीची धूप रोखणे, पावसाचे पाणी अडविणे आणि जलस्रोतांचे संवर्धन करणे याबाबत नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. 'माती वाचवा, पाणी जपा, सुरक्षित भविष्य घडवा' हा यंदाच्या अभियानाचा मुख्य संदेश आहे. 'पाणी अडवा, पाणी जिरवा, जलयुक्त महाराष्ट्र घडवा' हा संदेशही या चळवळीला दिशा देणार आहे.

युवकांचा सहभाग वाढविण्यासाठी डिजिटल माध्यमांचाही प्रभावी वापर करण्यात येणार आहे. 'रील फॉर सॉईल ॲण्ड वॉटर कन्झर्वेशन' या उपक्रमातून १५ ते ३० वयोगटातील युवक-युवतींना मृद व जलसंधारणाचा संदेश सर्जनशील पद्धतीने मांडण्याची संधी मिळणार आहे. ३० ते ६० सेकंदांच्या इन्स्टाग्राम रिल्सच्या माध्यमातून मातीची धूप, पाणी बचत, पावसाच्या पाण्याचे संकलन, शेततळी, बंधारे, वृक्षारोपण, भूजल पुनर्भरण आणि पर्यावरण संवर्धन यांसारख्या विषयांवर संदेश देता येणार आहे. अभिनय, संगीत, विनोद, लघुपट, निमेशन, कृत्रिम बुद्धिमत्ता, ड्रोन दृश्ये किंवा अन्य नाविन्यपूर्ण माध्यमांचा वापर करून युवकांना आपली कल्पकता सादर करता येणार आहे. क्ष्ईनएदगर्त्ईर्नैीहा अधिकृत हॅशटॅग वापरून राज्यभरातून मोठ्या प्रमाणात रिल्स तयार करण्याचे उद्दिष्ट आहे.

जलसंधारणाचा संस्कार पुढील पिढीवर व्हावा यासाठी शाळा आणि महाविद्यालयांमध्येही विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. निबंध, चित्रकला, पोस्टर, वादविवाद स्पर्धा, जलसंधारणाची शपथ, 'एक शाळा–एक शोषखड्डा', जलमित्र किंवा जलदूत घोषित करणे अशा उपक्रमांतून विद्यार्थ्यांना जलसंधारणाशी जोडले जाणार आहे. २१ ऑगस्ट रोजी दिवंगत सुधाकरराव नाईक यांच्या प्रतिमेस अभिवादन करून त्यांच्या जलसंधारणविषयक कार्याची माहिती विद्यार्थ्यांना देण्यात येणार आहे.

अभियानाच्या कालावधीत ग्रामीण आणि शहरी भागात प्रत्यक्ष जलसंधारणाच्या कामांनाही गती दिली जाणार आहे. विविध योजनांतर्गत कामांचे भूमीपूजन, लोकार्पण आणि जलपूजन, शेततळी व जलस्रोतांची पाहणी, अमृत सरोवरांच्या परिसरात वृक्षारोपण, नाला, तलाव, विहीर आणि पाझर तलावांची लोकसहभागातून स्वच्छता अशा उपक्रमांवर भर दिला जाणार आहे. जलयुक्त शिवार अभियान २.०, गाळमुक्त धरण-गाळयुक्त शिवार, अमृत सरोवर आणि प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना-पाणलोट विकास घटक यांसारख्या उपक्रमांची माहितीही जनतेपर्यंत पोहोचविण्यात येणार आहे.

जलसंधारणाच्या कामात उत्कृष्ट योगदान देणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांचा गौरव, लोकसहभागातून श्रमदान, जलस्रोतांचे संवर्धन आणि जनजागृती या माध्यमातून शासन आणि समाज यांच्यातील सहभाग अधिक दृढ करण्याचा प्रयत्न आहे. प्रत्येक जिल्ह्यात जिल्हाधिकारी यांच्या स्तरावर समन्वय साधून कार्यक्रमांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येणार आहे. आज हवामान बदल, अनियमित पाऊस, वाढते तापमान, भूजल पातळीतील घट आणि पाण्याची वाढती मागणी यामुळे जलसुरक्षेचे आव्हान अधिक गंभीर झाले आहे. अशा परिस्थितीत सुधाकरराव नाईक यांनी दशकांपूर्वी दिलेला 'पाणी अडवा, पाणी जिरवा' हा संदेश अधिकच महत्त्वाचा ठरतो. जलसंधारणाची कामे किती झाली यापेक्षा ती किती परिणामकारक ठरली, पाणी किती काळ टिकले आणि पुढील पिढीसाठी आपण किती जलसाठा निर्माण केला, हा खरा प्रश्न आहे.

मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी या अभियानाच्या माध्यमातून जलसंधारणाला व्यापक लोकचळवळीचे स्वरूप देण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. त्यांच्या मते, माती आणि पाणी ही निसर्गाची अमूल्य संपत्ती असून त्यांचे संवर्धन ही केवळ शासनाची जबाबदारी नाही, तर प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी आहे.

२१ ऑगस्टचा 'जलसंधारण दिन' त्यामुळे केवळ एका महान नेत्याच्या स्मरणाचा दिवस न राहता महाराष्ट्राच्या जलसुरक्षित भविष्यासाठी सामूहिक संकल्पाचा दिवस ठरला पाहिजे. सुधाकरराव नाईक यांना खरी आदरांजली त्यांच्या प्रतिमेला हार अर्पण करण्यात नाही, तर त्यांच्या विचारांना कृतीची जोड देण्यात आहे. प्रत्येक गावात जलस्रोत जपला, प्रत्येक शेतात पाण्याचा थेंब अडविला, प्रत्येक शाळेत जलसंधारणाचा संस्कार रुजविला ष्ठआणि प्रत्येक नागरिकाने पाण्याची जबाबदारी स्वीकारली, तरच 'जलसंधारण दिना'चा खरा उद्देश साध्य होईल.

माती वाचली तर शेती वाचेल, पाणी जपले तर जीवन सुरक्षित राहील आणि लोकसहभाग वाढला तर महाराष्ट्र जलसंपन्न बनेल. चला, सुधाकरराव नाईक यांच्या जलसंधारणाच्या विचारांना कृतीची जोड देऊया—'माती वाचवा, पाणी जपा, सुरक्षित भविष्य घडवा!'?

**गजानन पाटील,**
विभागीय संपर्क अधिकारी,
माहिती व जनसंपर्क
महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई

# चौकशी समितीला आदेशाचा विसर

# दिग्रस बु. अपहार प्रकरणाची चौकशी रखडली

## गटविकास अधिका-यांच्या आदेशानंतरही १२ दिवस उलटले ; ग्रामस्थांकडून प्रकरण दडपण्याचा आरोप

■ प्रतिनिधी | खेट्री ■

पातूर पंचायत समितीअंतर्गत दिग्रस बुद्रुक ग्रामपंचायतीतील १५ व्या वित्त आयोगाच्या सामान्य निधीच्या कथित अपहारप्रकरणाची चौकशी रखडल्याचे समोर आले आहे. चौकशीसाठी पातूर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी प्रदीप गुजर यांनी ४ ऑगस्ट रोजी तीन अधिकाऱ्यांची समिती गठीत करून सात दिवसांत अहवाल सादर करण्याचे आदेश दिले होते. मात्र, आदेशाला १२ दिवस उलटूनही समितीने चौकशी सुरू करून अहवाल सादर केलेला नसल्याने प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.




दिग्रस बुद्रुक ग्रामपंचायतीतील १५ व्या वित्त आयोगाच्या निधीच्या कथित गैरवापरप्रकरणी तत्कालीन ग्रामपंचायत सचिवावर कारवाईची मागणी सामाजिक कार्यकर्ते विजय ताले यांनी केली होती. यासाठी त्यांनी २७ जुलै रोजी पातूर पंचायत समिती कार्यालयासमोर 'भीक मांगो' आंदोलन केले होते. आंदोलनातून जमा झालेली २१३ रुपयांची रक्कम तत्कालीन सचिवाला मनीऑर्डरने पाठविण्यासाठी गटविकास अधिकाऱ्यांकडे सुपूर्द करण्यात आली होती.

या आंदोलनाची दखल घेत गटविकास अधिकाऱ्यांनी ४ ऑगस्ट रोजी तीन अधिकाऱ्यांची चौकशी समिती गठीत केली.

सात दिवसांत चौकशी पूर्ण करून अहवाल सादर करण्याचे स्पष्ट निर्देश असतानाही समितीतील अधिकारी अद्याप ग्रामपंचायतीत चौकशीसाठी पोहोचले नसल्याचे सांगण्यात येत आहे. त्यामुळे गटविकास अधिकाऱ्यांच्या आदेशालाच केराची टोपली दाखविली जात असल्याची चर्चा ग्रामस्थांमध्ये सुरू आहे. दरम्यान,

**'अहवाल प्राप्त झालेला नाही; स्मरणपत्र देणार'**

गटविकास अधिकारी प्रदीप गुजर यांनी सांगितले की, 'दिग्रस बुद्रुक ग्रामपंचायतीतील अपहारप्रकरणी ४ ऑगस्ट रोजी तीन अधिकाऱ्यांची समिती गठीत करून सात दिवसांत अहवाल सादर करण्याचे आदेश दिले होते. मात्र, अद्याप अहवाल प्राप्त झालेला नाही. त्यामुळे समितीला स्मरणपत्र देण्यात येणार आहे.'

चौकशीला होत असलेल्या विलंबामुळे हे प्रकरण दडपण्याचा प्रयत्न तर होत नाही ना, असा सवाल उपस्थित केला जात असून, समितीतील अधिकाऱ्यांच्या भूमिकेकडे दिग्रस बुद्रुकवासीयांचे लक्ष लागले आहे.

# महसूल–भूमी अभिलेख कार्यशाळेत प्रलंबित प्रश्नांवर मंथन

## 'ब' वर्ग जमिनीच्या 'अ' वर्गीकरणासह मालमत्ता पत्रक, मोजणीच्या अडचणींवर चर्चा

■ प्रतिनिधी | अकोला ■

महसूल व भूमी अभिलेख विभागाशी संबंधित प्रक्रिया अधिक सुलभ, पारदर्शक व तंत्रज्ञानाधारित करण्याच्या उद्देशाने शहरात प्रथमच तांत्रिक मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन नियोजन भवन येथे करण्यात आले. एसीसीई इंडिया–अकोला, नरेडको अकोला आणि इन्स्टिट्यूट ऑफ इंडियन आर्किटेक्ट्स (आयआयए), अकोला यांच्या संयुक्त विद्यमाने झालेल्या कार्यशाळेला अकोला, अकोट, मूर्तिजापूर, खामगाव, वाशिम, बुलढाणा, कारंजा व पातूर येथील १५५ हून अधिक अभियंते, वास्तुविशारद व अधिकारी उपस्थित होते.

उद्घाटनप्रसंगी आमदार साजिद खान पठाण यांनी महसूल व भूमी अभिलेखाशी संबंधित कामांसाठी प्रमाणित कार्यपद्धती तयार करण्याची तसेच विशेष शिबिरांच्या माध्यमातून 'ब' वर्ग जमिनीचे 'अ' वर्गीकरण व वर्गबदलाची प्रक्रिया सुलभ करण्याची गरज व्यक्त केली.

उपसंचालक भूमी अभिलेख राजेंद्र गोडे यांनी भूमी अभिलेखांच्या डिजिटल रूपांतरणाबाबत मार्गदर्शन केले. जिल्हा अधीक्षक भारती खंडेलवाल यांनी ऑनलाइन प्रणालींचे प्रात्यक्षिक दाखविले. उपजिल्हाधिकारी निखिल खेमनार यांनी फेरफार नोंदी व धारणाधिकार बदलाची प्रक्रिया



स्पष्ट केली. उपअधीक्षक सिद्धेश्वर गोडे यांनी भूमी अभिलेखांच्या अचूकतेसाठी कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाच्या वापराबाबत माहिती दिली, तर मंडळ अधिकारी विशाल काटोले यांनी ऑनलाइन महसूल प्रणालीविषयी मार्गदर्शन केले.

कार्यशाळेत 'ब' वर्ग जमिनीचे 'अ' वर्गीकरण, एका मालमत्ता पत्रकात असलेल्या अनेक मालमत्तांसाठी स्वतंत्र पत्रक तयार करणे, सदनिकाधारकांसाठी उभ्या स्वरूपातील मालमत्ता पत्रक, तसेच मोजणी प्रक्रियेतील अडचणी या विषयांवर सविस्तर चर्चा झाली. कार्यशाळेपूर्वी क्षेत्रातील समस्या व उपाययोजनांचा तक्ता प्रशासनास सादर करण्यात आला. त्यावर सकारात्मक प्रतिसाद देत प्रलंबित विषयांसाठी विशेष शिबिरे घेण्याचे आश्वासन अधिकाऱ्यांनी दिले.

मुख्य संयोजक इंजी. पंकज कोठारी यांनी प्रशासन, तांत्रिक क्षेत्रातील व्यावसायिक व नागरिकांना एका व्यासपीठावर आणणे हे कार्यशाळेचे प्रमुख यश असल्याचे सांगितले. सहसंयोजक इंजी. प्रो. इस्माईल नाजमी व इंजी. मकरंद पांडे यांनी सहकार्याबद्दल आभार मानले. सूत्रसंचालन इंजी. अनुराग अग्रवाल यांनी केले.

यावेळी एसीसीईचे चेअरमन अभिजीत परांजपे, सचिव श्याम ठाकूर, कोषाध्यक्ष संजय भगत, माजी चेअरमन अजय लोहिया, शाम साधवानी, शेखर मुखेडकर, रिझवान कुरेशी, मयूर सिंघानिया, इंद्रनील देशमुख, नरेश अग्रवाल, कुशल जैन व विशाल तडस; नरेडकोचे अध्यक्ष सुनील इन्नानी, उपाध्यक्ष पुरुषोत्तम मालानी, अविनाश राऊत, कोषाध्यक्ष अक्षय ठोकळ व संजय तुलशान; तसेच आयआयएचे चेअरमन वास्तुविशारद मनीष भुतडा, सचिव सर्वेश केला, कोषाध्यक्ष हर्षल वाकोडे, सुमित अग्रवाल, ईश्वर आनंदानी, जगदीश काबरा, मनोज मोदी व जयप्रकाश राठी यांच्यासह पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.

# सहकार परिवाराचा वनभोजन व स्नेहमेळावा उत्साहात

## ३५-४० वर्षांची परंपरा कायम; निसर्गाच्या सानिध्यात जुळली स्नेहाची नाती



■ प्रतिनिधी | अकोट ■

निसर्गरम्य वातावरण, धरणाच्या पाण्याचा शीतल सहवास आणि सहकार क्षेत्रातील कार्यकर्त्यांची उत्स्फूर्त उपस्थिती अशा आनंददायी वातावरणात 'सहकार परिवार, आकोट'तर्फे १५ ऑगस्ट रोजी वनभोजन व स्नेहमेळाव्याचे आयोजन करण्यात आले. गेल्या ३५ ते ४० वर्षांपासून सुरू असलेल्या या परंपरेतून सहकारातील आपुलकी, विश्वास आणि विचारांचे बंध यंदाही अधिक दृढ झाले.

वनभोजनाच्या निमित्ताने सहकार क्षेत्रातील कार्यकर्ते, विविध संस्थांचे पदाधिकारी, संचालक, सरपंच, सेवा सहकारी सोसायट्यांचे सभापती व सदस्य, शेतकरी तसेच समाजधुरीण मोठ्या संख्येने सहभागी झाले. शेती, पीक-पाणी, शेतकऱ्यांच्या अडचणी तसेच कौटुंबिक विषयांवरील गप्पांमुळे मेळाव्याला विशेष रंगत आली.

यंदाच्या मेळाव्यात ज्येष्ठ सहकार नेते स्व. हिदायत पटेल यांच्या अनुपस्थितीची प्रकर्षाने जाणीव झाली.

सहकार क्षेत्रातील त्यांच्या योगदानाच्या आणि आठवणींचा उपस्थितांनी भावपूर्ण उल्लेख करीत त्यांना आदरांजली वाहिली.

अकोला-वाशीम जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष डॉ. जयराज कोरपे यांनी प्रथमच या मेळाव्यास उपस्थिती लावली. यावेळी सहकार परिवाराच्या वतीने ज्येष्ठ नेते नानासाहेब हिंगणकर यांच्या हस्ते डॉ. कोरपे यांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. मेळाव्याच्या यशस्वी आयोजनासाठी अकोट सहकारी जिनिंग फॅक्टरी, कृषी उत्पन्न बाजार समिती तसेच खरेदी-विक्री संघाचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व संचालकांनी विशेष परिश्रम घेतले. शेवटी सहकार परिवाराचे अध्यक्ष नानासाहेब हिंगणकर यांनी उपस्थित सहकारी बंधू-भगिनींचे आभार मानले.

## सुमिरमा फाउंडेशन ने केले ध्वज व चॉकलेट वितरण

■ प्रतिनिधी | अकोला ■

सामाजिक व वैद्यकीय सेवेत सक्रिय असणाऱ्या सुमिरमा फाउंडेशनच्या वतीने नागरिकांना ध्वज व चॉकलेट वितरण करण्यात आले.नागरिकांत देशभक्तीची भावना जागृत करण्याच्या उद्देशाने स्वातंत्र्य दिनावर हा उपक्रम राबविण्यात आला. स्थानीय टॉवर चौक परिसरात फाउंडेशनच्या अध्यक्ष डॉ पूजा सुमित्रा रमाकांत खेतान यांच्या अध्यक्षतेत व फाउंडेशन चे मार्गदर्शक रमाकांत खेतान यांच्या उपस्थितीत आयोजित केला आहे.

**Change In Name**

I Have Change My Mother Name in My Educational Documents etc. From -
**MUMTAZ PARAVIN**
-TO-
**MUMTAZ BEGAM MOHAMMAD KHALID**
My Residential Address is Pola Chauk, Kaliyan Wadi, Akola, Maharashtra 444002

**Change In Name**

I have changed my Name in my Son Passport - (W2287742)
Old Name
**FARJANA BANO VINDHANI**
New Name-
**FARZANA BANO MOHAMMAD NASIR VINDHANI**
Address is -Gulshan Foot Wear Behind Manek Talkies Akola 444001 Maharashtra.

**Change In Name**

Passport no N8661117I Have Change My name From
SWAPNIL
**SUBHASHCHANDRA WANKHADE**
-TO-
**SWAPNIL SUBHASH WANKHADE**
My Residential address is ANAND SOCIETY SAVJI APARTMENT JATHARPETH AKOLA - 444005

**Change In Name**

I Have Changed My Name in My Passport - (W2287742)
Old Name
GULAM MOHAMMAD VINDHANI
New Name
**GULAM MOHAMMAD MOHAMMAD NASIR VINDHANI**
Address is -Gulshan Foot Wear Behind Manek Talkies Akola 444001 Maharashtra.

**Change In Name**

I have changed my Name in my Son Passport - (W2287742)
Old Name -
**MOHAMMAD NASIR VINDHANI**
New Name -
**MOHAMMAD NASIR MOHAMMAD IQBAL VINDHANI**
Address is - Gulshan Foot Wear Behind Manek Talkies Akola 444001 Maharashtra.

# महानगरात प्रथमच महसूल व भूमी अभिलेख तांत्रिक मार्गदर्शन कार्यशाळा संपन्न

■ प्रतिनिधी | अकोला ■

महानगरात प्रथमच महसूल व भूमी अभिलेख विषयक तांत्रिक मार्गदर्शन कार्यशाळा संपन्न झाली.जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवनात भूमी अभिलेख व महसूल विभागाच्या सहकार्याने व एसीसीई अकोला,नरेडको अकोला व आयआयए अकोला यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या कार्यशाळेत आयोजकांच्या वतीने महसूल व भूमी अभिलेख विभागाशी संबंधित प्रत्यक्ष कामकाजातील विविध अडचणी, त्यावरील संभाव्य उपाययोजना, त्यातून होणारे फायदे तसेच समस्या सोडविण्या ची कार्यपद्धती यांचा सविस्तर तक्ता तयार करून संबंधित अधिकाऱ्यांसमोर सादर करण्यात आला. या तत्त्याच्या माध्यमातून क्षेत्रातील अभियंते, वास्तुविशारद व नागरिकांना भेडसावणाऱ्या समस्या प्रशासनाच्या निदर्शनास आणून देण्यात आल्यात. कार्यशाळे दरम्यान अधिकाऱ्यांनी या समस्यांवर सविस्तर मार्गदर्शन करत अनेक बाबींचे प्रत्यक्ष निराकरण कसे करता येईल हे स्पष्ट केले. त्यामुळे ही कार्यशाळा केवळ माहितीपर न राहता 'समस्या –उपाय–अंमलबजावणी' या त्रिसूत्रीवर आधारित ठरली.कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी आ साजिद खान पठाण यांनी महसूल व भूमी अभिलेखाशी संबंधित विविध कामांसाठी प्रमाणित, भविष्यात विशेष शिबिरांच्या माध्यमातून 'ब' वर्ग जमिनीचे 'अ' वर्गीकरण कारण्यसाठी पारदर्शक व सुलभ कार्यपद्धती तयार करण्याची गरज व्यक्त केली.भूमी अभिलेख, अमरावती विभागचे उपसंचालक राजेंद्र गोडे यांनी भूमी अभिलेखांच्या डिजिटायझेशन प्रक्रियेबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.भूमी अभिलेख अकोला जिल्हा अधीक्षक श्रीमती भारती खंडेलवाल, यांनी विविध ऑनलाइन प्रणालींचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक करून दाखविले.

**Change In Name**

I have change my name From
**"MOHAMMAD NISAR"**
(As per Old Passport Name/ Wrong Name)
-TO-
**"MOHAMMAD NISAR MOHAMMAD ANSAR"**
(New Name as per on Two Photo ID)
Address (If as per old passport or if change then as per Adhar) "OPP BAKRA MARKET KAGZI PURAAKOLA MAHARASHTRA"
Passport No. " M8173328"
FILE NO. NG1068481461015

## जाहीर नोटीस

**वि.सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १३४५/२०२६ — प्रोसेस नं.१०४००/२०२६
चौ.ता. २९/०९/२०२६ — दिनांक : १२/०८/२०२६

**अर्जदार :** १. श्रीमती. ज्योत्सना भगवान ठाकरे २. आरती संतोष राउत रा. मुं. रोहणा, ता. खामगाव, जि. बुलढाणा. ३. भक्ती भगवान ठाकरे ४. सोहम भगवान ठाकरे अर्जदार क. १, ३ व ४ रा. छाया हॉस्पिटल मागे, ज्ञानेश्वर नगर, डाबकी रोड, अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : भगवान पंढरी ठाकरे
**पत्ता :-** रा. छाया हॉस्पिटल मागे, ज्ञानेश्वर नगर, डाबकी रोड, अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत भगवान पंढरी ठाकरे यांचे दि. २०/०५/२०२५ रोजी अकोला येथे निधन झाले आहे. वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २९/०९/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १२/०८/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक २४७**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail. com, abhiram.deshpande70@gmail.com

# सावरगाव ग्रामपंचायतीच्या चौकशीसाठी त्रिसदस्यीय समिती

■ प्रतिनिधी | खेट्री ■

पातूर पंचायत समिती अंतर्गत सावरगाव ग्रामपंचायतीतील कथित आर्थिक अनियमितता व निधीच्या गैरव्यवहाराची चौकशी होत नसल्याच्या निषेधार्थ सामाजिक कार्यकर्ते जानू बाबूसिंग राठोड, महादेव पायघन यांच्यासह ग्रामस्थांनी १३ ऑगस्टपासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू केले होते. या आंदोलनाची दखल घेत बाळापूरचे आमदार नितीन देशमुख यांनी १४ ऑगस्ट रोजी उपोषणस्थळी भेट देत मध्यस्थी केली. त्यानंतर पातूरचे गटविकास अधिकारी यांच्याशी दूरध्वनीवरून चर्चा करून चौकशीचा मार्ग मोकळा करण्यात आला.

सावरगाव ग्रामपंचायतीतील कथित अपहार व आर्थिक अनियमिततेची चौकशी करण्यासाठी पातूर पंचायत समितीतील सहाय्यक गटविकास अधिकारी, विस्तार अधिकारी आणि ग्रामीण गृहनिर्माण अभियंता

## गटविकास अधिका-यांच्या आश्वासनानंतर आमरण उपोषणाची सांगता ; सात दिवसांत अहवाल सादर करण्याचे आदेश



**सात दिवसांत अहवाल सादर करण्याचे आदेश**

गटविकास अधिकाऱ्यांनी जारी केलेल्या आदेशानुसार, समितीने सावरगाव ग्रामपंचायतीतील कथित अपहार प्रकरणाची सखोल व निष्पक्ष चौकशी करून सात दिवसांच्या आत अहवाल सादर करावा, असे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत. त्यामुळे आता समितीतील अधिकाऱ्यांची भूमिका आणि चौकशीचा अहवाल काय निष्पन्न करतो, याकडे सावरगाववासीयांचे लक्ष लागले आहे.

यांची त्रिसदस्यीय समिती गठित करण्यात आली आहे. समितीमार्फत प्रकरणाची सखोल चौकशी करण्यात येणार असून, या आश्वासनानंतर उपोषणाची सांगता करण्यात आली. दरम्यान, समिती गठित झाल्याने सावरगाव ग्रामस्थांचे आता चौकशीच्या निष्कर्षाकडे लक्ष लागले आहे. गैरव्यवहाराची वस्तुनिष्ठ चौकशी होऊन दोषींवर कारवाई होते का, याकडे ग्रामस्थांचे लक्ष आहे.

## माहेश्वरी समाजाचा स्वातंत्र्य दिनावर साहित्य पुरस्कार सोहळा

■ प्रतिनिधी | अकोला ■

माहेश्वरी भवनात माहेश्वरी समाजाच्या वतीने स्वातंत्र्य दिन व साहित्य पुरस्कार वितरण सोहळा संपन्न झाला. समाज ट्रस्टचे अध्यक्ष विजयकुमार तोष्णीवाल यांच्या अध्यक्षतेत आयोजित या सोहळ्यात प्रमुख पाहुणे म्हणून नगरसेवक व निर्माण व्यवसायिक सुनील ईन्नानी, माहेश्वरीच्या संपादिका किरण मुंदडा (नागपूर), बसंती चांडक रिलीफ फाऊंडेशनचे अध्यक्ष श्यामसुंदर चांडक प्रमुखत्वाने उपस्थित होते.मंचावर महिला मंडळाच्या अध्यक्षा वंदना हेडा, वरिष्ठ प्रकोष्ठचे अध्यक्ष सुरेश माहेश्वरी, प्रमिला लाहोटी, प्रगती मंडळाचे अध्यक्ष सूरज काबरा, नवयुवती मंडळाच्या अध्यक्षा साक्षी तोष्णीवाल आदी उपस्थित होते. सर्वप्रथम सुनील ईन्नानी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. समाजाच्या पारंपारिक उद्योगांना प्रोत्साहन देण्यासाठी तरुण पिढी पुढे येऊन आपले व्यवसाय उन्नत करण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले. अध्यक्षीय मनोगत विजयकुमार तोष्णीवाल यांनी करून स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा व्यक्त केल्या. समारंभाच्या दुसऱ्या सत्रात बसंती चांडक साहित्य पुरस्कार सोहळा पार पडला.

# रुग्णसेवा हीच ईश्वरसेवा मानावी

## देवनाथ पीठाधीश जितेंद्रनाथ महाराज; व्यवहारे हॉस्पिटलचे दिमाखात लोकार्पण

■ प्रतिनिधी | अकोट ■

अकोटसह ग्रामीण भागातील नागरिकांना अत्याधुनिक वैद्यकीय सुविधा स्थानिक पातळीवर उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने उभारण्यात आलेल्या वर्षा व्यवहारे स्मृती व्यवहारे हॉस्पिटल अँड डेंटल क्लिनिकचे शनिवारी दिमाखात लोकार्पण करण्यात आले. रुग्णांची सेवा हीच ईश्वरसेवा मानून डॉ. सूरज व्यवहारे व डॉ. उत्तरा व्यवहारे यांनी वैद्यकीय क्षेत्रात कार्य करावे, असा हितोपदेश सुर्जी-अंजनगाव येथील देवनाथ पीठाचे पीठाधीश जितेंद्रनाथ महाराज यांनी केला.

लोकार्पण सोहळ्याला खासदार अनुप धोत्रे, आमदार डॉ. संजय कुटे, आमदार रणधीर सावरकर, नगराध्यक्ष मायाताई धुळे, माजी आमदार संजय गावंडे यांच्यासह महेश गणगणे, डॉ. रणजीत सपकाळ, डॉ. दीपक मोरे,



डॉ. मुकुंद अष्टपुत्रे, डॉ. जयराज कोरपे, डॉ. राजेश सावजी, डॉ. प्रणाम सदावर्ते, डॉ. विक्रांत पाटणकर आदी मान्यवर उपस्थित होते. जितेंद्रनाथ महाराज म्हणाले, ग्रामीण भागात दर्जेदार वैद्यकीय सुविधा उपलब्ध होणे ही काळाची गरज आहे. अकोटमध्ये सर्व सुविधांनी सुसज्ज हॉस्पिटल सुरू झाल्याने रुग्णांना उपचारासाठी अकोला अथवा अन्य शहरांकडे धाव घेण्याची गरज कमी होणार असून त्यांचा वेळ व पैसा वाचणार आहे. व्यवहारे कुटुंबीयांनी व्यापारी क्षेत्रात जपलेली सचोटी डॉ. सूरज व डॉ. उत्तरा वैद्यकीय क्षेत्रातही कायम ठेवतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. उपस्थित लोकप्रतिनिधींनी हॉस्पिटलच्या माध्यमातून अकोट परिसरातील नागरिकांना उत्तम आरोग्यसेवा मिळावी, यासाठी आवश्यक ते सहकार्य करण्याची ग्वाही दिली.

**'रुग्णसेवेचा वसा कायम ठेवू'**

डॉ. सूरज व डॉ. उत्तरा व्यवहारे रुग्णसेवेला व्यवसाय न मानता वसा म्हणून स्वीकारतील. नागरिकांच्या विश्वासाला पात्र ठरण्यासाठी प्रामाणिकपणे सेवा देण्याचा प्रयत्न राहील, असे सुरेश व्यवहारे यांनी सांगितले. सर्वांच्या शुभेच्छा व आशीर्वाद सदैव पाठीशी राहावेत, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. कार्यक्रमाच्या प्रारंभी सुरेश व्यवहारे व डॉ. सूरज व्यवहारे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. लोकार्पण सोहळ्यास अकोट शहरासह परिसरातील नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

**आईच्या आठवणीने डॉ. सूरज भावुक**

हॉस्पिटलच्या लोकार्पणाचा आनंदाचा क्षण असतानाच आई वर्षा व्यवहारे यांच्या आठवणीने डॉ. सूरज व्यवहारे भावुक झाले. 'आज एवढे भव्य आणि सुसज्ज हॉस्पिटल जनसेवेत रुजू होत आहे; मात्र हा क्षण पाहण्यासाठी माझी आई हयात नाही,' असे सांगताना त्यांच्या भावना अनावर झाल्या. या प्रसंगाने उपस्थितांनाही भावूक केले.

# गुल्लरघाट आश्रमशाळेचा 'खेळखंडोबा' थांबणार कधी? अंजनगाव-बाभळीच्या वादात विद्यार्थ्यांचे भविष्य भरडले जाऊ नये!

## प्रशासनाच्या निर्णयक्षमतेवरच प्रश्नचिन्ह ?

**खल्लार/प्रतिनिधीः-** शासकीय आदिवासी माध्यमिक आश्रमशाळा गुल्लरघाटच्या स्थलांतराचा प्रश्न आता केवळ शाळेच्या इमारतीपुरता मर्यादित राहिला नसून तो थेट आदिवासी विद्यार्थ्यांच्या शिक्षणाच्या अधिकाराशी आणि भवितव्याशी निगडित झाला आहे. अंजनगाव सुर्जी येथे उपलब्ध असलेल्या तुलनेने योग्य सुविधांच्या इमारतीत शाळा सुरू करण्यात आल्यानंतर पुन्हा बाभळी येथे शाळा सुरू ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यामुळे प्रशासनाच्या निर्णय प्रक्रियेवरच गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत.

अंजनगाव सुर्जी येथील इमारतीची पाहणी करून आदिवासी विकास विभाग तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अहवालात ती विद्यार्थ्यांच्या वास्तव्याच्या दृष्टीने तुलनात्मकदृष्ट्या योग्य असल्याचे स्पष्ट झाल्याचे सांगण्यात येते. मग विद्यार्थ्यांसाठी अधिक सुरक्षित व सुविधायुक्त पर्याय उपलब्ध असताना शाळा पुन्हा बाभळीला नेण्याची गरज का निर्माण झाली.

हा प्रश्न प्रशासनाने पालकांसमोर आणि जनतेसमोर स्पष्ट करणे आवश्यक आहे. पालक, शाळा व्यवस्थापन समिती, कृती समिती व इतर घटकांकडून सातत्याने निवेदने देण्यात आली.

अंजनगाव येथे विद्यार्थी पाठविणार नसल्याची भूमिका घेण्यात आली. या भूमिकेमागे काही स्थानिक राजकीय व इतर घटकांचा प्रभाव असल्याची चर्चा असली तरी त्याची सत्यता प्रशासनाने तपासणे आवश्यक आहे. कारण हा प्रश्न कोणाच्या राजकीय प्रतिष्ठेचा नसून विद्यार्थ्यांच्या भवितव्याचा आहे.




### एका वर्षाची परवानगी म्हणजे कायमस्वरूपी तोडगा नव्हे! -

अप्पर आदिवासी आयुक्त, अमरावती यांनी पालकांच्या विनंतीचा विचार करून बाभळी येथे शाळा केवळ एका वर्षासाठी सुरू ठेवण्यास मान्यता दिल्याची माहिती आहे. इमारत मालकाशी एक वर्षाचा करार करण्यात आला असून आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. परंतु येथेच प्रशासनाला एक मूलभूत प्रश्न विचारावा लागेल एक वर्षानंतर काय? पुन्हा शाळा कुठे नेणार? पुन्हा विद्यार्थी कुठे पाठवायचे? पुन्हा पालकांची निवेदने, समित्यांचे ठराव आणि प्रशासनाचे आदेश यांचा सिलसिला सुरू होणार का?

### विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष प्रयोगशाळा नाही!

शासकीय यंत्रणेसाठी ठिकाण बदलणे हा कागदावरील निर्णय असू शकतो; परंतु विद्यार्थ्यांसाठी तो त्यांच्या शिक्षणातील सातत्य, मानसिक स्थैर्य आणि भविष्यातील संधींवर परिणाम करणारा निर्णय असतो. वारंवार स्थलांतर, सुविधांचा अभाव आणि शाळा नेमकी कुठे राहणार याबाबतचा संभ्रम यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना केवळ चार भिंतींची इमारत नको; त्यांना सुरक्षित निवास, स्वच्छ पाणी, स्वच्छतागृहे, वीज, पुरेशा वर्गखोल्या, प्रयोगशाळा, क्रीडा सुविधा, आरोग्य सुविधा आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण आवश्यक आहे.

### कायमस्वरूपी जागेचा प्रश्न तातडीने निकाली काढा-

शाळेसाठी कायमस्वरूपी जागा उपलब्ध करून घेण्यासाठी नोडल अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यात आल्याचे सांगण्यात येते. ही बाब स्वागतार्ह असली तरी त्याची कार्यवाही केवळ कागदोपत्री राहू नये. कायमस्वरूपी जागा निश्चित करण्यासाठी कालबद्ध आराखडा, निधी, बांधकामाचे नियोजन आणि विद्यार्थ्यांना आवश्यक सुविधा याबाबत प्रशासनाने स्पष्ट भूमिका जाहीर करणे गरजेचे आहे. शाळा कोणाच्या हट्टासाठी नव्हे, तर विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी चालली पाहिजे. अंजनगाव-बाभळीच्या वादाला पूर्णविराम देऊन सुविधायुक्त, सुरक्षित आणि कायमस्वरूपी शैक्षणिक व्यवस्था उभी करणे हीच प्रशासनाची खरी कसोटी आहे.

विद्यार्थ्यांच्या सोयीनुसार प्रशासनाने गुल्लरघाट आश्रम शाळेचे स्थलांतर अंजनगाव येथे करण्यात आले होते. मात्र विद्यार्थ्यांचे पालक विद्यार्थी पाठवण्यास तयार नाहीत. त्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून एक वर्षाच्या कालावधीसाठी शाळा ही बाभळी येथे पुन्हा सुरू करण्यात आली असून लवकरच शासनाच्या नियोजित जागेवर इमारत उभी होणार आहे.

**-संदीप गोलाईत, अप्पर आयुक्त** -आदिवासी विकास,अमरावती

### एकाच शाळेचे दोन ठिकाणी स्वातंत्र्यदिन!

या प्रकरणातील विसंगती आणखी अधोरेखित करणारी बाब म्हणजे बाभळी आणि अंजनगाव या दोन्ही ठिकाणी स्वातंत्र्यदिन साजरा करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. मग शाळा नेमकी कुठे आहे? विद्यार्थी कोणत्या ठिकाणी शिकणार? शिक्षकांची उपस्थिती कुठे राहणार? शाळेचा अधिकृत प्रशासकीय कारभार कोणत्या ठिकाणाहून चालणार? या प्रश्नांची स्पष्ट उत्तरे पालक आणि विद्यार्थ्यांना मिळणे आवश्यक आहे. पालकांच्या मागण्यांचा आदर करणे आवश्यक आहे. परंतु पालकांच्या भावनिक मागणीसोबतच विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा, शिक्षणाच्या गुणवत्तेचा आणि उपलब्ध सुविधांचा वस्तुनिष्ठ विचार करणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे.

जिथे सुविधा अधिक, सुरक्षितता अधिक आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला पोषक वातावरण आहे, तिथेच शाळा असावी. शाळेचे ठिकाण ठरविताना कोणत्या गटाचा आग्रह जास्त आहे, यापेक्षा विद्यार्थ्यांच्या हितासाठी कोणता पर्याय योग्य आहे, हा निकष असला पाहिजे.

# २४५ किलो प्लास्टिक जप्त

## -महानगरपालिकेची प्रतिबंधित प्लास्टिकविरोधात कारवाई

**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती महानगरपालिकेच्यावतीने प्रतिबंधित प्लास्टिकविरोधात विशेष धडक कारवाई करण्यात आली. फोनद्वारे प्राप्त झालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे इतवारा बाजार परिसरातील गॅरेज लाईन (ट्रान्सपोर्ट लाईन) येथे तपासणी करण्यात आली. या कारवाईदरम्यान एका गॅरेजमधून प्रतिबंधित प्लास्टिकचा मोठा साठा आढळून आला. महानगरपालिकेच्या पथकाने सागर गॅरेज येथून ८ पोते (कट्टे) प्रतिबंधित प्लास्टिक साहित्य जप्त केले. या साहित्याचे एकूण वजन २४५ किलो असल्याचे प्रशासनाने सांगितले. या कारवाईत प्लास्टिक बंदी नोडल अधिकारी ए. के. गोहर, प्लास्टिक बंदी स्वास्थ्य निरीक्षक सचिन सैनी, अतिक्रमण विभाग प्रमुख योगेश कोल्हे तसेच अतिक्रमण विभागाचे अधिकारी व कर्मचारी सहभागी झाले होते.महानगरपालिकेने शहरात प्रतिबंधित प्लास्टिकचा वापर, साठा व विक्री करणाऱ्यांविरुद्ध अशाच प्रकारच्या धडक कारवाया पुढेही सुरू राहणार असल्याचा इशारा दिला आहे.

# संजय गांधी व श्रावणबाळ योजनेच्या लाभार्थ्यांसाठी डिजिटल लाइफ सर्टिफिकेट सक्तीचे

**अमरावती :** संजय गांधी निराधार योजना व श्रावणबाळ योजनेतील सर्व लाभार्थ्यांसाठी डिजिटल लाइफ सर्टिफिकेट अर्थात हयात प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य करण्यात आले आहे. लाभार्थ्यांनी तातडीने हयात प्रमाणपत्र काढावे, अन्यथा त्यांचा मासिक लाभ बंद होऊ शकतो, असे तहसिलदार, संजय गांधी योजना शहर विभाग अमरावतीच्या तहसिलदार डॉ. प्रियंका मिसाळ यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविले आहे. लाभार्थी मोबाईलवर संबंधित ॲप डाउनलोड करून स्वतः डिजिटल लाइफ सर्टिफिकेट तयार करू शकतात किंवा जवळच्या सेतू केंद्रात जाऊन डिजिटल लाइफ सर्टिफिकेट काढून घेऊ शकतात तसेच तहसील कार्यालयातूनही ही प्रक्रिया पूर्ण करता येणार आहे.

# जिल्ह्यात १२ सप्टेंबर रोजी 'राष्ट्रीय लोकअदालत'

## -प्रलंबित खटले तडजोडीने मिटवण्याचे आवाहन

**अमरावती/प्रतिनिधीः-** राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण व महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण यांच्या निर्देशानुसार, शनिवार १२ सप्टेंबर २०२६ रोजी अमरावती जिल्ह्यातील सर्व न्यायालयांमध्ये 'राष्ट्रीय लोकअदालती' चे आयोजन करण्यात आले आहे. न्यायालयात दाखल असलेली आणि दाखलपूर्व (प्री- लिटीगेशन) प्रकरणे या लोकअदालतीमध्ये तडजोडीने व सामंजस्याने निकाली काढण्यात येणार आहेत. या लोकअदालतीचे विशेष वैशिष्ट्य म्हणजे पक्षकारांना यासाठी कोणत्याही प्रकारचे अतिरिक्त शुल्क भरावे लागणार नाही. तसेच, यामध्ये ठेवण्यात आलेल्या प्रकरणांचा अंतिम निकाल त्याच दिवशी लावण्यात येणार आहे. यामुळे पक्षकारांचा वेळ आणि पैसा दोन्हीची बचत होणार आहे. नागरिकांनी आपले तडजोडपात्र प्रलंबित खटले 'राष्ट्रीय लोकअदालती'मध्ये ठेवून सामंजस्याने मिटवण्यासाठी संबंधित न्यायालयात त्वरित अर्ज करण्याचे आवाहन, अमरावती जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश उज्वला एम. नंदेश्वर आणि सचिव संजय ता. सहारे यांनी केले आहे. तसेच, दाखलपूर्व प्रकरणांबाबत नागरिकांनी आपल्या नजीकच्या संबंधित जिल्हा किंवा तालुका न्यायालयाशी संपर्क साधावा आणि १२ सप्टेंबर २०२६ रोजी आयोजित होणाऱ्या 'राष्ट्रीय लोकअदालती'चा जास्तीत जास्त लाभ घ्यावा असेही प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविले आहे.

# जी. एम. पेटे विद्यालय व श्रीधरपंत बनसोड विद्यालय ब्राह्मणवाडा थडी येथे स्वातंत्र्यदिन उत्साहात

**ब्राह्मणवाडा थडी :** महात्मा फुले शिक्षण संस्थेच्या जी. एम. पेटे विद्यालय व श्री. श्रीधरपंत बन्सोड उच्च माध्यमिक विद्यालय शांतिनिकेतन प्रायमरी स्कूल स्कायलाईट कॉन्व्हेंट, ब्राह्मणवाडा थडी येथे विविध उपक्रमांनी स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा करण्यात आला. देशभक्तीची भावना जागृत करणाऱ्या विविध उपक्रमांमुळे विद्यालय परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.



स्वातंत्र्यदिनानिमित्त संस्थेचे अध्यक्ष राहुल बन्सोड यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी संस्थेचे सचिव अशोकराव बनसोड, संस्थेचे उपाध्यक्ष केशवराव दाभाडे, श्रीराम पंत सोनार माजी मुख्याध्यापक एस डी हागे ,माजी शिक्षक बदुकले सर ,रूपरावजी तडस मुख्याध्यापक अतुल बनसोड शांतिनिकेतन प्रायमरी स्कूलचे मुख्याध्यापक सचिनराव गोंगे स्कायलाईटच्या मुख्याध्यापिका वांगे मॅडम यांच्यासह गावातील प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते.

याप्रसंगी विद्यालयात आयोजित करण्यात आलेल्या चित्रकला व रंगभरण स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांना तसेच देशभक्तीपर गीत गायन स्पर्धेतील विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते बक्षीस देऊन गौरविण्यात आले. चित्रकला स्पर्धेत यशस्वी दिवाकर गायकवाड, वेदिका विलास भिमटे आणि ईशिका राजेंद्र चुके यांनी उल्लेखनीय यश संपादन केले.

तसेच देशभक्तीपर गीत गायन स्पर्धेत आनंदी निलेश खेरडे, श्रीनव सचिन चर्जन आणि सोहम मनोहर खडके यांनी उत्कृष्ट सादरीकरण करून बक्षिसे पटकावली. दरम्यान, दि. १४ ऑगस्ट रोजी विद्यालयातून भव्य तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. हातात तिरंगा ध्वज घेऊन विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर घोषणा देत गावातून रॅली काढली. या रॅलीत विद्यार्थी, शिक्षक व नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

कार्यक्रमास एच. एस. भगत, एन. एम. बोडखे, एस. एस. कदम, एम. जे. भातकुले, आर. आर. उसरबर्से, डी. एम. भडके, व्ही. आर. नेरकर, व्ही. एस. शिरनाथ, डी. बी. गावनेर, ए. एस. सोनार, आर. डी. धुर्वे, एस. के. दामदर, बी. व्ही. राजपूत, डी. एस. पाटील, जी. व्ही. आमझरे, डी. एस. गवई, जी. एन. मेस्कर, एस. बी. बोडखे यांच्यासह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डी. बी. गावनेर यांनी केले.

# ट्रक अपघातात दोन महिलांचा बळी गेल्याने कठोर कारवाई करा

## मृतकांच्या कुटुंबियांची जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक

**अमरावती/प्रतिनिधीः-** राजापेठ उड्डाणपुलावर २८ जुलै रोजी नो-एंट्रीत धावणाऱ्या ट्रकने दोन निष्पाप महिलांचा बळी घेतल्यानंतर शहरातील वाहतूक व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. या भीषण अपघातात बोरगाव धर्माळे येथील २५ वर्षीय गायत्री प्रमोदराव धर्माळे आणि भटवाडी येथील ३९ वर्षीय हर्षा आदित्यराव गावडे या दोघींचा मृत्यू झाला. या घटनेची सखोल चौकशी करण्याचे आदेश देण्यात आले होते, मात्र आतापर्यंत करण्यात आलेल्या चौकशीची माहिती संबंधित कुटुंबियांना अद्याप मिळालेली नाही. यामुळे संतप्त नागरिक आणि मृतकांच्या



नातेवाईकांनी आज बुधवार १२ ऑगस्ट रोजी जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक देऊन निवेदन दिले. निवेदनात म्हटले आहे की, अपघातास कारणीभूत असलेल्या ट्रकचे परमीट तात्काळ रद्द करावे. चालकाकडे वैध परवाना आणि वाहनासंबंधी कागदपत्रे होती का याचीही चौकशी व्हावी. मृतकांच्या परिवाराला प्रत्येकी ५० लाख रुपयांची मदत द्यावी. शहरात हेल्मेटसह इतर वाहतूक नियमांची कडक अंमलबजावणी व्हावी. निवेदनकर्त्यांनी आरोप केला की, शहरात २०० रुपयात निकृष्ट दर्जाचे हेल्मेट सर्रास विकले जात आहेत. केवळ पोलिसांच्या दंडाच्या भीतीने नागरिक हेल्मेट खरेदी करतात, मात्र अपघाताच्या वेळी ते सुरक्षितता देत नाहीत.

विशेष म्हणजे अपघातातील दोन्ही महिलांनी हेल्मेट घातले होते, तरीही त्यांचा जीव वाचू शकला नाही.नियम पाळून ही जर जीव जाणार असेल तर नागरिकांनी नियम पाळायचे कशासाठी?' असा संतप्त सवाल यावेळी उपस्थित करण्यात आला.

शहरातील वेलकम पॉईंट परिसरातील मुख्य रस्त्यावर उड्डाणपूल झाल्याने होणारी वाहतूक कोंडी, विनापार्किंग आणि अनधिकृत उभे राहणारे वाहनांवर कारवाई, तसेच टू-व्हीलर थेट कारवाईची मागणीही करण्यात आली आहे.नो-एंट्रीत अवजड वाहने, खाजगी बस, पीएमपी आणि निकृष्ट हेल्मेट विक्रीवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी कुटुंबीयांनी केलेली आहे.

# जॅक अँन्ड जील इंग्लिश आणि शांती देवी पब्लिक स्कूलमध्ये स्वातंत्र्य दिन साजरा

**अमरावती/प्रतिनिधीः-** जॅक अँन्ड जील इंग्लिश स्कूल आणि शांती देवी पब्लिक स्कूल मध्ये स्वातंत्र्य दिनाचा कार्यक्रम संपन्न झाला.

या कार्यक्रमात श्रीमती किरण मीलापजी जैन शांतीदेवी एज्युकेशन सोसायटी सदस्य आणि अभिनंदन कोआपरेटिव्ह बॅंक संचालिका व दिलीप मुदलियार संस्थापक शांती देवी एज्युकेशन सोसायटी यांच्या हस्ते सर्वप्रथम ध्वजारोहणाचा समारंभ पार पडला. त्यानंतर लगेच वंदे मातरम, राष्ट्रगीत जन गण मन व महाराष्ट्र गीताचे गायन केले गेले.

कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती अमरावती महानगरपालिकेचे नगरसेवक सचीन वैद्य , इस्माईल कासम लालुवाले नगर सेवक, सभापती झोन क्रमांक तीन तसेच विद्याताई माटे, नगरसेविका यांची लाभली.






यावेळी शाळेच्या विद्यार्थ्यांनी डंबेल्सचे सादरीकरण केले. विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीताचे गायन केले. तसेच बरेच विद्यार्थ्यांनी स्वातंत्र्य दिनाच्या पर्वावर आपले मनोगत सादर केले.

स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने सर्व मान्यवरांच्या हस्ते शालेय परिसरात आज वृक्षारोपण सुद्धा करण्यात आले. लहान लहान मुले आज विविध क्रांतिकारक तसेच थोर नेते यांच्या वेशभूषा करून आलेली होती.

कार्यक्रमाच्या यशस्वीते करिता संस्था सचिव दुर्गेश्वरी दिलीप मुदलीयार मॅडम व जयेश दिलीप मुदलियार यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

कार्यक्रमाला मुख्यापिका चित्रा डोईफोडे ,शाळेतील शिक्षिक व शिक्षकेतर कर्मचारी वृंद , विद्यार्थी तसेच पालक मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते.

उपस्थित मान्यवरांनी आपल्या भाषणामध्ये शाळेतील विद्यार्थ्यांना प्रोत्साहित केले तसेच सदैव त्यांचे मार्गदर्शन वेळोवेळी देण्याचा प्रयत्न करतील असे आश्वासन सुद्धा दिले. सर्वांचे कौतुक सुद्धा केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माधुरी मॅडम व वेदांती मॅडम यांनी केले.तर आभार प्रदर्शन काजल मॅडम यांनी केले.


## फ्लॅट विकणे आहे

शास्त्री नगर , टोपे नगर बोर्ड ऑफिस जवळ असलेला डुप्लेक्स फ्लॅट विकणे आहे . एक बेड रूम , किचन, स्वतंत्र डायनिंग , प्रशस्त हॉल, एक गेस्ट रूम, टेरेस असा फ्लॅट आहे.

**संपर्क : ९४२२८५७१६९ ९४२२१२०४०६**


जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**

**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक ३३९**
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

**जाहीर नोटीस**
**जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, अमरावती**

**क्रमांक/न.भू-१/अपील अर्ज क्र.२७८६/२०२५** **अमरावती, दिनांक १२/०८/२०२६**

प्रति,
१) मंदाबाई कृष्णराव पवार
रा.नवाब प्लॉट, पेंशनपुरा, परतवाडा,
ता.अचलपूर, जि.अमरावती
— **अपिलार्थी**

**विरुध्द**

१) उपअधिक्षक भूमि अभिलेख, अचलपूर
ता.अचलपूर, जि.अमरावती
२) सुमनताई भिमराव खानझोडे
३) आशा ज्ञानेश्वर भागवतकर (मय्यत)
३अ) अभिजीत ज्ञानेश्वर भागवतकर,
रा.पेंशनपुरा, परतवाडा, ता.अचलपूर, जि.अमरावती
४) शिला चंद्रशेखर वाठोडकर
रा.यशोदा नगर, बडनेरा हायवे रोड, गल्ली नं.१, अमरावती
५) उषा सुधाकर बेलनकर
रा.पेंशनपुरा, परतवाडा, ता.अचलपूर, जि.अमरावती
— **उत्तरार्थी**

ज्याअर्थी अपिलार्थी यांनी महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम १९६६ चे कलम २४७ अंतर्गत मौजा मौजा परतवाडा, ता.अचलपूर, जि.अमरावती येथील शिट नं.२१, प्लॉट क्र.६५ चे बाबत उत्तरार्थी यांचे विरुध्द अपिल सादर केलेले आहे. परंतु उत्तरवादी क्र.२ ते ५ हे सुनावणी वेळी उपस्थित राहत नसलेमुळे उत्तरार्थी यांना याव्दारे कळविण्यात येते की, दिनांक १५/०१/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता या न्यायासनासमोर आपण स्वतः किंवा आपले अधिवक्ता मार्फत सदर अपिलास उत्तर देण्यासाठी हजर रहावे. आपण वरील तारखेस सदर अपिलकामी न्यायासनासमोर गैरहजर राहिल्यास एकतर्फी निकाल देण्यात येईल.

आज दिनांक ११/०८/२०२६ रोजी माझ्या सहीने व शिक्क्यानिशी दिले आहे.

शिक्का

**सही/-**
**(महेशकुमार शिंदे)**
**जिल्हा अधिक्षक भूमि अभिलेख**
**अमरावती**

# राज्यस्तरीय छायाचित्र स्पर्धा १८ पासून

## आमदार प्रवीण पोटे यांच्या हस्ते होणार उद्घाटन

**अमरावती/प्रतिनिधीः-** रेवणसिद्ध संस्था आणि गेल इंडिया लि. यांच्या संयुक्त विद्यमाने येत्या १८ ऑगस्टपासून तीन दिवसीय राज्यस्तरीय छायाचित्र स्पर्धा आणि प्रदर्शनीचे आयोजन अंबागेट स्थित मृगेंद्र मठ येथे करण्यात आले आहे. या स्पर्धेचे उद्घाटन आमदार प्रवीण पोटे पाटील यांच्या हस्ते होणार असल्याची माहिती आज मंगळवार ११ ऑगस्ट रोजी पत्रकार परिषदेमध्ये आयोजकांनी दिली. त्यांनी सांगितले की, उद्घाटन सोहळ्यामध्ये हव्याप्रा मंडळच्या सचिव डॉ माधुरी चेंडके, मनपा विरोधी पक्षनेता विलास इंगोले,गेल इंडियाचे व्यवस्थापक प्रा. रविकांत कोल्हे, नगरसेवक प्रा संजय तीरथकर, एड.प्रशांत देशपांडे, शिवराय कुलकर्णी, विवेक कलोती, सुनीता भेले, प्रा. संजय शिरभाते, ललिता सुरेश रतावा, समाजसेवक नानाराम नेभनानी उपस्थिती राहणार आहे.स्पर्धेचे बक्षीस वितरण २० ऑगस्ट रोजी सायंकाळी ६ वाजता होणार आहे. यावेळी ज्येष्ठ भाजपा नेते जयंत डेहनकर, दिनेश सूर्यवंशी, किरण पातूरकर, प्राचार्य दीपक धोटे, राजेश चंदनपाक,वरिष्ठ छायाचित्रकार श्याम जुनघरे यांची उपस्थिती असेल. स्पर्धकांना माजी महापौर विलास इंगोले यांच्याकडून स्मृतिचिन्ह प्रदान केले जाणार आहे.छायाचित्रकारांना स्पर्धा आणि प्रदर्शनीत सहभागी होण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे. पत्रकार परिषदेमध्ये उदय चाकोते, प्रा.रविकांत कोल्हे, सनी केचे, पंकज क्षीरसागर, राहुल रामेकर आदि उपस्थित होते.



# जिल्ह्यात ३२ हजारावर शेतकऱ्यांना ३१६ कोटी रुपयांची कर्जमाफी - पालकमंत्री

**वर्धा /जनमाध्यम**

शेतकऱ्यांना कर्जमुक्त करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना जाहीर केली. जिल्ह्यात या योजनेसाठी पात्र शेतकऱ्यांची संख्या ३२ हजार ५३५ इतकी असून ३१६ कोटींच्या कर्जमाफीचा लाभ त्यांना मिळणार आहे. पहिल्या टप्प्यात १० हजार ६३५ शेतकऱ्यांच्या खात्यात १०७ कोटी जमा करण्यात आले आहे, असे पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांनी सांा-गितले.

पोलिस मुख्यालयाच्या प्रांगणात भारताच्या ८० व्या स्वातंत्र्यदिनाचा सोहळा आयोजित करण्यात आला होता. ध्वजारोहनानंतर शुभेच्छा संदेशपर भाषण करतांना पालकमंत्री बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी वान्मथी सी, मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण, जिल्हा पोलिस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल, अप्पर जिल्हाधिकारी संजय तेली, भारतीय प्रशासकीय सेवेतील परिवीक्षाधिन अधिकारी शोभिका पाठक तसेच माजी सैनिकांचे कुटुंबिय, नागरिक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सुरुवातीस पालकमंत्र्यांनी देशाच्या स्वातंत्र्यासाठी लढलेल्या सर्व शुरविर, देशभक्तांना नमन केले. स्वातंत्र्यानंतर देशाला विकासाच्या मार्गावर पुढे नेणे फार मोठे आव्हान होते. देशासह आपले राज्य देखील आज विकासाच्या बाबतीत झपाट्याने पुढे जात आहे. गेल्या दहा बारा वर्षात देशाने विकासाच्या बाबतीत वेगवगळ्या क्षेत्रात उल्लेखनिय काम केले असल्याचे पालकमंत्री म्हणाले.

शेतकऱ्यांना वीज सवलत देण्याचा ऐतिहासिक निर्णय

**८२ हजार शेतकऱ्यांना १७० कोटी रुपयांची वीज सवलत**

देखील राज्य शासनाने घेतला. मुख्यमंत्री बळीराजा वीज सवलत योजनेतून जिल्ह्यातील ८२ हजार ८६४ शेतकऱ्यांना मार्च अखेर पर्यंत १७० कोटींची वीज सवलत देण्यात आली. प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना व राज्य शासनाच्या नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेतून प्रत्येकी ६ हजार याप्रमाणे जिल्ह्यातील १ लाख ३ हजार शेतकऱ्यांना प्रतिवर्षी १२ हजार रुपयांचे आर्थिक सहाय्य देण्यात येत आहे.

शेतकऱ्यांना उद्योजक बनविण्यासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी प्रधानमंत्री सुक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजना सुरु केली. जिल्ह्यात या योजनेतून १ हजार ८० प्रकल्पांना मंजूरी देण्यात आली तर २४ कोटीहून अधिक रक्कमेचे बँक कर्ज वितरीत करण्यात आले. मंजूर प्रकल्पांपैकी ९५० उद्योग कार्यान्वित देखील झाले आहे. या प्रकल्पांना ९ कोटी रुपयांचे अनुदान देण्यात आले आहे.

सर्वसामान्य नागरिकांना विनामुल्य आरोग्य तपासणी व उपचाराची सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी यावर्षी आपण आरोग्य अमृत महोत्सव राबविला. विधानसभा मतदारसंघनिहाय आयोजित या शिबिरात २१ हजार १२२ नागरिकांची आरोग्य तपासणी करण्यात आली. तपासणीत विविध आजार आढळून आलेल्या रुग्णांना पुढील उपचार देखील आपण उपलब्ध करून देतो आहे.

तळेगाव (शामजीपंत) येथे १५५ कोटी खर्चाचे ३००



खाटांचे रुग्णालय मंजूर झाले. हिंगणघाट येथे १५१ कोटी खर्चाची ४०० खाटांची नवीन रुग्णालय इमारत मंजूर झाली. हिंगणघाट येथे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय देखील होत आहे. जिल्ह्यात आरोग्य क्षेत्रात उल्लेखनिय काम होत आहे. आयुष्मान भारत जनआरोग्य योजनेंतर्गत ५ लाखापर्यंतचे उपचार मोफत केले जातात. जिल्ह्यात १ लाख ३२ हजार रुग्णांना या योजनेचा लाभ देण्यात आला आहे. यासाठी ३३६ कोटी रुपयांचे आर्थिक सहाय्य करण्यात आले आहे.

पायाभूत सुविधांच्या उभारणीवर आपण भर देतो आहे. गेल्यावर्षी २३ कोटींचे वनभवन आपण मंजूर करून घेतले. इंझापूर येथे नवीन जिल्हा कारागृहाच्या निर्मितीसाठी १२० एकर जागा, सहकार संकुलसाठी २ एकर जागा मंजूर झाली आहे. आर्वी व देवळी येथे तालुकास्तरीय एकात्मिक बाल विकास प्रकल्प अधिकारी कार्यालयासाठी प्रत्येकी २ कोटी ३८ लाख व २ कोटी ५० लाख खर्चाच्या इमारती मंजूर झाल्या. जिल्हास्तरीय महिला व बाल विकास भवनसाठी १५ कोटी रुपयाचा प्रस्ताव आपण केला आहे. महिलांसाठी हक्काचे ठिकाण या भवनाच्या रुपाने उभे राहणार असल्याचे पालकमंत्री म्हणाले.

पुलगाव येथे वर्धा नदीवर तसेच आजनसरा येथे यवतमाळ वर्धा जिल्हा सिमेवर प्रत्येकी ४० कोटी रुपये खर्चाचे मोठे पुल बांधण्यात येत आहे. आंजी येथे २६ कोटी रुपये खर्च करून ग्रामीण रुग्णालय व सेलू येथे ४७ कोटी रुपये खर्च करून न्यायालयीन इमारत बांधण्यात येत आहे. यापुर्वी कधीही झाली नसेल इतकी विकासाची कामे जिल्ह्यात होत आहे. पोलिस दलाच्या आधुनिकीकरणावर आपला भर आहे. त्यामुळे पोलिस विभागास जिल्हा नियोजनमधून ५ कोटी ७१ लाख उपलब्ध करून देण्यात आला. जिल्ह्याकरीता न्यायसहाय्य वैज्ञानिक प्रयोगशाळा व निवासी प्रशिक्षण केंद्र मंजुर केले. या केंद्राच्या कार्यालयाकरीता तात्पुरत्या स्वरुपात ९७ लाखाचा निधी देखील देण्यात आला आहे.

जिल्ह्यातील खेळाडूंना

**स्वातंत्र्यदिनानिमित्त पालकमंत्र्यांच्याहस्ते मुख्य ध्वजारोहण**

उत्तम दर्जाच्या क्रीडा सुविधा उपलब्ध होणे आवश्यक आहे. राज्य शासनाकडून क्रीडा संकुलांसाठी निधी मिळतो. आपण जिल्हा नियोजन मधून देखील यासाठी भरीव तरतूद केली आहे. जिल्हा क्रीडा संकुलात ४०० मीटर सिंथेटीक धावनपथ व पॉलीमर ग्रास फुटबॉलचे मैदान आपण उभारतो आहे. १३ कोटी रुपये खर्च करून होत असलेले हे मैदान नोव्हेंबर पर्यंत पुर्ण होण्याची अपेक्षा आहे.

प्रधानमंत्री आवास योजनेसह विविध योजनेतून जिल्ह्याला २४ हजार घरकुले मंजूर झाली आहे. त्यापैकी १० हजारावर घरे बांधून पुर्ण झाली. घरकुलासाठी जागा उपलब्ध नसल्याच्या कारणावरून एकही पात्र लाभार्थी वंचित राहू नये, अशा सुचना आपण केल्या आहे. घरकुलासाठी शासकीय जागा द्या, जागा उपलब्ध नसल्यास जागा खरेदीसाठी अनुदान उपलब्ध करून देण्याचे निर्देश देखील दिले आहे. जिल्ह्यात लखपती दीदी हा उपक्रम आपण मोठ्या प्रमाणावर राबविला. स्वयंसहायता समुहातील १ लाख ४१ हजार महिलांना त्यांचे आर्थिक उत्पन्न वाढवून लखपती दीदी बनविण्यात आल्या आहे.

महसूल प्रशासन अधिक गतिमान, पारदर्शी आणि कार्यक्षम होत आहे. श्री छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानाच्या पहिल्या टप्प्यात जिल्ह्यात ४२ हजारावर महसूली सेवा व प्रमाणपत्र उपलब्ध करून

**१ लाख ३२ हजार रुग्णांना उपचारासाठी ३३६ कोटींचे सहाय्य**

देण्यात आले. गेल्यावर्षी राष्ट्रनेता प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा जन्मदिवस ते राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंती दरम्यान राबविण्यात आलेल्या सेवा पंधरवाड्यात ७२ हजारावर लाभार्थ्यांना विविध शासकीय योजनांचा लाभ देण्यात आला आहे.

बोर आपल्या जिल्ह्यातील महत्वाकांक्षी व्याघ्र प्रकल्प आहे. येथे हमखास वाघाचे दर्शन होत असल्याने गेल्या काही दिवसात पर्यटकांची संख्या वाढली आहे. येथे पर्यटकांना चांगल्या सुविधा उपलब्ध होण्यासाठी १० कोटींची विकास कामे केली जात आहे. मृद व जलसंधारणाचे महत्व भावी युवा पिढीला महत्व पटवून देण्यासाठी १५ ते २१ ऑगस्ट या कालावधीत जलसंधारण सप्ताह राबविण्यात येत आहे. याअंतर्गत दि.२१ ऑगस्ट रोजी महा वॅकेथॅान तसेच युवकांसाठी जलसंधारण या विषयावर इन्स्टाग्राम रील स्पर्धा आयोजित असून या चांगल्या उपक्रमास योगदान देण्याचे आवाहन पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांनी यावेळी केले.सुरुवातीस पालकमंत्र्यांनी स्वातंत्र्यदिनानिमित्त ध्वजारोहन केले. त्यानंतर परेड निरिक्षण तसेच पोलिस दलाच्यावतीने मानवंदनेचा कार्यक्रम पार पडला. शालेय विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर सांस्कृतिक कार्यक्रमाचे सादरीकरण केले. यावेळी वीर माता, वीर पत्नींचा सत्कार तसेच उत्कृष्ट काम करणाऱ्या अधिकारी, कर्मचाऱ्यांचा गौरव देखील पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांच्याहस्ते करण्यात आला.

# तिरंगा शानाने फडकत राहावा, यासाठी कर्मातून देशसेवा करूया - संदीप कदम

## रोटरीचा स्वातंत्र्यदिन ठरला प्रेरणादायी

**वर्धा/ जनमाध्यम**

स्वातंत्र्य म्हणजे केवळ परकीय सत्तेच्या बेड्या तुटणे नव्हे, तर राष्ट्राप्रती कर्तव्य निभावण्याचा अखंड संकल्प होय, या भावनेतून रोटरी क्लब गांधी सिटी वर्धा आणि स्व. पुष्पादेवी भूत मेमोरियल ट्रस्टच्या वतीने बुनियाद शिक्षा केंद्रात स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी राष्ट्रभक्ती, शिक्षण आणि सामाजिक जबाबदारीचा सुंदर संगम पाहायला मिळाला.

रोटरी क्लबचे अध्यक्ष संदीप कदम यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना, आपल्या श्रम, विवेक आणि कर्मांनी माँ भारतीला सींचूया. तिरंगा सदैव अभिमानाने फडकत राहावा यासाठी कर्तव्य पथावरून कधीही विचलित होणार नाही, असा संकल्प



दिला. शिक्षणाच्या माध्यमातून भावी पिढी सक्षम करणे हीच राष्ट्रनिर्मितीची प्रभावी साधना असल्याचे त्यांनी नमूद केले.

बुनियादचे संचालक शैलेश सिन्हल यांनी २०२० नंतर केंद्रात झालेल्या शैक्षणिक बदलांची आणि विद्यार्थ्यांच्या यशोगाथांची माहिती दिली. संस्थापक गोविंद भूत यांनी अधिकारांसोबत कर्तव्य आणि सामाजिक जबाबदारीचे भान विद्यार्थ्यांना करून दिले. रोटरी प्रांत ३०३० चे सचिव श्रीनिवास लेले, रमेश बेद व आसिफ जाहिद यांनीही विचार व्यक्त केले.

विद्यार्थिनींनी केलेले सूत्रसंचालन आणि इंटरेक्ट क्लबच्या विद्यार्थ्यांच्या देशभक्तिपर नाट्यछटांनी उपस्थितांची मने जिंकली.यानंतर लिटिल अर्थ टाउनशिपमध्ये रोटरी कार्निव्हल रंगला. क्रीडा स्पर्धा, मनोरंजक खेळ, अंताक्षरी, देशभक्तीपर गीतांसह गणपती महाआरतीने वातावरण भक्तिमय झाले. संजय मानमोडे व उमेश टावरी यांच्या संचालनातून झालेला हा उपक्रम राष्ट्रभक्तीला सेवाभावाची जोड देणारा ठरला.

# अल्पवयीनांच्या हातात दुचाकी; पालकांनो, आता तरी सावधान

## हिंगणघाटच्या दुर्दैवी घटनेनंतर वाहतूक विभागाचा इशारा

## आजपासून विनापरवाना चालकांवर कठोर कारवाई

**वर्धा/ जनमाध्यम**

हिंगणघाट शहरात स्वातंत्र्य दिनी घडलेल्या भीषण दुचाकी अपघातात तीन अल्पवयीन मुलींचा दुर्दैवी मृत्यू झाल्याने संपूर्ण जिल्हा हादरला आहे. या काळजाचा ठोका चुकविणाऱ्या घटनेनंतरही पालकांनी बोध घेतला नाही तर पुढचा बळी कोणाचा? असा प्रश्न उपस्थित होत आहे. शाळा, कोचिंग क्लास किंवा मित्रमैत्रिणींसोबत बाहेर जाण्यासाठी अल्पवयीन मुलांच्या हातात दुचाकी देण्याची पालकांची घातक सवय आता जीवघेणी ठरत आहे.

अल्पवयीन मुलांकडून ट्रिपल सीट, वेगाने वाहन चालविणे आणि विनापरवाना



संग्रहीत फोटो

वाहन चालविण्याचे प्रकार शहरात सर्रास दिसून येत आहेत. अनेक मुलांकडे वाहन चालविण्याचा परवानाही नसतो. तरीही पालकांकडून वाहनाची चावी त्यांच्या हातात दिली जाते. पोलिस प्रशासनाने वारंवार आवाहन करूनही ही बेफिकिरी कायम असल्याने आता कठोर कारवाईचा बडगा उगारण्यात येणार आहे.

वर्धा जिल्हा वाहतूक नियंत्रण शाखेने स्पष्ट केले आहे की, आजपासून अल्पवयीन तसेच विनापरवाना वाहनचालकांविरुद्ध विशेष मोहीम राबवून कठोर दंडात्मक कारवाई केली जाणार आहे.

अल्पवयीन मुलाने वाहन चालवून गुन्हा केल्यास पालक किंवा वाहनमालकावरही कायदेशीर कारवाई होऊ शकते. मोटार वाहन कायद्यानुसार तीन वर्षांपर्यंत कारावास आणि २५ हजार रुपयांपर्यंत दंडाची तरतूद आहे.

पालकांनो, मुलांच्या हातात वाहन नव्हे, सुरक्षित भविष्य द्या एका क्षणाची हौस आयुष्यभराचा पश्चात्ताप ठरू शकते. असा कळकळीचा इशारा सहायक पोलीस निरीक्षक विजय घुले, जिल्हा वाहतूक नियंत्रण शाखा, वर्धा यांनी दिला आहे.

# दोन दिवसांचा शोध संपला; एकुलत्या एक सौरभचा अखेर मृतदेह हाती

**आष्टी (शहीद):** आई-वडिलांचा एकुलता एक आधार असलेल्या १९ वर्षीय सौरभ सुनील चचाणेचा कपिलेश्वर धरणात बुडून दुर्दैवी अंत झाला. दोन दिवसांपासून सुरू असलेल्या शोधमोहीमेला अखेर रविवारी सकाळी यश आले. आष्टी पोलिसांनी तातडीने अकोला जिल्ह्यातील पिंजर येथील मानव सेवा आपत्ती व्यवस्थापन फाऊंडेशनच्या संत गाडगे बाबा आपत्कालीन शोध व बचाव पथकाला पाचारण केले. पथकाने अवघ्या एका तासात सौरभचा मृतदेह शोधून बाहेर काढला.

सौरभ १४ ऑगस्ट रोजी दुपारी दोनच्या सुमारास कपिलेश्वर धरणात बुडाला होता. घटनेनंतर वर्धा येथील आरसीपी आपत्ती व्यवस्थापन पथकाने दोन दिवस शोध घेतला;

मात्र त्याचा ठावठिकाणा लागला नाही. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून आष्टीचे ठाणेदार राजेश जोशी यांनी १५ ऑगस्ट रोजी पिंजर येथील पथकाचे प्रमुख जीवरक्षक दीपक सदाफळे यांच्याशी संपर्क साधला.

रविवारी पहाटे दीपक सदाफळे यांच्या नेतृत्वाखाली मयुर सळेदार, शेखर केवट, निलेश खंडारे, विष्णू केवट, शिवम वानखडे, अमित जवके व हर्षल वानखडे हे जवान घटनास्थळी दाखल झाले. धरणातील ३५ ते ४० फूट खोल पाण्यात रेस्क्यू बोट व



विशेष सर्च ऑपरेशन राबविण्यात आले. अथक प्रयत्नांनंतर एका तासात मृतदेह सापडला.

सौरभ हा आष्टी येथील आयटीआयमध्ये शिक्षण घेत होता. आई-वडिलांचा एकुलता एक मुलगा गेल्याने चचाणे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. मृतदेह शवविच्छेदनासाठी आष्टी रुग्णालयात पाठविण्यात आला.

या कारवाईला पोलीस अधीक्षक सौरभ अग्रवाल, अपर पोलीस अधीक्षक सदाशिव वाघमारे, उपविभागीय पोलीस अधिकारी सरिता चव्हाण यांचे मार्गदर्शन लाभले. ठाणेदार राजेश जोशी, पीएसआय हर्षल नगरकर, पीएसआय निलेश भिलावे यांच्यासह पोलीस कर्मचाऱ्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

# जिल्ह्यात स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा

## स्व. नारायणसिंग मस्के वाचनालय



**हिंगणघाट :** डांगरी वॉर्डातील अभ्यंकर शाळा परिसरातील स्व. नारायणसिंग मस्के सार्वजनिक वाचनालयात स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा करण्यात आला. ज्येष्ठ नागरिक व समाजसेवक प्रकाश पाके यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले. राष्ट्रध्वजाला मानवंदना देत उपस्थितांनी राष्ट्रगीत गायले. यावेळी परिसर देशभक्तीच्या घोषणांनी दुमदुमून गेला.प्रकाश पाके यांनी स्वातंत्र्यदिनाचे महत्त्व सांगत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांना नोटबुक व चॉकलेटचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाला वाचनालयाचे अध्यक्ष अशोकसिंग मस्के, मुख्याध्यापिका कल्पना कारमोरे, शिक्षक मधुकर बावणे, विजय बोरकर, चंदू कोटेकर, ज्येष्ठ पत्रकार केशव तितरे, ज्येष्ठ संपादक जगदीशप्रसाद शुक्ला, ग्रंथपाल कांचन मस्के यांच्यासह नागरिक, विद्यार्थी व महिला मंडळाच्या सदस्यांची उपस्थिती होती.

## डॉ. बी. आर. आंबेडकर विद्यालय



**हिंगणघाट :** स्थानिक डॉ. बी. आर. आंबेडकर विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात १५ ऑगस्ट रोजी स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा करण्यात आला. संस्था सचिव अनिल जवादे, उपाध्यक्षा मंदाकिनी जवादे, कोषाध्यक्ष जी. एस. भगत, संचालिका डॉ. जुही जवादे, संचालक आर. के. पाटील, प्राचार्या सुनिता खैरकार यांच्या उपस्थितीत ध्वजारोहण झाले.यावेळी स्मृतिशेष दिक्षिता वावरे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ वावरे परिवारातर्फे गरजू विद्यार्थी कृष्णा लिचडे याला पुस्तकांचा संच देण्यात आला. नवसाक्षरांना प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले. भाषण स्पर्धा व वेशभूषा सादरीकरण झाले. अध्यक्षीय भाषणात अनिल जवादे यांनी विद्यार्थ्यांना शैक्षणिक वाटचालीसाठी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाला शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन गोपाल मांडवकर यांनी, तर आभार प्रा. पंकज ठाकरे यांनी मानले.

## गोल्डन किड्स इंग्लिश स्कूल



**वर्धा :** बोरगाव (मेघे) येथील गोल्डन किड्स इंग्लिश स्कूलमध्ये स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा करण्यात आला. प्रमुख अतिथी लॉयन्स क्लब, गांधी सिटी, वर्धाचे संचालक अनिल नरेडी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी शाळेचे अध्यक्ष डॉ. सुभाष खंडारे यांची प्रमुख उपस्थिती होती.विद्यार्थ्यांनी नृत्य, देशभक्तीपर गीते, भाषणे तसेच कराटे प्रात्यक्षिके सादर करून उपस्थितांची दाद मिळवली. इंडियन टॅलेंट ऑलिम्पियाड असोसिएशन, मुंबईतर्फे आयोजित स्पर्धेतील विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते बक्षिसे देण्यात आली. तसेच शाळेला 'गोल्डन स्कूल' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. प्रास्ताविक मुख्याध्यापक सचिन झाडे यांनी केले. सूत्रसंचालन फरझाना पठाण यांनी केले. कार्यक्रमाला पालक व ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

## चुडिवाले चौक

**वर्धा :** स्वातंत्र्यदिनानिमित्त १५ ऑगस्ट रोजी शहरातील चुडिवाले चौकात सकाळी ८.३० वाजता ध्वजारोहण करण्यात आले. राष्ट्रध्वजाला मानवंदना देत उपस्थितांनी राष्ट्रगीत गायले. यावेळी सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे सामाजिक कार्यकर्ते हिम्मतकुमार व्यास यांचा टिबडीवाल यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.कार्यक्रमाला आलोक चुडिवाले, ऋतुराज चुडिवाले, नितीन चुडिवाले, मांड चुडिवाले, श्रीनिवास चुडिवाले यांच्यासह परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. देशभक्तीच्या उत्साहपूर्ण वातावरणात कार्यक्रम पार पडला. उपस्थितांनी देशाची एकता, अखंडता आणि प्रगतीसाठी कार्य करण्याचा संकल्प केला.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक,प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती -४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा, वर्धा ४४२२२१ येथे प्रकाशित केले.

**संपादक -प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त)-अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**वर्धा आवृत्ती वर्ष -१४ अंक -२६०**
**आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३**

**मुख्य कार्यालयः-** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन -९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com
abhiramdeshpande@gmail.com



# ८० व्या स्वातंत्र्यदिनी ठिकठिकाणी झेंडावंदन



## राज्य माहिती आयोग

**अमरावती:** भारतीय स्वातंत्र्य दिनानिमित्त राज्य माहिती आयोगाच्या अमरावती येथील कार्यालयात स्वातंत्र्य दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला.

अमरावती येथील राज्य माहिती आयुक्त श्री. रविंद्र ठाकरे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी राज्य माहिती आयोगाचे उपसचिव देविसिंग डाबेराव, मधुसुदन देशमुख, आशिष मन्वर यांच्यासह आयोगातील अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.ध्वजारोहणानंतर राष्ट्रगीताचे सामूहिक गायन करण्यात आले.

उपस्थितांनी राष्ट्रध्वजाला मानवंदना देत देशाच्या स्वातंत्र्यासाठी आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्या थोर स्वातंत्र्यसैनिकांना अभिवादन केले.

स्वातंत्र्य दिनाच्या पार्श्वभूमीवर कार्यालय परिसरात उत्साहाचे आणि देशभक्तीचे वातावरण निर्माण झाले होते.

भारतीय स्वातंत्र्यलढ्यात असंख्य स्वातंत्र्यसैनिकांनी केलेला त्याग, संघर्ष आणि बलिदान यांचे स्मरण करून देणारा हा दिवस आहे. स्वातंत्र्याबरोबरच देशाची लोकशाही व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी संविधानिक मूल्यांचे जतन करणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या मूल्यांच्या आधारावर देशाची लोकशाही अधिक बळकट करण्यासाठी सर्वांनी योगदान देण्याची गरज यावेळी अधोरेखित करण्यात आली.

माहितीचा अधिकार हा नागरिकांना शासनाच्या कामकाजाबाबत माहिती मिळवून देणारा तसेच प्रशासनात पारदर्शकता व उत्तरदायित्व वाढविणारा महत्त्वपूर्ण कायदा आहे.

## गुणवंत विद्यार्थिनींना उपमुख्यमंत्री शिंदे यांच्याकडून १ लाख रुपयांचा प्रोत्साहन निधी

**अमरावती :** विद्यार्थी भविष्यातील देशाचे सुजान नागरीक आहेत.दैनंदिन जीवनात इतर गोष्टींमध्ये तडजोड करा मात्र, पाल्यांच्या शिक्षणासाठी कोणतीही तडजोड न करता पालकांनी त्यांच्या शिक्षणाकडे जाणीवपूर्वक लक्ष देण्याचे आवाहन शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी १५ ऑगस्ट ला अमरावती येथे केले.जिल्हा परिषद कन्या शाळेला सुविधां साठी शासनाच्यावतीने पूर्ण सहकार्य करण्यात येईल असे सांगत प्रत्येक वर्गात गुणानुक्रमे येणाऱ्या पहिल्या तीन विद्यार्थ्यांना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडून १ लाख रुपयांचा निधीही त्यांनी शाळेसाठी जाहीर केला.



स्वातंत्र्य दिनाच्या मुख्य शासकीय कार्यक्रमानंतर शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी शहरातील जिल्हा परिषद कन्या शाळेला भेट दिली यावेळी मार्गदर्शन करतांना ते बोलत होते. आशिष येरेकर, ठमके,योगेश सोनवणे, निलिमा टाके, अमोल पवार,सिद्धेश्वर काळुसे, प्रिया देशमुख, निखिल मानकर,ईमराण खान,उपशि रजनी शिरभाते,सतिश मुघलप्रकाश मेश्राम, बुद्धभूषण सोनवणे,श्रीकांत दामले, संदिप बोडखे, कन्या शाळेचे बाळकृष्ण आंधळे आदी यावेळी उपस्थित होते.

मंत्री श्री. भुसे म्हणाले, या शाळेत गुणात्मक शिक्षणासह मुलींना स्वसंरक्षणाचे धडे दिले जातात व सैनिकी प्रशिक्षणही दिले जात असल्याची बाब कौतुकास्पद आहे. मुलींच्या कला व क्रीडा गुणांनाही प्राधान्य देण्यात येत आहे ही समाधानाची बाब आहे. शाळा व शाळेचा परिसर स्वच्छ व सुंदर आहे. यासोबतच शाळेतील अन्य आवश्यक सुविधांसाठी शासनातर्फे पूर्ण मदत करण्यात येईल. शाळांमधून चांगले संस्कार व गुणात्मक शिक्षण मिळते व यातूनच देशाचे सुजान नागरीक घडतात म्हणून पालकांनी कोणतीही तडजोड न करता पाल्यांना शिकवावे असे त्यांनी सांगितले.

विद्यार्थ्यांनीही चांगला अभ्यास करून आई-वडिल, गुरुजन,कुटुंब, गाव,राज्य व देशाचे नाव उज्ज्वल करावे, असा संदेशही त्यांनी दिला. कन्या शाळेतील गुणवंत विद्याथिना प्रोत्साहन देण्यासाठी त्यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडून १ लाख रुपयांचा निधी देण्यात येणार असल्याचे यावेळी सांगितले.

विविध परीक्षांमध्ये उत्तम कामगिरी करणाऱ्या व विविध क्रीडा स्पर्धांमध्ये उत्कृष्ट प्रदर्शन करणाऱ्या श्रावणी सोनोने,जाणीव नंदेश्वर,अंतरा वाट, अनुष्का सूर्यवंशी या विद्यार्थीनीचा यावेळी मंत्री भुसे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

गजानन पवार ,सुदाम वानखडे आणि श्रीराम मकेश्वर या माजी सैनिकांचा तसेच शाळेचे माजी मुख्याध्यापक नारायणराव वानखडे यांचाही सत्कार करण्यात आला. वंदेमातरम व राष्ट्रीगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.अशी माहिती शिक्षक रविंद्र सोळंके यांनी दिली.

## पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुप

**अमरावती :** देशभक्तीच्या उत्साहपूर्ण वातावरणात पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुपमध्ये ८० वा स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात आणि दिमाखात साजरा करण्यात आला. तिरंग्याच्या रंगांनी सजलेल्या संपूर्ण कॅम्पसमध्ये स्वातंत्र्य दिनाचा उत्साह पाहायला मिळाला. संस्थेचे अध्यक्ष आमदार प्रविण पोटे पाटील यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष श्रेयशदादा पोटे पाटील, एड. प्रविण मोहोड, कपिल आंडे, प्रकाश पुंड, सचिन वानखडे यांच्यासह संस्थेतील सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य, उपप्राचार्य, डीन, विभागप्रमुख, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना आ. प्रविण पोटे पाटील यांनी तरुण पिढीने राष्ट्रभक्ती, कर्तव्यनिष्ठा, शिस्त आणि राष्ट्रीय एकात्मतेची मूल्ये आत्मसात करण्याचे आवाहन केले. 'स्वातंत्र्यसैनिकांच्या बलिदानाचे स्मरण ठेवून अमली पदार्थमुक्त भारत निर्माण करण्यासाठी युवकांनी पुढाकार घ्यावा. नवनवीन तंत्रज्ञान आणि कौशल्याच्या माध्यमातून देशाच्या प्रगतीत योगदान देत विकसित भारताच्या निर्मितीसाठी युवकांनी पुढे यावे,' असे आवाहन त्यांनी केले.विद्यार्थ्यांच्या विविध कलाविष्कारांना उपस्थितांनी उत्स्फूर्त दाद दिली. त्यामुळे संपूर्ण परिसरात देशभक्तीचा उत्साह आणि जल्लोषाचे वातावरण निर्माण झाले होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन पी. आर. पोटे पाटील इंटरनॅशनल स्कूलच्या विद्यार्थ्यांनी केले.कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांनी देशाच्या प्रगतीसाठी आपापल्या क्षेत्रातून योगदान देण्याची शपथ घेतली. 'वंदे मातरम!' आणि 'जय हिंद!'च्या घोषणांनी स्वातंत्र्य दिनाचा उत्सव देशभक्तीपूर्ण वातावरणात उत्साहात झाला.

## श्री संत राजेश्वर महाराज सार्वजनिक वाचनालय

**टाकरखेडा संभू-** स्वातंत्र्य दिनानिमित्त श्री संत राजेश्वर महाराज सार्वजनिक वाचनाल यात उत्साहपूर्ण वातावरणात झेंडावंदन कार्यक्रम पार पडला. जगद्गुरू श्री राजेश्वर महाराज यांच्या हस्ते राष्ट्रध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले. हा कार्यक्रम पौर्णिमाताई सवई यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आला होता.

ध्वजारोहणाच्या कार्यक्रमानिमित्त जगद्गुरू श्री राजेश्वर महाराज यांचे दर्शन घेण्यासाठी गावातील नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. महाराजांच्या हस्ते झेंडावंदन झाल्याने कार्यक्रमाला विशेष महत्त्व प्राप्त झाले. यावेळी उपस्थित नागरिकांनी राष्ट्रध्वजाला मानवंदना देत स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

यावेळी उपसरपंच तसेच सार्वजनिक वाचनालयाचे सचिव प्रदीप शेंडे, माजी सरपंच दीपक पाटील, पोलीस पाटील अजय मोहकर, विजय सवाई, अशोकराव मेश्राम, निलेश जामठे, ग्रा.पं.सदस्य सोनाली जामठे, अशोकराव शेंडे यांच्यासह गावातील मान्यवर उपस्थित होते.

श्रीराम हायस्कूलचे सर्व शिक्षक, विद्यार्थी-विद्यार्थिनी तसेच प्राथमिक शाळेतील शिक्षकांनीही कार्यक्रमात सहभाग घेतला. सार्वजनिक वाचनालया च्या ग्रंथपाल विद्या शेंडे, वाचनालयाचे संचालक आणि गावातील प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



दरम्यान, नेताजी मंडळाच्या वतीने आयोजित ध्वजारोहण कार्यक्रमातही जगद्गुरू श्री राजेश्वर महाराज यांच्या हस्ते राष्ट्रध्वज फडकविण्यात आला. दोन्ही ठिकाणी राष्ट्रगीताने वातावरण भारावून गेले. स्वातंत्र्यसैनिकांच्या त्यागाचे स्मरण करून देशाची एकता, अखंडता आणि लोकशाही मूल्ये जपण्याचा संदेश यावेळी देण्यात आला.

गावातील नागरिक, विद्यार्थी, शिक्षक आणि विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे स्वातंत्र्य दिनाचा सोहळा उत्साहात आणि आनंदी वातावरणात पार पडला.

## राजर्षी शाहू महाराज वाचनालय

**तिवसा-** येथील श्री राजर्षी शाहू महाराज सार्वजनिक वाचनालयात स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने देशाच्या स्वातंत्र्यासाठी बलिदान देणाऱ्या थोर पुरुषांच्या प्रतिमांचे पूजन करून त्यांना अभिवादन करण्यात आले.कार्यक्रमात राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि शहीद भगतसिंग यांच्या प्रतिमेचे पूजन फूड कॉर्नरचे संचालक हरीश टहलानी यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी बोलताना त्यांनी थोर पुरुषांचे विचार आणि त्यांचे कार्य तरुण पिढीसाठी नेहमीच प्रेरणादायी राहील, असे मत व्यक्त केले.या कार्यक्रमाला ज्ञानेश्वर कुऱ्हाडे, प्रकाश विजयकर, अंकुश देशमुख,मयूर बोके, आकाश सिंग बावरी, सुरज तंवर, हृषीकेश गंधे, कृणाल गौरखेडे, राजाभाऊ देशमुख, मोनिका येवले, आचल मुंदाणे व राहुल धडांगे प्रामुख्याने उपस्थित होते. यासोबतच वाचनालयातील इतर वाचक वर्ग आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांचे आभार मानण्यात आले.





## विद्यानिकेतन व विज्ञान उच्च माध्यमिक विद्यालय

**कुऱ्हा -** व्हीएसपीएम अकॅडमी ऑफ हायर एज्युकेशन, नागपूर द्वारा संचालित विद्यानिकेतन व विज्ञान उच्च माध्यमिक विद्यालय, कुऱ्हा येथे देशाचा ८० वा स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी विद्यालयाचे नवनियुक्त मुख्याध्यापक श्री. दिनेश सवाई यांच्या हस्ते विद्यालयाचे प्रांगणात ध्वजारोहण पार पडले. विद्यालयातील ध्वजारोहणानंतर गावातील जुनी ग्रामपंचायत कार्यालय येथे विद्यालयातर्फे आयोजित ध्वजारोहण समारंभात मा. श्रीमती मीनाताई दिलीप चव्हाण यांच्या हस्ते ध्वजारोहण संपन्न झाले. यासोबतच ग्रामपंचायत तर्फे आयोजित बाजार चौकातील सामूहिक ध्वजारोहण कार्यक्रमात विद्यालयाने सहभाग घेतला. तसेच जि. प. प्राथमिक मराठी शाळेच्या प्रांगणात स्वातंत्र्य दिनाच्या निमित्याने आयोजित देशभक्ती गीतांवरील कवायत व देशभक्तीपर समूह गीत गायन स्पर्धेत विद्यालयाच्या चमूने आपल्या बहारदार सादरीकरणाने उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सेवाजेष्ठ शिक्षक सुनील भक्ते यांनी केले. कार्यक्रमाला इयत्ता ५वी ते १२वी चे सर्व विद्यार्थी तसेच शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी वृंद उपस्थित होते.

## सुरवाडी येथील मतिमंद विद्यालय

**तिवसा** -निवासी मतिमंद विद्यालय, सुरवाडी, तिवसा येथे भारताचा ८० वा स्वातंत्र्यदिन दि. १५ ऑगस्ट २०२६ रोजी अत्यंत उत्साहपूर्ण व देशभक्तीमय वातावरणात साजरा करण्यात आला.यावेळी कार्यक्रमाची सुरुवात सकाळी ध्वजारोहणाने करण्यात आली.प्रमुख अतिथी समाजसेवक धीरज केने यांच्या हस्ते तिरंगा ध्वज फडकविण्यात आला.



यावेळी उपस्थित सर्वांनी वंदे मातरम, राष्ट्रगीत व राज्य गीताचे सामूहिक गायन करून राष्ट्रध्वजाला मानवंदना अर्पण केली.

यावेळी शाळेतील संचालक मंडळ सुद्धा उपस्थित होते. विशेष विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीते, भाषणे व गीते म्हणून विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत कार्यक्रमाची शोभा वाढवली.यावेळी विद्यार्थ्यांना पाहुण्यांनी स्वातंत्र्यदिनाचे महत्त्व, देशाच्या स्वातंत्र्यासाठी स्वातंत्र्यसैनिकांनी केलेला त्याग तसेच देशाप्रती असलेली आपली कर्तव्ये याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

कार्यक्रमास शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी तसेच पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करून त्यांना स्वातंत्र्यदिनाच्या शुभेच्छा दिल्या. स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून सर्व विद्यार्थांकरिता डेंटल चेकअप कॅम्प आयोजित करण्यात आले होते.

याप्रसंगी सुप्रसिद्ध दंतरोगतज्ञ डॉ.स्नेहल देवतारे यांनी विद्यार्थ्यांची तपासणी केली.कार्यक्रमाचा समारोप आनंददायी व उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आला.

## उत्कृष्ट ठाणेदारांचा स्वातंत्र्यदिनी ग्रामपंचायतीतर्फे सत्कार

**आसेगाव पूर्णा -** आसेगाव पूर्णा पोलीस ठाण्याचे ठाणेदार सूरज तेलगोटे यांना जानेवारी २०२६ ते ३० जून २०२६ या कालावधीत कायदा व सुव्यवस्था राखणे, गुन्हेगारीवर प्रभावी नियंत्रण ठेवणे तसेच पोलीस ठाण्याचे उत्कृष्ट प्रशासन केल्याबद्दल 'उत्कृष्ट ठाणेदार' पुरस्काराने गौरविण्यात आले. या पुरस्काराबद्दल देशाच्या ८०व्या स्वातंत्र्यदिनी आसेगाव पूर्णा ग्रामपंचायतीच्या वतीने त्यांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.

अमरावती ग्रामीणचे पोलीस अधीक्षक निकेतन कदम (आयपीएस) व अपर पोलीस अधीक्षक दत्ता तोटेवाड यांच्या हस्ते ठाणेदार सूरज तेलगोटे यांना यापूर्वी सन्मानचिन्ह व प्रशस्तिपत्र देऊन गौरविण्यात आले होते. कर्तव्यदक्षता, चोख बंदोबस्त, गुन्हेगारी नियंत्रण आणि जनसेवेला प्राधान्य देत केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.



स्वातंत्र्यदिनानिमित्त आसेगाव पूर्णा ग्रामपंचायत कार्यालयाच्या प्रांगणात राष्ट्रध्वजारोहणाचा कार्यक्रम झाल्यानंतर पोलीस पाटील अनंतरावजी गोवर्धनराव मानकर यांच्या हस्ते ठाणेदार सूरज तेलगोटे यांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी आसेगावच्या सरपंच कांचनताई रघुवंशी, उपसरपंच सुधीर वाटाणे, ग्रामसेवक भाकरे, माजी जिल्हा परिषद सदस्य श्याम मसराम, अरुणपंत काळे, ग्रामपंचायत सदस्य, परिसरातील कर्मचारी, शालेय विद्यार्थी-विद्यार्थिनी तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## डॉ .हेडगेवार हॉस्पीटल

**अमरावती :** जनकल्याण सेवा संस्था संचालित डॉ . हेडगेवार हॉस्पीटलने १४ वर्ष पूर्ण केले .

या १४ वर्षात अनेक सामाजिक व आरोग्य उपक्रम हॉस्पीटलने राबविले आहेत .

शहरच नव्हे तर उपेक्षीत ग्रामीण भागातही संस्थेच्या संवेदना प्रकल्पाच्या माध्यमातून आरोग्य सेवा प्रदान करणाऱ्या डॉ . हेडगेवार हॉस्पीटलचे कार्य आणि सेवा प्रशंसनीय आहे. यामुळे हॉस्पीटलला तन, मन , धनाने सहकार्य करू. ग्रामीण भागात आरोग्य सेवा देण्यासाठी १ लाख रुपयांची औषधे निशुल्क प्रदान करू, असे प्रतिपादन केमिस्ट अँड ड्रगिस्ट असो .चे अध्यक्ष सौरभ मालाणी यांनी केले .जनकल्याण सेवा संस्थाद्वारा संचालित डॉ . हेडगेवार



हॉस्पीटलमध्ये स्वातंत्र्यदिन व भारतमाता पूजन करण्यात आले . या प्रसंगी व्यासपीठावर संस्थेचे सचिव गोविंद जोग केमिस्ट अँड ड्रगिस्ट असो .चे सचिव राजा नानवाणी होते..

अतिथी स्वागत गोविंद जोग , सतिश बक्षी यांनी केले .

## गरजू विद्यार्थ्याला सायकल भेट

**अमरावती :** न्यू गणेश कॉलनी बगीचा येथे १५ ऑगस्ट २०२६ रोजी ८० वा स्वातंत्र्यदिन उत्साहपूर्ण आणि देशभक्तीमय वातावरणात साजरा करण्यात आला. यानिमित्त ध्वजारोहणासह विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.

रविंद्र माधवराव उंबरकर, सेवानिवृत्त लेखापरीक्षक यांच्या शुभहस्ते ध्वजारोहण करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राजापेठ पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक मा. श्री. संदीप चव्हाण होते. प्रमुख पाहुणे म्हणून सेवानिवृत्त शिक्षक मा. श्री. नारायण नामदेवराव कल्हाणे उपस्थित होते.



यावेळी शोभात पाटणे, गंगाधररावजी आवारे, शिवदासजी घुले, अर्चना अशोक पांडे, योगेश रघुनाथ विजयकर, विनोदजी गुहे, प्रीती शाह यांच्यासह परिसरातील मान्यवर, नागरिक व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून सामाजिक बांधिलकी जपत शिव देवेंद्र वानखेडे या गरजू विद्यार्थ्याला भूषण अ. पाटणे व प्रियंका भु. पाटणे यांच्या वतीने सायकल भेट देण्यात आली. विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन मिळावे तसेच शाळेत ये-जा करताना त्यांच्या अडचणी दूर व्हाव्यात, या सामाजिक भावनेतून हा उपक्रम राबविण्यात आला.



## अरूणोदय इंग्लिश स्कूल व ज्यू. कॉलेज ऑफ सायन्स

**अमरावती -** व्ही.एम.व्ही. परिसरातील अरुणोदय इंग्लिश स्कूल व ज्यू. कॉलेज ऑफ सायन्स, हर्षराज कॉलनी, अमरावती येथे ८० व्या स्वातंत्र्यदिनाचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. कार्यक्रमाची सुरूवात राष्ट्रपीता महात्मा गांधीजींच्या फोटोचे पुजन करून करण्यात आले तसेच अरूणोदय शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. वसंत लुंगे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. याप्रसंगी अरूणोदय शिक्षण संस्थेचे सचिव डॉ. भारती लुंगे, अरूणोदय ज्यु. कॉलेजच्या प्राचार्या विशाखा नाफडे, उपप्राचार्या सीमा कुथे, अरुणोदय इंग्लिश स्कूलच्या शिल्पा पाजनकर, निता काळमेघ, रेखा राऊत व जोत्स्ना इंगोले, शाळेचे शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, तसेच शाळेचे विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सावरखेड पिंगळाई साफल्य विद्यालय

**लेहेगाव- :**साफल्य विद्यालय, सावरखेड पिंगळांई येथे शनिवार १५ ऑगस्ट ला मोर्शी पंचायत समिती चे माजी सभापती विजय मडके यांच्या अध्यक्षतेखाली विद्यालयात ८० वा स्वातंत्र्य दिन संपन्न झाला. यानिमित्त ध्वजारोहणाचा प्रमुख सोहळा आर्मीच्या ग्रुप बॉम्बे मधुन सेवानिवृत्त झालेल्या गजानन शेषरावजी ठवळी यांचे शुभहस्ते पार पडला. कार्यक्रमाला उपस्थित सेवानिवृत्त सैनिकाची वीर माता मीराबाई शेषरावजी ठवळी यांचा शाल श्रीफळ देऊन मान्यवरांच्या हस्ते भावपूर्ण सत्कार करण्यात आला.



यानिमित्ताने वंदे मातरम या राष्ट्रीय गीताला १५० वर्षे पूर्ण झाल्या निमित्त वंदे मातरम या गीताचे सामूहिक गायन करण्यात आले.

तसेच राष्ट्रगीत व राज्य गीताचे सुद्धा सामूहिक रित्या गायन करण्यात आले. यानंतर देशभक्ती गीतांच्या संगीतावर आधारित सामूहिक कवायतीचे आयोजन करण्यात आलेले होते.

# विरगव्हाणजवळ दोन दुचाकींची समोरासमोर धडक

## तरुणासह तीन वर्षांच्या चिमुकलीचा मृत्यू

**कुऱ्हा/प्रतिनिधीः-** आर्वी-अमरावती मार्गावर विरगव्हाणजवळ रविवारी (दि.१६) सकाळी दोन दुचाकींची समोरासमोर जोरदार धडक होऊन भीषण अपघात झाला. या अपघातात वंश सतीश मुडे (वय २२, रा. आर्वी) व अभिण्या धीरज तायडे (वय ३, रा. गाडगेनगर, अमरावती) या दोघांचा मृत्यू झाला आहे. तर अन्य तिघे गंभीर जखमी झाले. जखमींवर अमरावतीतील खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. रविवारी सकाळी सुमारे ११ वाजता विरगव्हाणपासून काही अंतरावर हा अपघात झाला. मिळालेल्या माहितीनुसार, दुचाकी क्रमांक एमएच ३२ एबी ८९७८








आणि बुलेटची समोरासमोर धडक झाली. धडक एवढी जोरदार होती की दोन्ही वाहनांवरील व्यक्तींना गंभीर दुखापत झाली. या अपघातात वंश (वय २२, रा. आर्वी) याचा मृत्यू झाला. तसेच बुलेटवर असणारे धीरज तायडे यांची मुलगी अभिण्या धीरज तायडे (वय ३, रा. गाडगेनगर, अमरावती) ही गंभीर रित्या जखमी झाली होती. दोघांना रुग्णालयात नेण्यात आले असता डॉक्टरांनी मृत घोषित केले. अपघातात धीरज तायडे, त्यांची पत्नी पुनम तायडे (रा. गाडगेनगर) तसेच अथर्व पंडीत मेश्राम (वय १७, रा. विरगव्हाण) हे तिघे गंभीर जखमी झाले. त्यांना तातडीने अमरावतीतील खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.

घटनेची माहिती मिळताच कुऱ्हा पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. पोलिसांनी दोन्ही मृतदेह शवविच्छेदनासाठी रुग्णालयात पाठविले. अपघातामुळे काही काळ या मार्गावरील वाहतुकीवर परिणाम झाला होता. या घटनेचा पुढील तपास कुऱ्हा पोलीस करीत आहेत.

# ५९ ग्रॅम एमडीसह १०.२८ लाखांचा मुद्देमाल जप्त

## अमरावतीत दोघे जाळ्यात,नागपुरी गेट पोलिसांचा सापळा

**अमरावती/प्रतिनिधीः-** अमली पदार्थांच्या विक्रीसाठी शहरात फिरणाऱ्या दोघांना नागपुरी गेट पोलिसांनी सापळा रचून पकडले. हबीबनगर परिसरातील आयशा पान सेंटरजवळ झालेल्या या कारवाईत पोलिसांनी ५९ ग्रॅम एमडी जप्त केले. त्यासोबत दुचाकी, दोन मोबाईल, रोकड, इलेक्ट्रॉनिक वजनकाटा व पाऊच असा एकूण १० लाख २८ हजार ८०० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. शहबाज अहमद जमिल अहमद (१८, रा. हबीबनगर) आणि आमिर बाबू शेख (२६, रा. विरार ईस्ट, मुंबई; सध्या अलहिलाल कॉलनी, अमरावती) अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत.



१६ ऑगस्ट रोजी नागपुरी गेट पोलिसांचे डी.बी. पथक गस्तीवर असताना हबीबनगरमधील सोहेल बारी यांच्या दवाखान्याजवळील आयशा पान सेंटर येथे अमली पदार्थ विक्रीसाठी दोघे येणार असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. वरिष्ठ पोलिस निरीक्षक मनोहर कोटनाके यांच्या मार्गदर्शनाखाली पंच, छायाचित्रकार आणि फॉरेन्सिक पथकाला सोबत घेत पोलिसांनी तेथे सापळा लावला. काही वेळाने संशयास्पदरीत्या दोघे आढळून आल्यानंतर त्यांना ताब्यात घेऊन झडती घेण्यात आली. त्यांच्याकडून ५९ ग्रॅम एमडी, अंदाजे किंमत ८ लाख ८५ हजार रुपये, दुचाकी, दोन स्मार्टफोन, १,८०० रुपये रोकड, इलेक्ट्रॉनिक वजनकाटा आणि पाऊच असा मुद्देमाल मिळून (पान २ वर)

# स्कॉर्पिओच्या धडकेत ऑटोतील सहा जखमी; लहान बाळाचाही समावेश

### -रहाटगाव उड्डाणपुलावरील अपघात

**अमरावती/प्रतिनिधीः-** रहाटगाव उड्डाणपुलावर ऑटोला मागून आलेल्या स्कॉर्पिओने जोरदार धडक दिल्याने सहा प्रवासी जखमी झाले. जखमींमध्ये एका तीन वर्षीय बालकाचाही समावेश आहे. अपघातानंतर सर्व जखमींना उपचारासाठी जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले.

रविवारी राहाटगाव उड्डाणपुलावरून ऑटो प्रवाशांना घेऊन जात असताना मागून आलेल्या स्कॉर्पिओ वाहनाने त्याला जोरदार धडक दिली. धडकेमुळे ऑटोतील प्रवासी खाली पडून तसेच ऑटोला धडक बसल्याने जखमी झाले. अपघाताची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली आणि जखमींना रुग्णालयात पोहोचविण्यासाठी मदत केली. या अपघातात फर्जाना बानो




(५४, रा. अलीमनगर), सय्यद साजिद (५०, रा. नांदगाव पेठ), नाझिया परवीन (रा. गुलिस्ता नगर), अब्दुल समीर (३८) आणि शमशाना परवीन (४५) हे जखमी झाले आहेत. त्यांच्यावर इर्विन रुग्णालयात उपचार सुरू आहेत. दरम्यान, अपघाताची माहिती नांदगाव पेठ पोलिसांना देण्यात आली असून, पोलिसांनी घटनास्थळाची माहिती घेत पुढील तपास सुरू केला आहे. स्कॉर्पिओ चालकाची भूमिका तसेच अपघात नेमका कोणत्या कारणामुळे झाला, याचा तपास केला जात आहे.

# इबोला संसर्गाची भीती निराधार

### -अंजनगाव सुर्जीतील तरुणाची चाचणी निगेटिव्ह

***अंजनगाव सुर्जी / प्रतिनिधीः-*** अंजनगाव सुर्जी तालुक्यातील ३२ वर्षीय तरुण युवक काही काळ केनियात नोकरी करत होता. मायदेशी परतताना त्याचा युगांडा येथे प्रवासादरम्यान थांबा झाला होता. युगांडामध्ये इबोला संसर्गाच्या पार्श्वभूमीवर खबरदारीचा उपाय म्हणून आरोग्य विभागाने त्याची वैद्यकीय तपासणी व निरीक्षण सुरू केले. मायदेशी परतल्यानंतर या तरुणाला ताप, सर्दी आणि खोकल्यासारखी लक्षणे जाणवत असल्याने त्याने अंजनगाव सुर्जी येथील खासगी दवाखान्यात दोन दिवस उपचार घेतले. मात्र, त्याचा



युगांडा येथे प्रवास झाल्याची पार्श्वभूमी लक्षात घेऊन आरोग्य विभागाने कोणताही धोका न पत्करता त्याला पुढील तपासणीसाठी अमरावती येथून एम्स नागपूर येथे हलविले.एम्स नागपूर येथे त्याच्या रक्ताचे नमुने घेऊन इबोला संसर्गाच्या तपासणीसाठी पुणे येथे पाठविण्यात आले. या तपासणीचा अहवाल इबोला संसर्गासाठी निगेटिव्ह आला असून, त्यामुळे संबंधित तरुणाला इबोला झालेला नसल्याचे स्पष्ट झाले आहे. या अहवालामुळे त्याच्या कुटुंबीयांसह अंजनगाव सुर्जी तालुक्यातील नागरिकांनी सुटकेचा श्वास घेतला.

> ■ नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेऊ नये,संबंधित तरुणाची इबोला चाचणी निगेटिव्ह आली आहे नागरिकांनी कोणत्याही प्रकारची भीती किंवा गैरसमज मनात बाळगू नये. आरोग्य विभागाकडून परिस्थितीवर आवश्यक ते लक्ष ठेवण्यात येत असून नागरिकांनी अधिकृत माहितीवरच विश्वास ठेवावा,
> **-डॉ. शंतनू नागपूरकर,** तालुका आरोग्य अधिकारी, अंजनगाव सुर्जी

# दुचाकीला गायीची धडक; महिलेचा उपचारादरम्यान मृत्यू

### -वल्लभनगरात अपघात

**अमरावती/प्रतिनिधीः-** कामासाठी पतीसोबत दुचाकीने जात असताना अचानक रस्त्यावर आलेल्या गायीची दुचाकीला धडक बसली. या अपघातात खाली पडून डोक्याला गंभीर दुखापत झालेल्या महिलेचा चार दिवसांच्या उपचारानंतर मृत्यू झाला. मिना श्रीकृष्ण वऱ्हाडे (४४, रा. वल्लभनगर क्रमांक १, अन्नपूर्णा चक्कीजवळ) असे मृत महिलेचे नाव आहे. ही घटना ११ ऑगस्ट रोजी सकाळच्या सुमारास खोलापुरी गेट पोलिस ठाण्याच्या हद्दीतील वल्लभनगर परिसरात घडली. श्रीकृष्ण वऱ्हाडे हे पत्नी मिना यांना कामावर सोडण्यासाठी दुचाकीवरून घेऊन जात होते. वल्लभनगर परिसरातून जात असताना अचानक रस्त्यावर आलेल्या गायीचा दुचाकीला धक्का लागला.



त्यामुळे दुचाकीवरील दोघेही रस्त्यावर पडले. या अपघातात मिना यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. त्यांच्या कानातून रक्तस्राव होत असल्याने त्यांना तातडीने खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. प्रकृती गंभीर असल्याने पुढील उपचारासाठी त्यांना डॉ. पंजाबराव देशमुख वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात हलविण्यात आले. मात्र, (पान २ वर)


# शुक्रवार बाजारातील देवानंद ठाकरे हत्या प्रकरणाचा उलगडा

## तीन आरोपी अटकेत, दारू पिल्यानंतरच्या वादातून मारहाण

### -तिघांचा सहभाग तपासात निष्पन्न, पुराव्यांची पडताळणी सुरू

**अमरावती/प्रतिनिधीः-** फ्रेजरपुरा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील शुक्रवार बाजार परिसरात १३ ऑगस्ट रोजी रात्री घडलेल्या देवानंद ठाकरे हत्या प्रकरणाचा पोलिसांनी उलगडा केला आहे. तपासादरम्यान हत्येमागील कारण, घटनाक्रम आणि संबंधित व्यक्तींची भूमिका याबाबत महत्त्वाची माहिती पोलिसांच्या हाती आली आहे. या प्रकरणात तिघांचा सहभाग निष्पन्न झाल्याचे तपासातून समोर आले आहे. मयत देवानंद ठाकरे हा मागील सुमारे वर्षभरापासून जावेद नावाच्या भंगार व्यावसायिकाकडील रिक्षा-कटल्याच्या माध्यमातून भंगार गोळा करण्याचे काम करीत होता. काही दिवसांपासून विठ्ठल उर्फ नरेश धुर्वे हाही या कामात सहभागी झाला होता. दोन कटल्या/रिक्षांच्या माध्यमातून भंगार गोळा करण्याचे काम वाढल्याने इतर भंगार वेचणाऱ्यांच्या वाट्याला येणारी भागीदारी कमी होत होती. यावरून देवानंद आणि इतर इसमांचा विठ्ठल उर्फ नरेश याच्यासोबत वाद होत असल्याचे तपासात निष्पन्न झाले.

काही दिवसांपूर्वी झालेल्या वादाच्या पार्श्वभूमीवर विठ्ठल उर्फ नरेश हा कामाच्या ठिकाणी



कुऱ्हाड घेऊन आला होता. त्यावेळी भंगार व्यावसायिक जावेद याने त्याच्याकडून कुऱ्हाड काढून घेत त्याला समज दिली होती. त्यामुळे दोन्ही गटांमध्ये पूर्वीपासून वादाची पार्श्वभूमी असल्याचे तपासात पुढे आले.

दरम्यान, १३ ऑगस्ट रोजी रात्री दारू पिऊन जेवण झाल्यानंतर झालेल्या वादातून विठ्ठल उर्फ नरेश धुर्वे (रा. चपरासीपुरा, संदीप गुळधे यांच्या घराजवळ, अमरावती) याने देवानंद ठाकरे याच्या डोक्यात दगड मारला. तसेच छोट्या कटरने त्याच्या शरीरावर गंभीर मारहाण केल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. देवानंद जमिनीवर कोसळल्यानंतर (पान २ वर)

# धामणगावातील घरफोडी-दुकानफोडींची उकल; तिघे ताब्यात

## स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई; चार गुन्ह्यांची कबुली

**अमरावती/प्रतिनिधीः-** धामणगाव रेल्वे परिसरात घरफोडी आणि दुकानफोडी करून पोलिसांची डोकेदुखी वाढविणाऱ्या टोळीपर्यंत अमरावती ग्रामीण स्थानिक गुन्हे शाखा पोहोचली आहे. पोलिसांनी तिघांना ताब्यात घेतल्यानंतर चौकशीत तब्बल चार गुन्ह्यांचा छडा लागला. आरोपींकडून गुन्ह्यात वापरलेली मोपेड, लोखंडी रॉड आणि चोरीची रोकड असा ६० हजार ३०० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला.

अभिमन्यू सुरेश विश्वकर्मा (२२, रा. लक्ष्मीनगर), प्रज्वल विनोद गाडेकर (१८, रा. बॉम्बे फैल) आणि आर्यन उर्फ गौरव सुधीर नागफासे (१९, रा. बॉम्बे फैल, अमरावती) अशी ताब्यात घेण्यात आलेल्यांची नावे आहेत. घरफोडी व दुकानफोडीच्या गुन्ह्यांचा समांतर तपास करण्याच्या सूचना पोलिस अधीक्षक निकेतन कदम यांनी स्थानिक गुन्हे शाखेला दिल्या होत्या. त्यानुसार १५ ऑगस्ट



रोजी पथक रेकॉर्डवरील आरोपींची माहिती घेत असताना दत्तापूर पोलिस ठाण्याच्या हद्दीतील फर्निचर दुकानफोडीत अभिमन्यू विश्वकर्माचा सहभाग असल्याची माहिती मिळाली.

पोलिसांनी त्याला ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्याने प्रज्वल गाडेकर आणि आर्यन नागफासे यांच्या साथीने गुन्हा केल्याची कबुली दिल्याचे पोलिसांनी सांगितले. पुढील चौकशीत फेब्रुवारीमध्ये धामणगाव रेल्वेतील किराणा दुकान, तर जुलैमध्ये किराणा दुकान, फर्निचर दुकान आणि बंद घरात चोरी केल्याची माहिती समोर आली. दत्तापूर पोलिस ठाण्यातील अभिलेख तपासल्यानंतर एक घरफोडी व तीन दुकानफोडी असे चार गुन्हे उघडकीस आले. आरोपींकडून ५० हजार रुपयांची मोपेड, ३०० रुपयांचा लोखंडी रॉड आणि १० हजार रुपयांची चोरीची रोकड जप्त करण्यात आली. ही कारवाई अपर पोलिस अधीक्षक दत्ता तोटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे निरीक्षक अशोक लांडे यांच्या नेतृत्वात करण्यात आली

# अल्पवयीन मुलीसोबत अश्लील कृत्य

### शेजाऱ्याविरुद्ध गुन्हा दाखल; दर्यापूर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील घटना

**अमरावती/प्रतिनिधीः-** दर्यापूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत एका अल्पवयीन मुलीसोबत अश्लील कृत्य आणि लैंगिक छळ केल्याची गंभीर घटना उघडकीस आली आहे. पीडितेच्या आईने दिलेल्या तक्रारीवरून, पोलिसांनी शेजाऱ्याविरुद्ध (आरोपी) बलात्कार आणि पोक्सो कायद्यांतर्गत गुन्हा दाखल केला आहे.तक्रारीनुसार, १२ ऑगस्टच्या सकाळी पीडित मुलगी आपल्या भावासोबत घरी होती; तिची आई मजुरीसाठी बाहेर गेली होती आणि वडील शेतात गेले होते. याच दरम्यान, एका ४५ वर्षीय शेजाऱ्याने चॉकलेटचे आमिष दाखवून मुलीला आपल्या घरात बोलावले. घरात नेल्यानंतर आरोपीने



तिच्यावर अश्लील कृत्य केले. घाबरलेल्या मुलीने आपल्या भावाला हाक मारली. तिचा आवाज ऐकून भाऊ तिथे पोहोचताच आरोपीचे कृत्य उघड झाले. भावाने त्वरित आपल्या बहिणीची सुटका केली आणि तिला घरी आणले. आई घरी परतल्यावर मुलांनी तिला संपूर्ण घटना सांगितली. विचारणा केली असता, पीडितेने आरोपीने केलेल्या अश्लील कृत्यांची माहिती दिली. सुरुवातीला, सामाजिक बदनामीची भीती आणि मानसिक आघातामुळे कुटुंबाने तक्रार दाखल केली नाही. नंतर, हिंमत एकवटून पीडितेच्या आईने १४ ऑगस्टच्या रात्री दर्यापूर पोलीस ठाण्यात जाऊन तक्रार नोंदवली. दर्यापूर पोलिसांनी आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# राज्यात १९ हजारांवर वीजचोऱ्या उघड

## जुलै महिन्यात तब्बल ११ हजार वीजचोऱ्यांचा पर्दाफाश

**मुंबई/प्रतिनिधी ::** महावितरणने वीजचोरीविरुद्ध राज्यभरात धडक मोहीम सुरु केली असून गेल्या चार महिन्यांमध्ये घरगुती, व्यावसायिक, औद्योगिक तसेच इतर वर्गवारीमध्ये १९ हजार ५९९ ठिकाणी वीजचोरी उघड झाली आहे. यामध्ये गेल्या जुलै महिन्यात पर्दाफाश झालेल्या तब्बल ११ हजार ३२ वीजचोऱ्यांचा समावेश आहे. थेट तारेच्या हूकद्वारे व मीटरमध्ये फेरफार केलेल्या १५ हजार ९६५ प्रकरणांत ३० कोटी ३६ लाख रुपयांची वीजचोरी झाल्याचे आढळून आले तर उर्वरित ३ हजारांवर ६३४ प्रकरणांचे मूल्यांकन सुरु आहे.

गेल्या एप्रिल महिन्यापासून महावितरणने घरगुती, व्यावसायिक, औद्योगिक व इतर वर्गवारीतील वीजजोडण्यांची धडक तपासणी मोहीम सुरु केली आहे. यामध्ये सर्वाधिक कोकण



प्रादेशिक विभागात ७४९६, नागपूर- ४५२१, छत्रपती संभाजीनगर- ४५९७ आणि पुणे प्रादेशिक विभागात २९८५ अशा एकूण १९ हजार ५९९ वीजचोऱ्या उघडकीस आल्या आहेत. यापैकी १५ हजार ९६५ वीजचोऱ्यांचे मूल्यांकन झाले असून ३० कोटी ३६ लाख रुपयांच्या वीजचोरीचे बिल संबंधित ग्राहकांना देण्यात आले आहे. त्यातील ६६२९ ग्राहकांनी १४ कोटी १२ लाख रुपयांचा भरणा केला आहे. तसेच सर्वच वीजचोरी प्रकरणी तडजोड शुल्काच्या दंडाची रक्कम देखील आकारण्यात येत आहे. आतापर्यंत ४९५९ प्रकरणांत १ कोटी ८५ (पान २ वर)

# पूर्णा नदीकाठावरून सात शेतकऱ्यांच्या सिंचन केबलची चोरी

## -७३ हजार ५०० रुपयांचा तांब्याचा तार लंपास

**अमरावती/प्रतिनिधीः-** दर्यापूर तालुक्यातील दारखेडा-टाकळी शिवारातील पूर्णा नदीकाठावरून अज्ञात चोरट्यांनी सात शेतकऱ्यांच्या सिंचन मोटारींच्या तांब्याच्या केबल चोरून नेल्याची घटना समोर आली आहे. चोरट्यांनी एक-दोन नव्हे, तर सात शेतकऱ्यांच्या मोटारींच्या केबल कापून नेल्या. चोरीला गेलेल्या केबलची एकूण किंमत सुमारे ७३ हजार ५०० रुपये असल्याचे तक्रारीत नमूद आहे.



दारखेडा-टाकळी शिवारातील शेतकरी पूर्णा नदीत बसविलेल्या सबमर्सिबल मोटारींच्या माध्यमातून शेतात सिंचन करतात. नदीतील मोटारींपर्यंत वीजपुरवठा करण्यासाठी त्यांनी तांब्याच्या केबल टाकल्या आहेत. १४ ऑगस्टच्या सायंकाळपर्यंत या केबल व्यवस्थित होत्या. मात्र, १५ ऑगस्ट रोजी दुपारी मोहम्मद जावेद यांनी मोबाइलद्वारे मोटार सुरू करण्याचा प्रयत्न केला असता ती सुरू झाली नाही. त्यामुळे त्यांनी नदीकाठावर जाऊन पाहणी केली. त्यावेळी त्यांच्या मोटारीसह परिसरातील अन्य शेतकऱ्यांच्या मोटारींच्या केबल कापलेल्या व गायब असल्याचे निदर्शनास आले. चोरट्यांनी मोहम्मद जावेद शेख लुकमान यांच्या शेतातून १८० फूट, विनोद महादेव चुडे यांच्या शेतातून ३० मीटर, श्याम हिम्मतराव (पान २ वर)